R.N.I.No.1814/57

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवा काळ

• मुंबई, मंगळवार २६ ऑक्टोबर, २०२१ • वर्ष-९९, अंक-२३१, पाने-८, किंमत : ₹ ४ NAVAKAL

• Issue - 231 Vol.- 99 Marathi - Daily - Mumbai, 26 October - 2021 Page- 8 Price- Rs. 4/-

24x7 : www.navakal.in • संपादक- सौ. जयश्री खाडिलकर-पांडे Email-navakal.1923@gmail.com

## दिल्लीत काँग्रेसची ७० दिवस पोलखोल यात्रा सुरू

**नवी दिल्ली-** दिल्लीत पुढील वर्षी होणाऱ्या महापालिका निवडणुकांसाठी काँग्रेस तयारीला लागली आहे. केजरीवाल सरकार आणि भाजपाच्या ताब्यात असलेल्या महापालिकांतील भ्रष्टाचाराचा पर्दाफाश करण्यासाठी दिल्लीतील प्रदेश काँग्रेसने आजपासून पोलखोल यात्रेला सुरुवात केली आहे. काँग्रेसची ही पोलखोल यात्रा ७० दिवस सुरु राहणार आहे. याबाबत अधिक माहिती देताना काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष अनिल कुमार चौधरी यांनी म्हटले की, आजपासून सुरु झालेल्या या पोलखोल यात्रेत काँग्रेस कार्यकर्ते ७० दिवस वेगवेगळ्या ७० विधानसभा क्षेत्रात कार्यक्रमांचे आयोजन करणार आहेत. तसेच आम आदमी पक्षाच्या सरकारमधील आणि भाजपाच्या ताब्यात असलेल्या महापालिकांमधील भ्रष्टाचार आणि निष्क्रियता समोर आणण्यासाठी ही पोलखोल यात्रा काढत काँग्रेस काढत असल्याचे चौधरी यांनी सांगितले. काँग्रेसची ही पोलखोल यात्रा ७० दिवसांत दिल्लीतील सर्व २७२ वॉर्डात फिरणार असून ७०० किमीचे अंतर पार करणार आहे.




# इंटरव्हलनंतरची कथा मी सांगणार! संजय राऊतांची धमकी
# वानखेडेंवर पुन्हा आरोप! खरे नाव समीर दाऊद वानखेडे

■ मुंबई

**राष्ट्रवादीचे** नेते नवाब मलिक यांनी आज सकाळी एनसीबीचे अधिकारी समीर वानखेडेंच्या संदर्भात दोन खळबळजनक ट्विट केले. या ट्विटमध्ये त्यांनी दोन फोटो शेअर केले. एका फोटोत समीर वानखेडेचा जुना फोटो ट्विट करत त्यांनी पहचान कौन? असे म्हटले आहे. तो फोटो समीर वानखेडेंच्या पहिल्या लग्नाचा आहे. वानखेडे यांचा पहिला विवाह डॉ. शबाना कुरेशी हिच्याशी झाला. दुसऱ्या ट्वीटमध्ये वानखेडेच्या जन्मदाखल्याचा फोटो आहे. या जन्माच्या दाखल्यावर खाडाखोड केलेली दिसून येते. त्यात त्यांच्या वडिलांचे नाव दाऊद वानखेडे असे लिहिलेले आहे. मलिक यांनी आरोप केला आहे की, वानखेडे यांच्या वडिलांनी धर्मांतरण केले. त्याआधारे बोगस जातप्रमाणपत्र त्यांनी मिळवून नोकरी मिळवली. त्यांच्या जीवनाची सुरुवात अशाप्रकारे बोगसरित्या सुरू झाली.




संजय राऊत यांनीही याबाबत बोलताना म्हटले की या प्रकरणातील साक्षीदार साईलच्या केसालाही धक्का लागणार नाही, याचा विश्वास मी तुम्हाला देतो. त्याला त्रास देण्याचा प्रयत्न होईल. पण आम्ही त्याच्या पाठीशी आहोत. या प्रकरणाचे धागेदोरे मुंबईच नव्हे तर दिल्लीपर्यंत आहेत. साईल हा अत्यंत महत्त्वाचा साक्षीदार आहे. त्याची सुरक्षा केली पाहिजे. गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांना मी बोललो आहे. राज्याला बदनाम करण्याचे षडयंत्र रचले गेले. पण या मुलाने बिंग फोडले. त्याच्या साहसाला मी दाद देतो. त्याने देशावर उपकार केले. मी त्याच्या धाडसाचे कौतुक करतो. हीच खरी देशभक्ती आहे. आता अनेक गोष्टी बाहेर येतील. भाजपाचे नेते ईडीचा खेळ करत आहे. त्यांनी या प्रकरणातसुद्धा मनी लॉन्ड्रिंग झाले आहे. आर्यनच्या शेजारी किरण गोसावी जवळ काळ्या रंगाच्या शर्टमध्ये आरामात बसलेला माणूस सॅम डिसोझा आहे. तो मुंबईतील मनी लॉन्ड्रिंग प्रकरणातील सर्वात मोठा खेळाडू आहे. तो मोठे राजकारणी, नेते, अधिकारी सर्वांचे मनी लॉन्ड्रिंग करतो असे म्हटले जाते. तो तिथे का बसला आहे? हा मोठा खेळ आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. मात्र संजय राऊत यांना मोहित भारती यांनी ट्विट करून आव्हान दिले आहे की, तुमचे ट्विट डिलीट करू नका, व्हिडिओमध्ये दिसणारी काळ्या कपड्यातील व्यक्ती कोणत्या पक्षाशी, राजकीय नेत्याशी संबंधित आहे ते सांगा. कुणाल जानीचे व्हॉट्सअॅप चेक करा.

पान २ वर

**क्रुझ ड्रग्स आणि आर्यन खान प्रकरणावरुन राज्यात जोरदार राजकारण सुरु आहे. एनसीबीचे अधिकारी समीर वानखेडे यांच्या बद्दलची रोज नवीन धक्कादायक माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते नवाब मलिक उघड करत आहेत. मलिक यांनी आज वानखेडे यांच्यावर अत्यंत गंभीर आरोप केला आहे की, समीर वानखेडे यांनी बोगस जन्म प्रमाणपत्र दाखवून नोकरी मिळवली. त्यांच्या बोगस प्रमाणपत्रावर वडिलांचे नाव दाऊद वानखेडे असे आहे. वानखेडे हे बोगस केसेस दाखल करून दहशत निर्माण करतात आणि पैसे कमवतात. त्यांच्या पत्नीच्या कंपनीत बिल्डरचा आणि हवाल्याने पैसा आला आहे. मलिकांबरोबर शिवसेनेचे खासदार संजय राऊतही आक्रमक झाले आहेत. त्यांनी मलिकांच्या आरोपांना दुजोरा दिला आहे. इंटरव्हलपर्यंत मलिक बोलले आहेत. या पुढची कथा मी सांगणार आहे, अशी धमकी संजय राऊत यांनी दिली आहे. दरम्यान समीर वानखेडे यांची उद्यापासून एनसीबीच्या तीन अधिकाऱ्यांकडून खात्यांतर्गत चौकशी होणार आहे.**

### पत्नीच्या कंपनीत बिल्डरचा पैसा



## वरळीच्या समुद्रात कोस्टल रोडचे बार्जेश मासेमारीस अडथळा! मच्छिमार आक्रमक

■ मुंबई

**कोस्टल** रोड प्राधिकरणाने वरळी कोळीवाड्याच्या मच्छिमारांना विश्वासात न घेता समुद्रातील येण्या-जण्याच्या मार्गावर मोठे बार्जेश आणून ठेवले आहेत. त्यामुळे मासेमारी करण्यास अडथळा निर्माण होत असल्याने वरळीचे मच्छीमार आक्रमक झाले आहेत. वरळीच्या समुद्रात मासेमारी करण्यासाठी मच्छीमार जाळी लावतात त्याठिकाणी कोस्टल रोड प्राधिकरणाने समुद्रात बार्जेसना जाण्यासाठी आणि नांगरण्यासाठी 'बोय' घातल्या आहेत. त्याचा फटका वरळी कोळीवाड्यातील मच्छिमारांना बसला आहे. कोस्टल रोडच्या बांधकामामुळे आधीच कोळीवाड्यातील



मच्छिमारांना मासेमारी करताना अडचणी येत आहे. आता त्यात या नवीन प्रकारामुळे मच्छिमारांना त्यांचा व्यवसाय करण्यापासून वंचित ठेवण्यात आहे. कोस्टल रोड बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) ३० मार्च २०१७ रोजी १४ अटी आणि शर्तींचे पालन करण्याच्या हमीवर मुंबई महापालिकेला ना-हरकत प्रमाणपत्र दिले होते. या प्रमाणपत्रमध्ये १४ व्या अटीत मच्छिमारांना त्यांचा व्यवसाय करण्यास अडथळा निर्माण झाल्यास आणि मच्छिमारांनी आक्षेप घेतल्यास दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्र अटींचा भंग केल्याचे गृहीत धरले जाणार असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे वरळीत मच्छिमारांना मासेमारी करण्यासाठी अडथळा निर्माण होत असल्याने ही ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करावी, अशी मागणी मच्छिमार संघटनेने 'एमएसआरडीसी'कडे केली.

## वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेला सुप्रीम कोर्टाकडून स्थगिती

■ नवी दिल्ली

**नीट** पीजी वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेला सुप्रीम कोर्टाकडून स्थगिती देण्यात आली आहे. आर्थिक आरक्षणाच्या वैधतेबाबत निर्णय होत नाही तोपर्यत ही स्थगिती असणार आहे. या आरक्षणासाठी ८ लाख रुपये मर्यादा कुठून आणली, असे विचारत सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकारला प्रश्न विचारला आहे. ऑल इंडिया कोटामध्ये ओबीसी आणि ईडब्ल्यूएस आरक्षण लागू करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाची वैधता निश्चित करेपर्यंत नीट पीजीच्या काउन्सिलिंगची प्रक्रिया स्थगित करण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकारला दिले आहेत. सुप्रीम कोर्टाने म्हटले की, नीट पीजी काऊन्सिलिंगवर तोपर्यंत स्थगिती लावण्याचे आदेश दिले जात आहेत जोवर केंद्र सरकारच्या ऑल इंडिया कोट्यामधील ओबीसी आणि ईडब्ल्यूएस आरक्षणाच्या वैधतेवर सुप्रीम कोर्टाकडून काही निर्णय घेतला जाणार नाही.

## एसटीच्या तिकीट दरात १७ टक्क्यांनी वाढ

■ मुंबई

**महाराष्ट्र** परिवहन महामंडळाने ऐन दिवाळीच्या तोंडावर एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. एसटीच्या तिकीट दरात तब्बल १७.१७ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. आज मध्यरात्रीपासून या नव्या भाडेवाढीचे दर लागू होणार आहेत. गेल्या काही महिन्यांपासून इंधनाच्या दरात सातत्याने भरमसाठ वाढ होत आहे. पेट्रोल-डिझेल महागल्यामुळे आर्थिक गणिते जुळवताना एसटी महामंडळाची दमछाक होत होती. परिणामी महामंडळाचा तोटा भरून काढण्यासाठी ही भाडेवाढ लागू करण्यात आली असल्याची माहिती एसटी महामंडळाकडून देण्यात आली.

## आनेवाडी टोलनाक्याजवळ एसटी जळाली

### सुदैवाने कोणतीही जीवितहानी टळली

■ सातारा

**पुणे** - बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर उडतारे गावच्या हद्दीत आनेवाडी टोलनाक्या जवळ चालत्या एसटीने पेट घेतल्याने खळबळ उडाली. काल रविवारी रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेत कोणीही जखमी अथवा जीवितहानी झाली नाही.

कोल्हापूर - अर्नाळा ही एसटी बस कोल्हापूरहून निघाल्यानंतर साताऱ्यात पोहचली.सातारा स्थानकात काही वेळ थांबून ही गाडी पुढे पुण्याकडे रवाना झाली. मात्र वाटेत आनेवाडी टोलनाक्याजवळ आल्यानंतर अचानक बसमधून धूर येऊ लागल्याने चालकाने ही बस बाजूला घेतली आणि सर्व प्रवाशांना तत्काळ खाली उतरून बस रिकामी केली. त्यानंतर फक्त काही मिनिटांत संपूर्ण एसटी बसने पेट घेतला. ही आग एवढी भीषण होती की एसटी जळून भस्मसात झाली. केवळ चालकाच्या सतर्कतेमुळे मोठी हानी टळली. या सर्व घटनेमुळे वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.भुईंज पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद झाली आहे.

## आयएएस अधिकारी अशोक खेमका यांची पुन्हा बदली! २९ वर्षात ५४ वेळा बदली

**चंदिगड-** देशातील सर्वाधिक वेळा बदलीसाठी प्रसिद्ध झालेले हरियाणातील १९९१ च्या बॅचचे आयएएस अधिकारी अशोक खेमका यांची पुन्हा बदली करण्यात आली आहे. त्यांच्या २९ वर्षांच्या प्रशासकीय सेवेतील ही ५४ वी बदली आहे.त्यांची हरियाणाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सचिव म्हणून बदली झाली आहे. त्यांच्या या बदलीचे नेमके कारण स्पष्ट केलेले नाही.मात्र खेमका यांनी डोंगराळ भागातील सुरक्षिततेबाबत सरकारचे अनेकदा लक्ष वेधले होते. कदाचित हेच बदलीचे कारण असल्याचे बोलले जात आहे. हरियाणा सरकारने शुक्रवारी वरिष्ठ आयएएस अधिकारी अशोक खेमका यांच्या बदलीचे आदेश दिले. ते सध्या पुरातत्त्व, पुरातत्व आणि संग्रहालय विभागात प्रधान सचिव म्हणून कार्यरत होते. आता त्यांची बदली हरयाणाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिवपदी करण्यात आली आहे. अशोक खेमकांच्या २९ वर्षांच्या कारकीर्दीत ५४ वेळा त्यांची बदली करण्यात आली आहे. यापूर्वी खेमका यांची एक वर्ष अकरा महिन्यांपूर्वी बदली करण्यात आली होते.

## नो बिंदी नो बिझनेस



**शेफाली वैद्य यांनी ज्वेलरच्या एका जाहिरातीला आक्षेप घेतला आणि त्यांच्याकडून काही विकत घ्यायचे नाही असा स्वतःचा निर्णय जाहीर केला. त्यांचा हा विरोध इतका व्हायरल झाला की, त्या ज्वेलर्सला आपली जाहिरात बदलावी लागली. दिवाळी सणाच्या जाहिरातीत मोडेलच्या कपाळावर कुंकू का नाही हा त्यांचा सवाल होत. त्या म्हणतात, तुम्ही कुंकू लावा नाहीतर तुमच्या नेहमीच्या कळकट्ट पारोश्या घाणेरड्या अवतारात झिंज्या सोडून नाचा तो तुमचा प्रश्न आहे.**

**सध्या** सोशल मीडियावर 'हॅशटॅग नो बिंदी नो बिजनेस' चा ट्रेंड तुफान व्हायरल होताना दिसत आहे. तथाकथित जाहिरातींमधून झळकणाऱ्या मॉडेल्सनी टिकली न लावण्याने मी तरी तो ब्रँड खरेदी करणार नाही अशा मताच्या लेखिका आणि ब्लॉगर असलेल्या शेफाली वैद्य यांनी त्यांचं मत मांडलं आहे. हिंदूंचे सण आले की तुमचे ब्रँड खपवण्यासाठी तुमच्या जाहिरातीत तशाच स्वरूपाच्या मॉडेल तुम्ही दाखवत नाहीत यावर त्यांनी आक्षेप घेतला आहे. याबद्दल त्या अधिक काय म्हणाल्या ते पाहुयात ओ फेमिनिष्ठ तै, तुम्ही कुंकू लावा नाहीतर तुमच्या नेहमीच्या कळकट्ट पारोश्या घाणेरड्या अवतारात झिंज्या सोडून नाचा, तो तुमचा प्रश्न आहे. मी काही फतवा काढलेला नाहीये की सर्व लेडीस बायकांनी बिंदी लावलीच पाहिजे. फतवा काढणारे लोक वेगळे असतात आणि तेव्हा तुम्ही 'इट्स कल्चरल यु नो' म्हणून बुरख्यापासून ते FGM पर्यंत सगळ्याचं

पान २ वर

## उत्तर प्रदेशमध्ये सत्ता आल्यावर १० लाखांपर्यंतचा उपचार मोफत

■ नवी दिल्ली

**आगामी** उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत विजय होण्यासाठी काँग्रेसच्या सरचिटणीस आणि उत्तर प्रदेशप्रभारी प्रियांका गांधी अनेक महत्त्वाच्या घोषणा करत आहेत. अशात आता सोमवारीही त्यांनी आणखी एक घोषणा केली. उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसचे सरकार स्थापन झाल्यास१० लाखांपर्यंतचे उपचार मोफत होणार असल्याची घोषणा प्रियंका गांधींनी ट्वीटद्वारे केली.आता त्यांच्या घोषणावरून भाजपचे नेते आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ कशा पद्धतीने उत्तर देतील, हे आता पाहावे लागेल. प्रियंका गांधींनीआपल्या ट्वीटमध्ये लिहिले की, कोरोना काळात आणि आता राज्यात पसरलेल्या तापेवरुन उत्तर प्रदेश सरकारचे राज्याकडे दुर्लक्ष असल्याचे जाणवतं आहे. आरोग्य व्यवस्थाही पूर्णपणे जीर्ण झाली आहे. पण, आता स्वस्त आणि चांगल्या उपचारासाठी जाहीरनामा समितीच्या संमतीने उत्तर प्रदेश काँग्रेसने निर्णय घेतला आहे की, काँग्रेसचे सरकार स्थापन झाल्यावर कोणता १० लाखांपर्यंतचा उपचार मोफत होईल. प्रियंका गांधी शनिवारी बाराबंकी येथे म्हणाल्या की, काँग्रेसचे सरकार स्थापन झाल्यास शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ केले जाईल.

### प्रियांका गांधीचे ट्वीटद्वारे घोषणा

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
मोबा.८१०८११६४२३

## पाहिजेत

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) (राहण्या-खाण्याची सोय) **9820234040** (Thane) {NC210832}

कंपनीला परमनन्ट मुले-मुलींची भर्ती 18000/ - - 35000/- राहणे जेवण **8097795145** {NCC211218}

पाहिजेत सिक्युरिटी गार्ड / वेटर / हेल्पर. मुंबई / नवी मुंबई / ठाणे - **8097231618.** {NC210787}

कंपनीला ड्रायफुट, फरसाण, बुक, गारमेंट, पॅकिंग, हेल्पर, हाऊसकिपिंग, सिक्युरीटी, ऑफिसीयल, मुला-मुलींची परमनंट भर्ती कमवा. 12500-25000/- शिक्षण नाही. **8291353332** {NCC211223}

घरी बसून लिखाण काम 7 दिवसांचा पगार 15000/- : साक्षी **8591555848** {NC210740}

आश्रममध्ये कामासाठी पुरुष/महिला पाहिजेत राहणे-खाणे फ्री, पगार 6000 - 8000. मीरारोड/ऐरोली/सफाळे. संपर्क - **8779694066** {NCC211253}

सिक्युरिटी गार्ड पाहिजेत पगार 18500 कल्याण ठाणे अंधेरी, **9702063944** {NCC211262}

प्रि लॉन्च घर ऑफिसमध्ये जॉब, तुमच्या सोयीने प्रॉपर्टी विक्रीचे काम करा. कॉलेज मुलं, मुलींना प्राधान्य. ३ बुकिंगवर आयफोन फ्री किंवा दीपावली आधीच 1,00,000 रोख मिळविण्यासाठी संधी **8433608647 / 8433607396** {NCC211273}

कारखान्यासाठी पाहिजेत. १) शॉप सुपरवायझर - DME 10 वर्षे अनुभव. 2) CNC ऑपरेटर - ITI, NCTVT, 2-3 वर्षे अनुभव. 3) वेल्डर - ITI, NCTVT, 2-3, वर्षे अनुभव. एन्सेपाटेक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई-नाशिक महामार्ग, भिवंडी. Email : beloshe@ensepatec.com. **022-49620599** {NC210827}

प्रायव्हेट लिमिटेड कंपनीसाठी मुले/मुली पाहिजेत. सुरुवातीला पगार 12500 - 22500 + बोनस + प्रॉव्हिडंट फंड (दादर) **9326069963** {NCC211271}

TAJ कंपनीमध्ये मुले-मुलींची अर्जंट भर्ती कमवा. 13500 - 25,000/- बोनस + राहणे फ्री अंधेरी (WEST), **9920483945** {NCC211276}

कुरिअर कंपनीसाठी डिलिव्हरीसाठी मुले पाहिजेत. अटी - मोबाईल (Android) असणे गरजेचे. 12वी पास प्रमाणपत्र घेऊन येणे इंटरव्ह्यु वेळ - 11-4 डिलिव्हरीसाठी ठिकाण दादर - माहिम, चर्चगेट-नरीमन पॉईंट, सायन - कुर्ला - घाटकोपर दररोज रोख पैसे 500 + बस तिकीट पत्ता :- 191-B, 9th Cavel X lane, 1st Floor, Dr. Vigas Street, Kalbadevi, Mumbai 02. {NC1211265}

आयुर्वेदिक प्रोडक्टच्या स्टॉलवर सेल्ससाठी मुले/मुली/महिला पाहिजेत. प्रशिक्षण दिले जाईल. **8828067048** {NC210828}

## पाहिजेत

काजू, बदाम, चॉकलेट, सोडा, टिकली, अगरबत्ती, मेणबत्ती, ज्वेलरी पॅकिंग. : **7710018373** {NC210824}

इमीटेशन कामासाठी मुली पाहिजे. बोरीवली (वेस्ट), स्टेशनजवळ **9702989250 / 9372696771** {NCC211248}

विक्रोळीमध्ये आयुर्वेदिक औषधाच्या प्रमोशनसाठी महिला / मुली पाहिजेत. फिक्स पेमेंट 8000 + 1000 प्रवास : **7276715247 / 8169558670** {NCC211233}

जिरे, मोहरी, धणे, सुगंधी उटणे पॅकिंग हप्त्याला १२००० कमवा : **8425896515** {NC210823}

पॅकिंगसाठी मुले/मुली/महिला पाहिजेत पगार घणसोली - 10865 / रबाळे - 11325 / तुर्भे - 12352 / मानकोली - 11367 / आसनगाव 12000 - संपर्क - **9769575757 / 9819182176** {NC210762}

5 स्टार हॉटेलमध्ये हाऊसकिपींगसाठी मुले अर्जंट पाहिजेत. 9 तास - 10,500, 15 तास 18,000/- **(9920792845 / 9819200248 )** {NC210783}

मालाड (ईस्ट) स्टेशन जवळ पुरुष / स्त्री टेलीकॉलर पाहिजेत. पगार ८-१० हजार पर्यंत. मराठी बोलायला सक्षम. वय ३० खाली. **9222222248** {NC210829}

नामांकित कंपनीला ठाणे येथे हाऊसकिपर / प्लंबर / इलेक्ट्रिशियन, ट्राफिक वार्डन त्वरित पाहिजेत. **8591972464** {NC210830}

## Situation Vacant

Female Assistant with computer knowledge & basic English required for Property Consultant at Sion. Attractive. Salary+ Incentives. Call **9321110202.** {NC210803}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७ वी नापास? डायरेक्ट १०वी. ११ वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली : **9820627580 / 9820904646** {NCC211181}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हर्मेंट सर्टिफाईड GNM / ANM NURSING ASSISTANT, DMLT, OT, ICU, XRAY. DIALYSIS, OPTOMETRY, PHYSIOTHERAPY ''आेमइन्स्टटचुट'' **8080502190 / 9820258768 / 7666617771** {NCC210347}

## Education

DO DIRECT SSC, HSC, BA, BCOM, BSC, BTECH, B.ED **9168088740** {NCC211209}

## व्यवसाय विषयक

सीएफएल/एलईडी बल्ब जोडणीचे काम करून १ लाखापर्यंत उत्पन्न मिळवा. - **8788254775, 9422850593** {NCC210686}

!! श्री सद्‌गुरू कृपा !! BHHARATI AGARBATTI WORKS नेटवर्क कंपनी मार्फत वास्तुकुबेर अर्कबत्ती/अगरबत्तीची विक्री करुन महिना 22,000 नफा मिळवा. संपर्क **8422979458** {NCC211245}

बॅनर डीझायनींग, पोस्टर डीझायनींग, फोटो एडीटींग, पॅमप्लेट, बीझनेस कार्डची डिझाईन रास्त दरात करून मिळतील. श्री भगवती आर्टस् - **9167877653** वेळ स 11 ते सं 6. {NC210808}

## कर्ज विषयक

LIC पॉलिसीवर ताबडतोब कॅश/कर्ज विसावा हॉटेलजवळ दादर (पश्चिम), सावंत - **9221357947** {NC210693}

दिवाळी स्पेशल सर्व प्रकारची कर्जे बिजनेस/पर्सनल/ हाऊसिंग लोन, कमी कागदपत्रे, कमी वेळेत त्वरित मिळतील. **7715968829** {NC210831}

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# टीम इंडियाचा खेळाडू 'विदर्भ तुफान' उमेश यादव



उमेश यादवला खरेतर भारतीय लष्करात भरती होऊन देशसेवा करायची होती. परंतु, तिथे त्याला यश न मिळाल्याने पोलिस हवालदार तरी व्हावे, यासाठी त्याने प्रयत्न केला. दुर्दैवाने, तेथेही अवघ्या दोन गुणांनी तो अनुत्तीर्ण झाला अन् तेथेच भारतीय क्रिकेटला एक गुणी खेळाडू गवसला. उमेशचे वडील तिलक यादव नागपूरजवळील खापरखेडा कोळशाच्या खाणीत काम करीत असल्याने शिक्षण जेमतेम. फार मोठी महत्त्वाकांक्षा असण्याचा प्रश्न नव्हता. परंतु, नोकरीची संधी गमावल्यानंतर त्याने स्थानिक क्रिकेट स्पर्धेत रस घ्यायला सुरुवात केली आणि त्याच्यातील सुप्त हिऱ्यास पैलू पडण्यास प्रारंभ झाला. विदर्भ जिमखान्याकडून त्याला संधी मिळाली. २००८ मध्ये उमेशला पहिल्यांदा रणजी खेळण्याची संधी मिळाली. पहिल्याच डावात त्याने ७५ धावा देऊन ४ बळी मिळवले. नंतर त्याने मागे वळून पाहिले नाही. दुलीप ट्रॉफी सामन्यात द्रविड व लक्ष्मण यांची विकेट काढणाऱ्या उमेशकडे निवड समितीचे लक्ष गेले नसते तरच नवल! भारतीय संघात निवड होणारा तो विदर्भातील पहिलाच खेळाडू ठरला, यावरून त्याची प्रतिभा लक्षात यावी. जबरदस्त यॉर्कर अन् आक्रमक गोलंदाजीसाठी ओळखला गेलेला उमेश नेहमीच फलंदाजांसाठी कर्दनकाळ ठरला आहे. वेगाबरोबर अचूक दिशा साधण्याच्या अफाट कर्तृत्वाच्या जोरावर उमेशने संघातले आपले स्थान निश्चित केले. विंडीजविरुद्धच्या हैदराबाद कसोटीत दहा बळी घेऊन त्याने सामनावीर किताब पटकावला. ४० कसोटीत ११७, तर ७१ वन डेमध्ये १०५ गडी बाद करून उमेशने 'विदर्भ तुफान' म्हणून मिळालेले नाव सार्थ ठरविले आहे. उमेशची पत्नी तान्या वाधवा ही फॅशन डिझायनर आहे

**संजीव वेलणकर, पुणे**

# प्रख्यात सारंगी वादक पंडित ध्रुव घोष



ध्रुव घोष यांचे कुटुंब संगीताशी निगडित होते. भारतीय वाद्यांच्या दुनियेत बासरी या वाद्याला अग्रस्थान मिळवून देणारे पन्नालाल घोष हे त्यांचे काका. ज्येष्ठ तबलावादक निखिल घोष हे वडील,तर पंडित नयन घोष यांचे धाकटे बंधू. अशा तालेवार कुटुंबात राहून ध्रुव यांनी सारंगी हे वाद्य हाती घेतले.घोष यांनी देशभरात एकल सारंगीवादक म्हणून स्थान मिळवले. त्यांचे सारंगी वादन भारताबाहेरही आवडीने ऐकले जाते. आजमितीस उत्कृष्ट सारंगी वाजवणाऱ्या कलावंतांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याएवढीच आहे. यामुळेच ध्रुव घोष यांचे महत्त्व अधोरेखित होते. भारतीय संगीतपरंपरेतील या एका अत्यंत महत्त्वाच्या वाद्याकडे त्यांचे लक्ष गेले आणि त्यांनी त्यावर प्रचंड कष्ट घेऊन आपली सारी प्रतिभा पणाला लावून हे वाद्य आपलेसे केले. ध्रुव घोष यांनी या वाद्यावर स्वतःचे तंत्र विकसित केले. तंतुवाद्यवादनात तारेची सुरेलता सर्वात महत्त्वाची असते. ध्रुव यांनी या वाद्यात काळानुरूप तांत्रिक बदल केले. त्याच्या वादनतंत्रातही वेगळा विचार केला. त्यामुळेच सारंगीवादनातील प्रसिद्ध अशा बुंदू खान यांच्या घराण्यातील ज्येष्ठ वादक सगीरुद्दीन खाँ यांची शिस्तबद्ध तालीम मिळूनही घोष यांच्या वादनात राम नारायण यांच्या वादनशैलीची छाप दिसत असे. पाश्चात्त्य संगीतातील वादकांबरोबर सारंगीची नाळ जोडणाऱ्या फ्यूजनलाही ध्रुव यांनी आनंदाने होकार दिला. जागतिक संगीतात सारंगीने केलेला हा प्रवेश लोकप्रिय ठरला, याचे कारण ध्रुव यांची या संगीताकडे बघण्याची स्वागतशील दृष्टी. भारतीय विद्या भवनाच्या संगीत नर्तन विभागाची जबाबदारी त्यांच्याकडे होती. मध्य प्रदेश सरकारतर्फे त्यांना सारंगीवादक उस्ताद अब्दुल लतीफ खान यांच्या नावाचा पुरस्कारही मिळाला होता.

# इंटरव्हलनंतरची कथा मी सांगणार! संजय राऊतांची धमकी

पान १ वरून

कोणता कॅबिनेट मंत्री त्याच्या वांद्रे येथील रेस्टॉरंटला नेहमी जातो ते सांगा. कुणाल जानी हा बांद्रातील हॉटेल व्यावसायिक असून दिवंगत अभिनेता सुशांत सिंग राजपूतचा मित्र आणि शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्राचा बिझनेस पार्टनर आहे. शाहरुख खान सोबत त्याचे जवळचे संबंध असल्याचे म्हटले जाते. कुणाल जानी हा अभिनेता सुशांतसिंह राजपूत प्रकरणी अटकेत होता. दोन आठवड्यांपूर्वी त्याला जामिन मिळाला. त्याने रिया आणि सुशांतसिंह यांना ड्रग्ज पुरविल्याचा आरोप आहे. ड्रग्ज आणि ग्राहक यांची मध्यस्थी केल्याचाही त्याच्यावर आरोप आहे. दरम्यान, एनसीबीवर होणाऱ्या आरोपांविरोधात एक याचिका सत्र न्यायालयात एनसीबीच्या वतीने दाखल केली होती. मात्र आता हे प्रकरण उच्च न्यायलयात असल्याने ती याचिका सत्र न्यायालयाने फेटाळून लावली आहे. समीर वानखेडे यांच्यावर विविध आरोप होऊ लागल्यानंतर त्यांनी आरोपांचे खंडन करणारे प्रतिज्ञापत्र मुंबई सत्र न्यायालयात दाखल केले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, माझ्या आजवरच्या कारकीर्दीत मी कधीही चुकीचा वागलो नाही. मी क्रुझ ड्रग्ज प्रकरणाचा पर्दाफाश केल्याने मला लक्ष्य केले जात आहे. माझ्या कुटुंबियांवर आरोप केले जात आहेत. माझ्यावर वैयक्तिक हल्ले करण्यात येत आहेत. माझ्यावर राजकीय पक्षाचा दबाव आहे. माझ्यावर चुकीचे आरोप करुन बदनामी केली जाते आहे . माझ्या वडिलांचे नाव ज्ञानदेव वानखेडे आहे. ते हिंदू होते. आई झहीदा हि मुस्लीम होती. माझे २००६ साली पहिलं लग्न झाले होते. त्यानंतर २०१७ ला अभिनेत्री क्रांती रेडकरसोबत पुन्हा विवाहबद्ध झालो. ज्या महिलेसोबत माझा घटस्फोट झाला आहे तिच्यासोबतचा फोटो कुणाच्या परवानगीने व्हायरल करण्यात आला? एका घटस्फोटित महिलेलाही सोडलं गेलं नाही. इतक्या खालच्या पातळीवर आरोप होत आहेत असंही समीर वानखेडे यांनी म्हटलं आहे. माझे खोटे दस्तावेज प्रसिद्ध केले आहेत. माझ्या मूळ गावी जा आणि तपासा. आपला जो जन्मदाखला सोशल मीडियावर प्रसिद्ध केला जात आहे, तो खोटा आहे. माझ्यावर कितीही शिंतोडे उडवायचे ते उडवा. या तपासाला भरकटवण्याचा प्रकार आहे. अतिशय खालच्या दर्जाची चिखलफेक सुरू आहे. या सर्वांबाबत लवकरच जाहीर खुलासा करणार असल्याचे समीर वानखेडे यांनी म्हटले आहे. क्रुझ ड्रग्ज आणि आर्यन खान प्रकरणात आता भाजप आमदार नितेश राणे यांनीही उडी घेतली आहे. आपण लवकरच सुशांतसिंह प्रकरणी महत्वाची व्हिडीओ क्लिप समोर आणणार असल्याचा इशारा त्यांनी ट्विट करत दिला आहे. एनसीबीच्या छापेमारीची पोलखोल करणाऱ्या किरण गोसावीचा बॉडीगार्ड प्रभाकर साईल याने आज पोलीस मुख्यालयात धाव घेऊन संरक्षणाची मागणी केली आहे. क्राईम ब्रांचचे प्रमुख मिलिंद भांबरे यांना एक निवेदन दिले आहे.त्यानंतर त्याला संरक्षण देण्यात आले आहे. तर फरार झालेला क्रुझ ड्रग्ज पार्टीतील पंच किरण गोसावी याच्या शोधासाठी पुणे पोलिसांनी दोन पथकं तयार केली आहेत. त्याचे शेवटचे लोकेशन आगरतळा येथील असून पोलीस आगरतळा येथे जाऊन त्याचा शोध घेत आहेत. दरम्यान, आज एनसीबीने चौकशीसाठी अभिनेत्री अनन्या पांडेला बोलावले होते. मात्र तिने वैयक्तिक कारण देऊन चौकशीला हजर राहणे टाळले. उद्या बॉलीवूड स्टार शाहरुख खानचा पुत्र आर्यन खान याच्या जामिन अर्जावर सुनावणी होणार आहे.

# मुंबईत कोरोनाचे २७६ नवे रुग्ण

**मुंबई** - मुंबईत गेल्या २४ तासांत २७६ नवे कोरोनाबाधित रुग्ण आढळून आले आहेत. तर ३५१ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. मुंबईत आतापर्यंत ७,३१,०६५ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. मुंबईचा रिकव्हरी रेट ९७ टक्के झाला आहे. तर मुंबईत एकूण सक्रिय ४१४४ रुग्ण आहेत. मुंबईत रुग्ण दुपटीचा दर १,३१४ दिवसांवर पोचला आहे. कोरोना वाढीचा दर (१८ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर) ०.०५ टक्क्यांवर गेला आहे.


**निकाल — गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी** (महाराष्ट्र राज्य लॉटरी) सोडत संध्या. 5:00

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 35 • तिकीट किं. रु.10/- • सोडत दिनांक 25/10/2021

पहिले बक्षिस रु. 10000/- — जिंकले MG-03 : 2159 — महाराजा असोसिएट्स कोल्हापूर

सर्व मालिकांसाठी • सर्व मालिकांसाठी — बक्षिस

| | | |
|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 5212 रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली — प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण (5 बक्षिसे) |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 6093 रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली — लकी लॉटरी - अहमदनगर (5 बक्षिसे) |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 6677 रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली — श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे (5 बक्षिसे) |

पाचवे बक्षिस रु. 400/- सर्व मालिकांसाठी — पाचवे बक्षिस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1537 | 2721 | 3331 | 3936 | 4591 | 5295 | 5899 |
| | | 1700 | 2730 | 3353 | 3938 | 4797 | 5356 | 6272 |
| | | 1711 | 2734 | 3489 | 4066 | 4843 | 5458 | 6362 |
| | 1152 | 1713 | 2773 | 3552 | 4084 | 4874 | 5497 | 6429 |
| 1012 | 1265 | 1761 | 2784 | 3679 | 4244 | 4877 | 5512 | 6494 |
| 1102 | 1266 | 1793 | 3169 | 3710 | 4422 | 4883 | 5567 | 6820 |
| 1128 | 1508 | 1878 | 3234 | 3790 | 4437 | 4961 | 5597 | 6949 |
| 1145 | 1524 | 2286 | 3265 | 3833 | 4470 | 5098 | 5643 | 6966 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

**महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम वीकली लॉटरी** सोडत सायं. 4:45 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 35 • तिकीट किं. रु.20/- • सोडत दिनांक 25/10/2021

पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- — GL-09 : 2197

दुसरे बक्षिस रु. 1000/- सर्व मालिकांसाठी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 1716 | 2092 | 2650 | 3459 |
| | 1765 | 2117 | 2769 | 3554 |
| 1101 | 1792 | 2172 | 2801 | 3617 |
| 1117 | 1931 | 2215 | 2882 | 3623 |
| 1262 | 1938 | 2348 | 2946 | 3737 |
| 1518 | 1990 | 2486 | 3246 | 3832 |
| 1662 | 2076 | 2645 | 3399 | 3913 |

जिंकले! जिंकले!! आजच्या सोडतीत रु.1000x5 = रु.5000 ची अंदाजित 23 बक्षिसे जिंकली

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

**सागरलक्ष्मी विकली लॉटरी** (महाराष्ट्र राज्य लॉटरी) सोडत दर सोमवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 35 • सोडत दिनांक 25/10/2021

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — SL-00 : 1438

उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 1438 — डायमंड कॉर्पोरेशन - बोरिवली, बारड लॉटरी सेंटर - सोलापूर

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1536 | 1707 | 2176 | 3598 | 3718 | 4000 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 2603 | 2708 | 3780 | 4460 | 4962 | 6824 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1442 | 1916 | 2478 | 3006 | 3896 | 6080 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1421 | 1589 | 2228 | 2773 | 4058 | 5419 |

रु. 100/- (सर्व मालिकांसाठी) — सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1754 | 2237 | 2534 | 3069 | 3437 | 3934 | 4351 | 4711 | 5175 | 5554 | 5948 | 6342 |
| | | 1765 | 2238 | 2561 | 3073 | 3442 | 3937 | 4354 | 4714 | 5184 | 5555 | 5951 | 6363 |
| 1008 | 1228 | 1806 | 2243 | 2582 | 3083 | 3444 | 3939 | 4390 | 4719 | 5185 | 5561 | 5967 | 6456 |
| 1010 | 1290 | 1813 | 2246 | 2592 | 3122 | 3449 | 3963 | 4403 | 4727 | 5191 | 5569 | 5975 | 6463 |
| 1011 | 1301 | 1840 | 2249 | 2598 | 3128 | 3464 | 3977 | 4413 | 4737 | 5213 | 5584 | 5989 | 6498 |
| 1013 | 1313 | 1859 | 2257 | 2608 | 3129 | 3468 | 3980 | 4430 | 4747 | 5215 | 5590 | 6022 | 6520 |
| 1019 | 1319 | 1861 | 2259 | 2618 | 3201 | 3470 | 3983 | 4435 | 4749 | 5222 | 5596 | 6029 | 6580 |
| 1027 | 1366 | 1904 | 2264 | 2658 | 3244 | 3503 | 3987 | 4445 | 4779 | 5234 | 5608 | 6060 | 6584 |
| 1047 | 1387 | 1911 | 2265 | 2660 | 3245 | 3520 | 4020 | 4447 | 4803 | 5235 | 5615 | 6061 | 6596 |
| 1067 | 1388 | 1918 | 2272 | 2662 | 3259 | 3531 | 4027 | 4452 | 4809 | 5264 | 5616 | 6064 | 6634 |
| 1071 | 1400 | 1921 | 2273 | 2666 | 3266 | 3537 | 4034 | 4453 | 4811 | 5276 | 5628 | 6065 | 6637 |
| 1075 | 1423 | 1949 | 2274 | 2672 | 3290 | 3555 | 4044 | 4465 | 4823 | 5281 | 5629 | 6069 | 6657 |
| 1088 | 1426 | 1964 | 2282 | 2690 | 3293 | 3574 | 4051 | 4469 | 4829 | 5305 | 5636 | 6073 | 6675 |
| 1091 | 1434 | 1978 | 2290 | 2697 | 3301 | 3589 | 4057 | 4470 | 4834 | 5354 | 5642 | 6087 | 6676 |
| 1099 | 1442 | 1992 | 2291 | 2712 | 3302 | 3622 | 4080 | 4474 | 4838 | 5355 | 5644 | 6103 | 6681 |
| 1107 | 1461 | 2022 | 2292 | 2714 | 3304 | 3639 | 4101 | 4477 | 4845 | 5356 | 5656 | 6112 | 6682 |
| 1110 | 1482 | 2023 | 2298 | 2734 | 3317 | 3680 | 4114 | 4482 | 4847 | 5358 | 5694 | 6117 | 6695 |
| 1111 | 1512 | 2024 | 2308 | 2746 | 3319 | 3689 | 4119 | 4487 | 4858 | 5366 | 5713 | 6160 | 6733 |
| 1114 | 1521 | 2030 | 2333 | 2846 | 3326 | 3693 | 4127 | 4495 | 4867 | 5380 | 5755 | 6163 | 6740 |
| 1117 | 1528 | 2035 | 2340 | 2857 | 3327 | 3713 | 4136 | 4499 | 4880 | 5381 | 5756 | 6171 | 6756 |
| 1120 | 1529 | 2065 | 2347 | 2872 | 3330 | 3725 | 4148 | 4503 | 4882 | 5423 | 5764 | 6186 | 6800 |
| 1124 | 1531 | 2068 | 2356 | 2882 | 3332 | 3730 | 4174 | 4520 | 4892 | 5441 | 5768 | 6200 | 6809 |
| 1140 | 1541 | 2069 | 2365 | 2883 | 3333 | 3731 | 4179 | 4539 | 4893 | 5452 | 5777 | 6202 | 6817 |
| 1144 | 1551 | 2079 | 2370 | 2898 | 3344 | 3733 | 4184 | 4540 | 4907 | 5458 | 5785 | 6209 | 6834 |
| 1159 | 1552 | 2109 | 2378 | 2910 | 3362 | 3734 | 4188 | 4543 | 4920 | 5460 | 5786 | 6210 | 6846 |
| 1162 | 1560 | 2127 | 2380 | 2923 | 3363 | 3765 | 4195 | 4550 | 4924 | 5507 | 5787 | 6212 | 6856 |
| 1165 | 1598 | 2150 | 2422 | 2932 | 3364 | 3799 | 4208 | 4559 | 4943 | 5512 | 5799 | 6213 | 6863 |
| 1170 | 1637 | 2164 | 2437 | 2939 | 3365 | 3817 | 4209 | 4584 | 4944 | 5523 | 5828 | 6236 | 6865 |
| 1171 | 1640 | 2204 | 2440 | 2953 | 3369 | 3820 | 4232 | 4611 | 4987 | 5525 | 5845 | 6239 | 6867 |
| 1173 | 1641 | 2213 | 2464 | 2955 | 3374 | 3843 | 4237 | 4614 | 5005 | 5530 | 5846 | 6260 | 6896 |
| 1176 | 1672 | 2219 | 2485 | 2970 | 3375 | 3873 | 4243 | 4639 | 5088 | 5533 | 5847 | 6261 | 6897 |
| 1182 | 1700 | 2221 | 2493 | 2976 | 3377 | 3883 | 4252 | 4641 | 5089 | 5535 | 5860 | 6286 | 6906 |
| 1190 | 1707 | 2223 | 2498 | 3008 | 3378 | 3899 | 4265 | 4650 | 5155 | 5541 | 5875 | 6289 | 6961 |
| 1199 | 1715 | 2225 | 2499 | 3013 | 3390 | 3900 | 4271 | 4674 | 5157 | 5542 | 5895 | 6299 | 6962 |
| 1217 | 1716 | 2227 | 2502 | 3027 | 3397 | 3903 | 4324 | 4681 | 5163 | 5548 | 5915 | 6316 | 6978 |
| 1225 | 1742 | 2232 | 2524 | 3030 | 3399 | 3918 | 4330 | 4705 | 5165 | 5552 | 5935 | 6326 | 6981 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


# राशी भविष्य

**संजय मनोहर**

**मंगळवार, दि. २६ ऑक्टोबर २०२१**

**मेष :** साचून राहिलेल्या कामांना गती मिळेल. हातात पैसे आल्याने जुन्या इच्छा पूर्ण होतील. कलाकारांना पैसा, प्रसिद्धीचे योग.

**वृषभ :** चौकशीअंती केलेली खरेदी समाधान देईल. संततीशी थोडे हिशोबी राहाणे गरजेचे ठरेल. धार्मिक कार्यात भाग घ्याल.

**मिथुन :** संयमाने अडचणीवर मात करू शकाल. कौटुंबिक ताणतणावास सामोरे जाल. काहींना कमी श्रमात अधिक लाभ.

**कर्क :** गरजूंना काम मिळेल. नवीन ओळखी फायद्याच्या ठरतील. घरातील धार्मिक वातावरण प्रसन्नता वाढवेल.

**सिंह :** सार्वजनिक ठिकाणी मनाचा तोल सांभाळावा. कमी श्रमात अधिक लाभ संभवतो. कलाकारांना पैसा, प्रसिद्धीचे योग.

**कन्या :** फारसे कोणाच्या भानगडीत पडू नये. नातेवाईकांशी मतभेद संभवतात. जुन्या पिढीकडून फायदा संभवतो.

**तूळ :** काहींना अचानक धनलाभाचे योग. तुमचा सल्ला इतरांना फायद्याचा ठरेल. प्रलंबित प्रश्न मार्गी लावू शकाल.

**वृश्चिक :** छोट्या कारणामुळे कामे पुढे ढकलली जातील. संततीच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करू नये. प्रवास कार्यसाधक ठरतील.

**धनु :** नोकरीत हितशत्रूंचे कारनामे हाणून पाडाल. मित्र, नातेवाईकांच्या आश्वासनामागे जाऊ नये. सत्संगाचा लाभ होईल.

**मकर :** तुमच्या ज्ञानात, माहितीत भर पडेल. किरकोळ गोष्टींकडे दुर्लक्ष करू नये. काही अपेक्षित गोष्टी घडतील.

**कुंभ :** दिलेला शब्द पाळावा लागेल. तात्पुरत्या प्रलोभनांना बळी पडू नये. संततीच्या अपेक्षा पूण करू शकाल.

**मीन :** नोकरीत वरिष्ठांचा ताण राहील. भावाबहिणीशी थोडे मुत्सद्दीपणाने वागावे लागेल. तरुणांना प्रेमप्रकरणात यश संभवते.

# नो बिंदी नो बिझनेस

पान १ वरून

समर्थन करता. मी स्पष्टपणे ब्रँडसना सांगतेय की दिवाळीच्या प्रॉडक्टसची जाहिरात करताना लक्षात ठेवा की दिवाळी हा एक हिंदू सण आहे. हिंदूंचे पैसे पाहिजेत ना, मग हिंदू परंपरांचा, हिंदू रितीरिवाजांचा सन्मान करायला शिका. आमच्या सणामध्ये भुंड्या कपाळाच्या बायका सुतकी चेहेऱ्याने वावरत नाहीत, मग जाहिरातीत तरी असं का असावं? नो बिंदी नो बिजनेस हा हॅशटॅग सुरु करताना स्पष्ट म्हटलं होतं की हा माझ्यापुरता निर्णय आहे. माझे कष्टाचे पैसे आहेत, ते कशावर खर्च करायचे ते मी ठरवणार. हॅशटॅग ट्रेंड झाला तो इतर खूप लोकांना माझ्यासारखंच वाटत होतं म्हणून. मी फक्त त्या खदखदीला वाट करून दिली. आतापर्यंत हा हॅशटॅग फक्त ट्विटर वर जवळजवळ सात लाख लोकांनी बघितलाय. त्यातल्या अर्ध्या लोकांनी जरी हे खरोखर मनावर घेतलं तर ब्रँडस ना झक्कत बदलावंच लागेल, आणि तिथेच तर वोक लिबटर्ड लोकांची वाट लागलेली आहे. कारण त्यांना हे स्पष्ट दिसतंय. माझ्यावर जितकी वैयक्तिक चिखलफेक होते आहे तितकाच हा विचार जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचतोय आणि तेच तर मला अभिप्रेत आहे. एक पैसाही प्रमोशन वर न खर्च करता माझा विचार आज फेसबुक आणि ट्विटर मिळून दहा लाख लोकांपर्यंत पोचलाय, तुम्ही बसा माझ्या नावाने बोटं मोडत आणि आक्रस्ताळा थयथयाट करत! शेफाली वैद्य यांनी स्पष्ट शब्दात अगोदरच सांगितलं होतं की हा त्यांचा वैयक्तिक निर्णय आहे. त्यांच्या या निर्णयाचे अनेकांनी स्वागत केले आहे त्यांच्या समर्थनार्थ 'हॅशटॅग नो बिंदी नो बिजनेस' हा ट्रेंड आता सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. तर अनेकांनि त्यांच्या या मताला विरोध देखील दर्शवलेला पाहायला मिळतो आहे.

# शाहरुख खानने भारत सोडून पाकिस्तानात स्थायिक व्हावे

**पाकमधील सेलिब्रेटींचा सल्ला**

**कराची-** क्रुझवरील ड्रग्ज पार्टी प्रकरणी एनसीबीने ज्या पद्धतीने आर्यन खानला अडकवले ते पाहता आता भारत शाहरुख खानच्या कुटुंबियांसाठी सुरक्षित नाही त्यामुळे शाहरुखने भारत सोडून पाकिस्तानात येऊन स्थायिक व्हावे असा पाकमधील सेलब्रेटी आणि प्रसार माध्यमातील लोक शाहरुख खान याला सल्ला देत आहेत. आर्यन खान याला ड्रगप्रकरणी ३ ऑक्टोबरला अटक झाल्यापासून या प्रकरणात जे राजकारण सुरू झाले आहे त्याची पाक मध्येही जोरदार चर्चा सुरू आहे मात्र पाकिस्तानातील राजकीय नेते चित्रपट सृष्टी आणि पत्रकार सर्व एकजुटीने शाहरुख खानच्या बाजूने असून त्यांनी एन सी बी आणि वानखेडे यांची बदनामी सुरू केली आहे तसेच भारतात मुस्लिम समाजाच्या बाबतीत कसा दुजाभाव बाळगला जातो यावरही गरळ ओकली जात आहे. पाकिस्तानचा एक प्रसिद्ध एंकर वकर जका याने ट्विट केले आहे की शाहरुखने आता भारतात न राहता सरळ पाकिस्तानात यावे आणि तिथेच कायमचे स्थानिक व्हावे इथे शाहरुखचे स्वागतच होईल असेही या ट्विटमध्ये जाका याने म्हटले आहे. केवळ जकाच नव्हे तर पाकमधील इतर चॅनल सुद्धा या प्रकरणात भारताच्या विरुद्ध गरळ ओकत आहेत.

# मी केंद्रीय मंत्री झालो असतो तर कोकणचा कायापालट केला असता

**केसरकरांनी राणेंना डिवचले**

■ मुंबई

**नारायण** राणे हे आता केंद्रीय मंत्री झाले आहेत त्याचा फायदा घेऊन त्यांनी कोकणचा विकास करावा जर मी केंद्रीय मंत्री झालो असतो तर नक्की कोकणचा कायापालट केला असता अशा शब्दात शिवसेना नेते आणि माजी गृह राज्यमंत्री दीपक केसरकर यांनी नारायण रणे यांना डिवचले आहे त्यामुळे आता राणे केसरकरांवर कसा पलटवार करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दीपक केसरकर आणि नारायण राणे यांच्यातील वाद सर्वश्रुत आहे. आणि हे दोघेही अधून मधून एकमेकांवर टीका टिप्पणी करीत असतात पण हल्ली शिवसेना आणि नारायण राणे यांच्यातील संघर्ष अधिकच तिखट झालाय चिपी विमानतळाच्या लोकार्पण समारंभात स्वतः मुख्यमंत्री ठाकरे आणि राणे यांच्यात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या होत्या तत्पूर्वी राणे यांच्या जन आशीर्वाद यात्रेत जी राडेबाजी आणि अटकनाट्य झाले ते सर्वांनी पाहिले आहे. मात्र हा वाद अजूनही शमलेला नाही आता केसरकर यांनी राणेंना डिवचण्यासाठीच मी केंद्रीय मंत्री झालो असतो तर कोकणचा कायापालट केला असता असे विधान करून राणेंना डिवचले आहे त्यामुळे आता राणे आणि त्यांचे पुत्र सुद्धा गप्प बसणार नाहीत असे दिसते.

# 'लक्ष्या' चित्रपटसृष्टीला पडलेले 'हसरे स्वप्न'



**मराठी चित्रपटसृष्टीमध्ये आजवर अनेक गुणी कलाकारांनी त्यांच्या अभिनयामुळे प्रेक्षकांची मनं जिंकली. या सर्व उत्तम कलाकारांच्या गर्दीत आजही एक नाव कायम अग्रस्थानी आहे ते म्हणजे दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे. सगळ्यांना खळखळून हसविणाऱ्या या विनोदाच्या बादशहाची आज ६७ वी जयंती. त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीला दिलेल्या योगदानामुळे आजही ते साऱ्यांच्या स्मरणात आहेत. 'अशी ही बनवा बनवी' पासून ते अगदी पछाडलेला' या चित्रपटापर्यंत आपल्याला लक्ष्मीकांत बेर्डे यांची वेगळी रुपं पाहण्याची संधी मिळाली. त्यामुळे 'लक्ष्या' चित्रपटसृष्टीला पडलेले हसरे स्वप्न होते असे म्हटले तर वावगे ठरू नये.**

**मुंबईतील** गिरगावमधील कुंभारवाड्यात लहानाचा मोठा झालेल्या लक्ष्मीकांत बेर्डे यांनी युनियन हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केलं. तर भवन्स कॉलेजमध्ये उच्च शिक्षण घेतलं. कॉलेजमध्ये असताना ते एकांकिकांमध्ये सहभाग घेत होते. अनेक वेळा साहित्य संघ मंदिरात त्यांनी बॅक स्टेजवरही काम केलं. या कलाकाराला जाऊन एवढी वर्षे झाली तरी मात्र लक्ष्याच्या पडद्यावर येण्यामुळे होणारा हास्यस्फोट आजही कायम आहे. त्यांच्या केसांची खास कोंबडा स्टाईल रसिकांमध्ये अतिशय लोकप्रिय झाली होती. आपल्या अनोख्या शैलीने प्रेक्षकांची मनं जिंकणारा हा अभिनेता कधी सर्वांचा आवडता 'लक्ष्या' झाला हे लक्षात आलं नाही.

विनोदाचं उपजत कौशल्य आणि अचूक टाईमिंग हे लक्ष्मीकांत यांचे वैशिष्ठ्य. लक्ष्मीकांत बेर्डे हे विनोदी अभिनेते म्हणून जरी जास्त प्रसिद्ध असले तरी कित्येक चित्रपटांमधून त्यांनी अगदी गंभीर भूमिका सुद्धा अगदी तंतोतंत वठवली. एक होता विदूषक मधून त्यांनी अभिनयाचा वेगळा पैलू दाखवला. पण दुर्दैवाने प्रेक्षकांना हे रूपांतर तितकंसं आवडलं नाही. मराठी चित्रपट सृष्टीला सचिन पिळगांवकर, अशोक सराफ, महेश कोठारे आणि लक्ष्मीकांत बेर्डे अशा दिग्गज कलाकारांची साथ मिळाली. त्यांच्या प्रत्येक चित्रपटांना हाऊसफुल्लचा बोर्ड लागत असे.

**स्वप्निल कुलकर्णी**

सचिन, अशोक सराफ आणि लक्ष्मीकांत यांनी मिळून अनेक दर्जेदार चित्रपट केले. त्यांची जशी ऑन स्क्रीन मैत्री होती. तशीच ऑफ स्क्रीन सुद्धा घट्ट मैत्री होती. लक्ष्मीकांत यांनी साकारलेल्या भूमिका प्रत्येक रसिकांच्या मनात आणि त्यांच्याशी निगडीत आठवणी प्रत्येक कलाकाराच्या मनात आजही ठसठशीतपणे कोरल्या गेल्या आहेत. लक्ष्यासोबत काम केलेल्या मराठी चित्रपट सृष्टीतील अभिनेते आणि अभिनेत्रींनी लक्ष्मीकांत यांच्या जयंतीनिमित्त नवाकाळ सोबत बोलताना आपल्या भावना व्यक्त केल्या.

### लक्ष्या म्हणजे आमच्या मनातील हळवा कोपरा!

लक्ष्यासोबत १९८४ सालापासून काम करायला मिळाले. लेक चालली सासरला हा आमचा पहिला चित्रपट. लक्ष्या खूप मनमिळाऊ आणि तितकाच हजरजबाबी होता. त्याच्या स्वभावात कुठंच खोटेपणा नव्हता. त्याने वेगवेगळ्या अभिनेत्रींसोबत काम केले. सेटवरील सगळ्यांची तो विशेष काळजी घ्यायचा. त्यामुळे त्याच्यासोबत काम करताना कधीच परकेपणा जाणवला नाही. आमचे कौटुंबिक नाते होते. माझ्या आणि समीरच्या आजवरच्या वाटचालीत लक्ष्याचा मोठा वाटा आहे. टायमिंग कशी साधायची हे त्याला माहित होतं. त्याचे टायमिंग हे जबरदस्त होतं. त्यामुळेच त्याची वेगळी छाप कायम राहिली. लक्ष्मीकांतचा वावर कॅमेऱ्यासमोर व रंगभूमीवर अगदी सहज होता. विनोदाला लागणारी उत्स्फूर्तता त्याच्यात ठासून भरलेली होती.



**- अलका कुबल**

### लक्ष्मीकांत शिस्तीचे आणि वेळेचे पक्के होते!

लक्ष्मीकांतकडून खूप काही शिकायला मिळाले. लक्ष्मीकांतसोबत सुरुवातीला काम करताना मी घाबरायचे. दडपण यायचं. नंतर मला हळूहळू सवय झाली. अनेक चित्रपटात आम्ही एकत्र काम केले. ते कमालीचे शिस्तीचे होते. वेळेचे पक्के होते. त्यामुळे त्यांच्यासोबत काम करणाऱ्या अभिनेत्रींची सेटवर उशिरा येण्याची हिंमतच होत नसायची. एक पती म्हणून ते खूप काळजीवाहू होते. त्यांच्या यशामध्ये रुही बेर्डे यांचा खूप मोठा वाटा आहे. कारण लक्ष्मीकांत कुणीही नव्हते त्यावेळेस रुही बेर्डे यांनी त्यांना साथ दिली. त्यांच्या अभिनयात नेहमीच कमालीची ऊर्जा दिसत असे. ते खूप भावनिक होते. एक होता विदूषक या चित्रपटाचे अपयश त्यांच्या जिव्हारी लागले. आजही लोक त्यांचे नाव काढतात, हे पाहण्यासाठी लक्ष्मीकांत असायला हवे होते. आपल्या हलक्याफुलक्या विनोदाने सेटवरचे वातावरण नॉर्मल ठेवायचे.



**- प्रिया बेर्डे**

### अनोख्या शैलीने लक्ष्याने प्रेक्षकांची मनं जिंकली!

लक्ष्मीकांतसोबत काम करत असताना काहीच दडपण जाणवलं नाही. त्याचे पाठांतर आणि टायमिंग खूपच जबरदस्त होतं. हम आपके है कौन चित्रपटाच्या शुटिंगवेळी आम्ही खूप धमाल केली होती. तो माझा पहिला हिंदी चित्रपट होता आणि एवढ्या मोठ्या कलाकारांसोबाबत काम करायचं दडपण आले होते. पण लक्ष्मीकांतने त्याच्या विनोदी शैलीने धमाल उडवून दिली, टेन्शन कुठल्या कुठं निघून गेले. इतरांना मदत करायला तो नेहमी पुढे असायचा. त्यांच्या केसांची खास कोंबडा स्टाईल त्यावेळी रसिकांमध्ये अतिशय लोकप्रिय झाली होती. आपल्या अनोख्या शैलीने प्रेक्षकांची मनं जिंकणारा सर्वांचा आवडता अभिनेता होता. त्यामुळेच सर्व उत्तम कलाकारांच्या गर्दीत आजही एक नाव कायम अग्रस्थानी आहे.



**- रेणुका शहाणे**

### लक्ष्या अष्टपैलू अभिनेता होता!

लक्ष्या शूटिंगदरम्यान सेटवर नेहमी कोट्या करत असायचा. त्यामुळे सेटवरचं गंभीर वातावरण खेळीमेळीचं व्हायचं. मी त्याच्यासोबत बऱ्याच मराठी चित्रपटात काम केले. त्याचबरोबर सोने कि जंजीर या हिंदी चित्रपटात देखील काम केले. तो उत्कृष्ट खवय्या होता. त्याला मऊ भात आणि मासे फार आवडायचे. त्याच्यासोबत वेळेवरून सतत भांडण व्हायचे,. पण ते प्रेमाचे, तात्पुरते असायचे. त्याने आयुष्यभर माणुसकी जपली. सोबत काम करणाऱ्या सहकाऱ्यांना तो कधीच विसरायचा नाही. विशेषतः ज्या सहकाऱ्यांना काम मिळत नसायचे, त्यांना तो काम मिळवून द्यायचा. याच, मला नेहमी कौतुक वाटायचं. मी त्याच्यासोबत एक होता विदूषक या चित्रपटात काम केले. ती त्याची गंभीर भूमिका होती. या चित्रपटाबद्दल त्याला खूप अपेक्षा होत्या. त्या चित्रपटाला पारितोषिक मिळेल, असे आम्हाला सर्वांना वाटत होते. मात्र तो चित्रपट चालला नाही. त्याचं जाण्याने मराठी चित्रपट सृष्टीचे नुकसान झालं. लक्ष्यानं त्याच्या कामातून बरच पुण्य कमावलं, असे मी म्हणेन. आज खरच लक्ष्या हवा होता. लक्ष्या वुई मिस यु!



**- वर्षा उसगांवकर**

### लक्ष्याने सगळे शून्यातून निर्माण केले!

लक्ष्यासारख्या माणसाची मराठी चित्रपटसृष्टीला अजूनही गरज होती. त्याच्यासारखा मेहनत करणारा आणि कामाला वाहून घेणारा कलाकार मी पाहिला नाही. त्याने सगळे शून्यातून निर्माण केले. त्याने चित्रपट सृष्टीत जे कमावलं त्याला खरचं तोड नाही. नोकराची कामे करुन मराठी चित्रपटसृष्टीमध्ये टॉपचा हिरो होणं ही खूप मोठी गोष्ट आहे आणि ती त्याने साध्य केली. आम्ही दोघांनी ४०-५० चित्रपटात एकत्र काम केले. याचा मला अभिमान आहे. त्याला माझ्याबद्दल नेहमी आदरयुक्त भीती वाटायची. एकेकाळी आम्ही मराठी चित्रपटसृष्टी जागवली, असे म्हंटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. मी, सुधीर जोशी, सचिन आणि लक्ष्या आमची चौघांची मैत्री एकदम घट्ट होती. एकत्र फिरायचे, जेवायचे, गप्पांचे फड रंगवायचे. ते दिवसच खूप वेगळे होते. खरंच लक्ष्या खूप लवकर गेला. त्याला अजून खूप काही करायचं होतं.



**- अशोक सराफ**

### लक्ष्मीकांत खूप व्यावहारिक होता!

लक्ष्मीकांतला कुणी गॉडफादर नव्हता. त्याला कुणी घडवलं नाही. लक्ष्मीकांत बेर्डे जसा होता, तसाच लोकांना आवडला. त्याच्या चाहत्यांना देखील तो आहे तसाच हवा होता. आम्ही दोघे मिळून कोकणस्थ वैश्य समाजात नाटकं बसवायचो. पुढे आम्ही भाऊ बेर्डे नावाने एक संस्था उभी केली. यातून अनेक एकांकिका, फॅन्सी ड्रेस स्पर्धा आयोजित केल्या जायच्या. पुढे मी जे जे स्कुल ऑफ आर्टस् मध्ये गेलो. तिथून एकांकिका करत राहिलो तर लक्ष्मीकांत बेर्डे साहित्यसंघात नोकरी करून नाटकं करत होता. पुढे मी टुरटुर नावाची एकांकिका लक्ष्मीकांत बेर्डेला घेऊन नाटक स्वरुपात व्यावसायिक रंगभूमीवर आणली. त्यानंतर खऱ्या अर्थाने लक्ष्मीकांतला मराठी चित्रपटसृष्टीत ब्रेक मिळाला. त्याचे करिअर सुरु झाले. लक्ष्मीकांत खूप व्यावहारिक होता. कदाचित यामुळे तो इतरांपेक्षा जास्त काळ मराठी चित्रपटसृष्टीत टिकला.



**- पुरुषोत्तम बेर्डे**

### लक्ष्या परिवारातील एक सदस्य होता!


लक्ष्या कलाकार तर होताच पण त्यापेक्षा एक चांगला माणूस होता. त्याच्याकडे माणुसकी होती. त्यांच्यासोबतच्या असंख्य आठवणी आहेत. मी, अशोक सराफ आणि लक्ष्या आम्ही तिघांनी अनेक चित्रपटात एकत्र काम केले आहे. त्यामुळे आमच मैत्रीचं घट्ट असं एक नातं तयार झालं होतं. त्याने आपल्या मग ती प्रायोगिक नाटकं असतील, चित्रपट असतील यामध्ये काम करणाऱ्या सहकलाकारांना अनेकदा मदत केली आहे. तो आमच्या परिवारातील एक सदस्य होता. तो अनेकदा माझ्या घरी यायचा. कधी परका वाटलाच नाही. त्याच्या अकाली जाण्यानंतर आजही रसिक त्याच्यावर प्रेम करतात, त्याची आठवण काढतात, ही खूप मोठी गोष्ट आहे. त्याच्या जाण्याने आमच्या मित्र परिवारात निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही.



**- सचिन पिळगांवकर**

### सेटवर अगदी बिनधास्तपणे वावरायचा!

लक्ष्मीकांतचा चित्रपटसृष्टीतील प्रवास मी अगदी जवळून पाहिला आहे. शांततेचं कार्ट चालू आहे आणि टूरटूर या दोन नाटकांनी त्याला स्टारडम मिळाले. त्याने मिळालेल्या संधीच सोनं केले. अतिशय मेहनती कलाकार होता. गिरगावातील साहित्य संघ मंदिरात पडेल ते काम लक्ष्मीकांत करायचा. १९८० साली चिमणराव या नाटकात आम्ही पहिल्यांदा एकत्र काम केले. त्यानंतर झपाटलेला ते पछाडलेला पर्यंत अनेक चित्रपटात सहकलाकार म्हणून त्याचोबत मी काम केले. सेटवर अगदी बिनधास्तपणे वावरायचा. त्यामुळे त्याच्यासोबत काम करणाऱ्या सहकलाकारांना दडपण यायचे नाही. चित्रपटसृष्टीतील एवढा मोठा कलाकार होऊनही तो कायम निर्मळ मनाचा राहिला. स्पष्टता, संवाद फेकीवर त्यांचे कायम राज्य होते. शेवटी शेवटी रवी बेर्डेकडून लक्ष्याच्या आजारपणाबद्दल कळत होतं. आतडं तीळतीळ तुटायचे. पण काहीच इलाज नव्हता.



**- दिलीप प्रभावळकर**

---

# बृहन्मुंबई महापालिकेच्या सर्व सभा होणार सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत

## राज्य सरकारी परिपत्रक जारी

■ मुंबई

**कोरोना** महामारीमुळे महानगर पालिकेच्या सर्वच सभा ह्या ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत होत्या. जवळपास १९ महिने पालिकेच्या सर्वच सभा ह्या ऑनलाईन झाल्या हा सुद्धा इतिहासच म्हणावा लागेल. पालिकेच्या सभा ऑनलाईन होत असल्यामुळे बरेच नगरसेवक हे चर्चेपासून वंचित राहत होते. यावर भारतीय जनता पार्टीने वेळोवेळी आवाज उठविला त्यावर सत्ताधारी शिवसेनेने जोपर्यंत राज्य सरकार आदेश देत नाही तोपर्यंत पालिकेच्या सभा ह्या ऑनलाईनच्या होतील असे सांगितले मात्र सध्या मुंबईत कोरोनावर नियंत्रण आले असल्यामुळे महापालिका सभागृह, स्थायी समिती व अन्य समित्यांच्या बैठका आता प्रत्यक्ष घेण्यास राज्य सरकारने परवानगी दिली आहे.

यासंदर्भातील परिपत्रक नगरविकास विभागाने २२ ऑक्टोबर रोजी जारी केले आहे. आता सरकारच्या निर्देशामुळे पालिकेच्या विविध समित्यांच्या बैठका, पालिका सभा प्रत्यक्ष घेण्यासाठी सत्ताधारी शिवसेना व भाजप यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाला पूर्णविराम मिळाला आहे. मुंबईत कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने राज्य सरकारने पालिका सभा, विविध समित्यांच्या बैठका प्रत्यक्ष घेण्यास मनाई आदेश जारी केले होते. त्याला दीड वर्षांचा कालावधी लोटला आहे. मात्र आता कोरोना नियंत्रणात आल्याने सरकारने व पालिकेने लॉकडाऊन निर्बंधात काहीशी शिथिलता आणली. शाळा, थिएटर, हॉटेल्स, धार्मिक स्थळे, नाट्यगृहे, कॉलेज चालू केले आहेत. त्यामुळे आता पालिका सभा, विविध समित्यांच्या बैठकाही प्रत्यक्ष घेण्यात याव्यात, अशी मागणी करीत भाजपने रान उठवले होते. त्यासाठी न्यायालयातही धाव घेतली होती.

कोरोनामुळे गेल्या दीड वर्षात पालिकेतील सर्व बैठका ऑनलाईन होत आहेत. मात्र आता नगरविकास खात्याने कोरोनाविषयक नियमांचे पालन करून पालिकेत प्रत्यक्ष बैठका घेण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे आता आगामी काळात विविध समित्यांच्या बैठकीत व पालिका सभेत पुन्हा एकदा सेना - भाजप यांच्यात वादग्रस्त विषयांवरून प्रत्यक्ष सामना बघायला मिळणार आहे.

---


# महाराष्ट्र एकीकरण समितीचा मोर्चा कर्नाटक पोलिसांनी अडवला

**बेळगाव** - मराठी भाषेत फलक लावण्यासह इतर मागण्यांसाठी मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीतर्फे काढण्यात आलेला मोर्चा कर्नाटक पोलिसांनी धर्मवीर संभाजी चौक येथे अडविला. मोर्चा अडविल्याने काही काळ गोंधळ निर्माण झाला होता. मात्र कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयावर जाण्याच्या मागणीवर ठाम होते.

महापालिके समोर लावण्यात आलेला अनधिकृत लाल पिवळा झेंडा हटवण्यात यावा तसेच मराठी भाषेतून फलक लावण्यात यावेत या मागणीसाठी समितीतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी साडेदहा वाजल्यापासून धर्मवीर संभाजी चौक येथे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात जमा होण्यास सुरुवात झाली होती. मात्र पोलिसांनी मोर्च्याला परवानगी नाही असे सांगत कार्यकर्त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला. तसेच चारही बाजूनी बॅरिकेट्स लावण्यात आले. मात्र कोणत्याही परिस्थितीत मोर्चा काढण्याचा निर्धार करत कार्यकर्त्यांनी चौकात बसून घोषणाबाजीला सुरुवात केली. बेळगांव, कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, रहेंगे तो महाराष्ट्र मे नही तो जेल में, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.


**इंदिरा राष्ट्रीय कामगार सहकारी सोसायटी व पतपेढी लि..**
मिलेनियम अवनीश, बी.विंग,सेक्टर १० अे,ऐरोली,नवी मुंबई - ४००७०८

**सहकार महर्षि माथाडी कामगार नेते स्व.काकासाहेब थोरात**
संस्थापक व माजी आमदार
यांना दि. २६.१०.२०२१ रोजी
९५ व्या जयंती निमित्त



तमाम माथाडी कामगारांचे विनम्र अभिवादन...
"सुर्यासम तेजस्वी मुर्ती, कष्टकऱ्यांच्या जीवनाचा आधार,
मिळाली जगण्याला स्फुर्ती, महापुरुषाचे शतशः आभार."

**इंदिरा राष्ट्रीय कामगार सहकारी सोसायटी लि.**
सल्लागार : मा. श्री. सदानंद ( भाऊ ) काकासाहेब थोरात
चेअरमन : श्री. प्रकाश शिवराम पेडणेकर
व्हा.चेअरमन : श्री. नामदेव हरीभाऊ देवकाते
सेक्रेटरी : श्री. हणमंत संपतराव कणसे
• संचालक •
श्री. रमेश केशव भालेकर — श्री. अर्जुन ज्ञानोबा माळी
श्री. संतोष केरबा लोंढे — श्री. रामलखन तिलकधारी यादव

**इंदिरा राष्ट्रीय कामगार सहकारी पतपेढी लि.**
चेअरमन : श्री. शंकर नागु पाटील
सेक्रेटरी : श्री. शिवाजी पांडुरंग गायकवाड
खजिनदार : श्री. सुरेश आप्पाजी कदम
• संचालक •
श्री. नामदेव हरिभाऊ देवकाते — श्री. विलास रामचंद्र दळवी
श्री. वैभव् राजाराम चव्हाण — श्री. रंभाजी रामभाऊ हटाळे
श्री. बाळु गुलाब इंगवले — श्री. रमेश गणपत कोकरे
व सर्व सभासद कामगार बंधू.


---

# नवले पूलाबाबत दोन दिवसांत घेणार बैठक -महापौर मोहोळ

■ पुणे

**नवले** पूल येथे घडत असलेल्या अपघातावरून पुणे महापालिकेच्या सभेत चांगलेच पडसाद उमटले. नगरसेवकांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांसह राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय)आणि पोलिसांच्या कारभारावर टीका करत कात्रज-देहू महामार्गाची रखडलेली काम पूर्ण करा, अशी जोरदार मागणी केली. या मागणीनंतर महापौर मुरलीधर मोहोळ यांनी नवले पूलाची समस्या सोडविण्यासह अनेक विषयांवर महापालिकेत एनएचएआय, पोलीस विभागांची दोन दिवसात बैठक घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले.

पुणे महापालिकेची मुख्यसभा सुरू झाल्यानंतर नगरसेवक अजित दरेकर यांनी नवले पूल येथे झालेल्या अपघाताचा विषय उपस्थित केला. या महामार्गावर आतापर्यंत ६८ नागरिकांचा मृत्यू झाला. याठिकाणी अपघात झाल्यानंतर एनएचएआय महापालिकेचे अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवत आहेत, मात्र सुधारणा होत नसल्याने लोकांचे घर उद्ध्वस्त होत आहेत. तसेच नगरसेवक दिलीप बराटे म्हणाले की, नवले पूल येथे वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे यावर तोडगा निघाला पाहिजे.चांदणी चौकाप्रमाणे येथे उपाययोजना झाली पाहिजे. नगरसेवक हरिदास चरवड, दिलीप वेडे पाटील, वसंत मोरे, अविनाश बागवे, गणेश ढोरे, वर्षा तापकीर, सुभाष जगताप, वृषाली चौधरी, अश्विनी कदम आणि आदी नगरसेवकांनी या मुद्द्यावर भूमिका मांडत प्रशासनाने खुलासा करण्याची मागणी केली. मात्र महापौरांनी त्यास नकार देत म्हणाले की, सभेत नवले पूलासह इतर विषय मांडले असून त्याचा एकत्रित विचार करण्यासाठी दोन दिवसात एनएचएआय, पोलीस अधिकारी यांची बैठक पुणे महापालिकेत द्यावी. या बैठकीत झालेल्या चर्चेचा अहवाल गडकरी यांना पाठवू.

---

# ठाकरे, पवार, फडणवीस, गडकरी पंढरपुरात जुगलबंदी कार्यक्रम

■ पंढरपूर

**देहू** आळंदी ते पंढरपूर या रस्त्याच्या चौपदरीकरण कामाचा शुभारंभ येत्या ३० ऑक्टोबर रोजी पंढरपूर येथे होणार असून या कार्यक्रमाला मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्यासह केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस आणि स्वतः शरद पवार हे एकाच व्यासपीठावर येणार असल्याने या चारही नेत्यांची राजकीय जुगलबंदी बघायला मिळणार आहे. वास्तविक देहू आळंदी ते पंढरपूर या मार्गाचे चौपदरीकरण यापूर्वीच होणार होते . पण कोरोनामुळे ते रखडले . आता ३०ऑक्टोबर रोजी पंढरपूरच्या रेल्वे मैदानावर हा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमासाठी १० हजार लोक उपस्थित राहतील असा अंदाज आयोजकांनी व्यक्त केला आहे खासकरून आर्यनचे ड्रग प्रकरण आणि त्याने घेतलेले भयंकर वळण तसेच अतिवृष्टी, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई त्याबाबत विरोधी पक्षनेते फडणवीस काय बोलतात आणि त्याला मुख्यमंत्री ठाकरे काय उत्तर देतात हा शेतकऱ्यांसाठी उत्सुकतेचा विषय आहे तर केंद्राकडून तपास यंत्रणांचा होत असलेला गैरवापर याबाबत पवार काय बोलणार हे उत्सुकतेचे ठरणार आहे.

दरम्यान काही दिवसांपूर्वी मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी गडकरी व फडणवीस यांच्यातील संबंध बाबत केलेले वक्तव्य केले होते. त्यामुळे गडकरी नाराज आहेत. आता गडकरी फडणवीस एकाच व्यासपीठावर येत असल्याने गडकरी त्याबाबत काय बोलणार हे उत्सुकतेचे ठरणार आहे.




संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# चित्रपटांचे हरवत चाललेले सामाजिक मूल्य

**दरवर्षी** न चुकता राष्ट्रीय चित्रपट महोत्सव भरवला जातो. कोरोनाचा अपवाद वगळता आता पुढच्या काळात हा चित्रपट महोत्सव घडतो आहे. जगभर चित्रपट या माध्यमाचे महत्व सिध्द झालेले आहे. परंतु या माध्यमाचे मूल्य अजूनही स्पष्ट झालेले नाही. मनोरंजन हाच चित्रपटाचा प्रधान हेतू मानला जातो. प्रेक्षकदेखील मनोरंजनाच्या हेतूने चित्रपट पाहातात. परंतु चित्रपटगृहाच्या बाहेर आल्यानंतर मनोरंजनाऐवजी त्यांच्या मनावर आणि बुध्दीवर चित्रपटाचे कथानक अनेक प्रकारे परिणाम करून गेलेले असते. म्हणजेच मनोरंजनाबरोबरच चित्रपट हे प्रबोधनाचे किंवा सामाजिक वास्तव प्रभावीपणे मांडणारे तितकेच महत्त्वाचे व्यासपीठ ठरू लागले. हॉलिवूडपासून ते बॉलिवूडपर्यंत कलात्मक, प्रबोधनात्मक चित्रपटांची निर्मिती झाली आणि मग त्यातूनच आंतरराष्ट्रीय स्तरावर ऑस्करसारखे पुरस्कार दिले जाऊ लागले. अभिनयाबरोबरच चित्रपट निर्मिती, दिग्दर्शन, कथा नेपथ्य, या बाबींचाही विचार होऊ लागला. कलात्मकता हा पैलू चित्रपट माध्य़मातून चांगल्या प्रकारे जपला गेला यात काही शंका नाही. परंतु अंतिमतःत्याकडे एक व्यवसाय म्हणून पाहिले जाते. आणि व्यवसाय हा यशस्वीपणेच करायचा असतो अशी धारणा असल्यामुळे तडजोडींनासुध्दा प्राधान्य मिळते. या ना त्या मार्गाने प्रेक्षकांना चित्रपट गृहापर्यंत खेचून आणण्याचा प्रयत्न केला जातो. आणि त्यात तर अलिकडे जीवघेणी स्पर्धाही पाहायला मिळते. अनेक दृष्टीकोनातून हे माध्यम प्रभावी असल्याने त्याचा यथायोग्य वापर व्हावा समाजमनावर विपरित परिणाम होऊ नये. सामाजिक सभ्यता ,नीतीमूल्ये पाळली जावीत. त्यातून कोणताही चुकीचा संदेश जाणार नाही अशा प्रकारचा विचार झाला. आणि सेन्सॉर बोर्डाची निर्मिती केली गेली. परंतु सेन्सॉर बोर्डाच्या निर्मितीनंतरही त्याचा फारसा परिणाम झालेला दिसत नाही. चित्रपट माध्यमाचा उपयोग करताना सामाजिक भान दुर्लक्षित झाले. चंगळवाद अश्लिलता किंवा सवंगपणाला खूप महत्व आले. या माध्यमाचे सकारात्मक उद्दिष्ट अतिशय अल्प प्रमाणात प्राप्त झाले. पण नकारात्मक किंवा अनावश्यक गोष्टींचा समाजामध्ये खूप वेगाने प्रसार झाला. आणि त्याचे बऱ्यापैकी दुष्परिणाम पाहायलाही मिळत आहेत.

कोणतेच नियंत्रण नाही

सेन्सॉर बोर्डाच्या माध्यमातून चित्रपट निर्मितीवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न तितकासा यशस्वी झालेला नाही. आणि आता त्यात ओटीपी प्लॅटफॉर्म या नव्या प्रकारामुळे भर पडली आहे. म्हणजेच नेटफ्लिक्स, मॅक्स, ॲमेझॉन, यासारख्या कंपन्यांनी चित्रपट निर्मिती करून ती सिनेमागृहांच्या ऐवजी थेट मोबाईल, इंटरनेटवर उपलब्ध करून दिली आहेत. त्यांच्यावर सेन्सॉर बोर्डाचे कोणतेही नियंत्रण नाही. त्यांनी तयार केलेले चित्रपट परस्पर प्रदर्शित होतात. आणि त्यातला धक्कादायक भाग असा की, आज चित्रपटगृहांमधल्या प्रेक्षकवर्गापेक्षा जगभरातला ऑनलाईन प्रेक्षकवर्ग प्रचंड प्रमाणात उपलब्ध झालेला आहे. म्हणजे ऑनलाईन चित्रपट पाहाणाऱ्यांची संख्या रोज काही कोटींच्या घरात जाते. भारतात अशा पध्दतीने अनेक कंपन्या चित्रपट निर्मिती क्षेत्रात उतरलेल्या आहेतच. परंतु चित्रपट प्रदर्शनापूर्वी त्यांना कोणत्याच परवानगीची आवश्यकता भासत नाही. तंत्रज्ञानाने घडवलेले हे नवीन परिवर्तन मानले तरीसुध्दा तंत्रज्ञानाचा तितकाच मोठा दुष्परिणामही समोर आलेला आहे. गेल्या काही वर्षातल्या महिला अत्याचारांच्या घटना गुन्हेगारीतली वाढ सामाजिक वैमनस्यासाठी अनाठायी होणारा संघर्ष ही त्या अनियंत्रित ओटीपी प्लॅटफॉर्मची उपलब्धी आहे. आता या प्रकारांना रोखण्याऐवजी भारत सरकारने आणखी उफराटा निर्णय घेतला. राष्ट्रीय. चित्रपट महोत्सवात ओटीपी प्लॅटफॉर्मवरील चित्रपटांना सहभागी करून घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. ही गोष्ट सरकारी धोरणातला केवळ विरोधाभास दर्शवत नाही तर त्याच्या विपर्यासाचेच प्रदर्शन घडवून आणते. म्हणजे एकीकडे सर्व प्रकारच्या परवानग्या किंवा सरकारी नियमांचे पालन करून चित्रपट निर्मिती करणारे निर्माते आहेत. जे सेन्सॉर बोर्डाची सर्टिफिकेट घेऊन अधिकृतपणे चित्रपट निर्मिती करतात. तर दुसरीकडे कोणतीच बंधने न पाळणाऱ्या चित्रपटांना तोच सन्मान दिला जात असेल तर ते सरकारी अर्धवटपणाचेच लक्षण ठरते. जगातील अन्य देशांमध्ये पुरस्कार प्रदान करण्याबाबत काय निकष लावले जातात हा भाग पूर्णपणे वेगळा ठरतो. परंतु भारतासारख्या प्रचंड विविधता आणि सामाजिक मूल्यांचे महत्व असणाऱ्या देशात कोणतेच निर्बंध न पाळणाऱ्या चित्रपटांची निर्मिती धोकादायकच ठरते.

ओटीपीचा पाचपट व्यवसाय

उलट गेल्या काही वर्षापासून प्रस्थापित चित्रपट निर्मात्यांनी, अनेक सामाजिक संघटनांनी या ओटीपी चित्रपटांना आक्षेप घेतलेला आहे. त्यांच्या निर्मिती संदर्भात केंद्र सरकारने स्वतंत्रपणे नियम लागू केले पाहिजेत. अशी मागणीही केली गेली आहे. केवळ तंत्रज्ञानामुळे इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन व्यवस्था उपलब्ध झाली आणि त्याचा पुरेपूर फायदा उठवण्याचे काम चित्रपट क्षेत्रातील लोकांनी केला आणि आता घराघरात नव्हे तर प्रत्येक मोबाईलमध्ये वाटेल तो चित्रपट केव्हाही पाहाण्याची सोय उपलब्ध झाली आहे. काही ठराविक वार्षिक शुल्क भरून भरपूर चित्रपट बघण्याची भूक लोक भागवू शकतात. शिवाय जाहीरातींच्या माध्यमातून या ओटीपी क्षेत्राला मिळणारे उत्पन्नदेखील प्रचंड असल्याचेही आता स्पष्ट झाले आहे. सिनेमागृहातील बॉक्सऑफिसवरच्या धंद्यापेक्षा ओटीपी प्लॅटफॉर्मचा धंदा कितीतरी पटीने तेजीत असल्याचे दिसून येते. सरकारने हा फरक लक्षात घ्यायला हवा. चित्रपट क्षेत्राचे महत्व मान्य करीत असताना त्याच्यावरचा लगाम पूर्णपणे नाहीसा होत आहे. याचेदेखील भान ठेवायला हवे. तंत्रज्ञानाने अनेक क्षेत्रात मोठमोठी परिवर्तने घडवली त्याला चित्रपट क्षेत्र अपवाद नाही. उलट चित्रपट क्षेत्रानेच त्याचा सर्वाधिक वापर करून घेतलेला दिसतो. म्हणूनच चित्रपट माध्यमाचे महत्व सिध्द झालेले आहे. फक्त त्याचे सामाजिक मूल्य अद्याप स्पष्ट झालेले नाही हे पुन्हा एकदा स्पष्ट होते. मोठ्या उत्साहाने चित्रपट महोत्सव भरवणाऱ्या माहिती प्रसारण खात्याने जागे व्हायला हवे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

नकारात्मक दृष्टिकोन हा गाडीच्या पंक्चर झालेल्या टायरसारखा असतो. त्याला बदलल्याशिवाय तुम्ही जास्त लांब आणि सुरक्षित पुढे जाऊ शकत नाही.

## पंचांग

**मंगळवार २६ ऑक्टोबर, २०२१**
**शक १९४३ प्लवनामसंवत्सर**

*** आश्विन कृष्ण पंचमी * नक्षत्र - आर्द्रा**

**रवी उदय- ०६-३८,**
**रवी अस्त- १८-०८**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मिथुन**

मुद्रक, प्रकाशक **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे**
संपर्क : २३८८०९८१, जाहिरात :८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५, वितरणः २३८२४४६६,
ई-मेल navakal.1923@gmail.com
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Jayshree Ramakant Khadilkar Pande**

## कविता...

### शबरीगीत

लतांनो, सांगू का तुम्हा, उद्या श्रीराम येणार
वनाला सर्व ह्या आतां, खरा आनंद होणार

तुम्हा कोठूनियां ठवा, कसा श्रीराम तो आहे
तुखस्यंदी झरा तेथे, सदाचा वाहतो आहे

उद्या पाहाल डोळ्यांनी, सुखाचा पूर्ण आराम
मुखे लागाल घोकाया, जय श्रीराम श्रीराम

बघोनी नाथ हर्षाने, मला उन्माद येईल
नका आणू मनामाजी, चुकोनी दोष होतील

लतांनो द्याल ना पुष्पे? झऱ्यांनो द्याल ना पाणी?
पहा, ही अर्पिली कैशी, फळें ह्या थोर वृक्षांनी

नव्हे कोठून ही उष्टी? जराशी चावलेली ही
कडू कच्ची फळे रामा, कशी देईन गऽ बाई

उद्या श्रीराम येऊं दे, तुम्हाला मीच दावीन
फळे ही त्यास अर्पोनी, सुखे त्यापाथि लोळेन

• वा. गो. मायदेव•

# आज द.आफ्रिका-विंडिज, पाक-न्युझीलंड लढती



**विश्वचषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत उद्या 'सुपर १२'मधील पहिल्या गटात वेस्ट इंडिज-द. आफ्रिका आणि दुसऱ्या गटात पाकिस्तान-न्युझीलंड यांच्यात लढती रंगणार आहेत.**

■ दुबई

**पहिल्या** गटातील सलामीच्या सामन्यात द. आफ्रिका आणि विंडिज या दोन्ही संघांना हार खावी लागली होती. त्यामुळे उद्या ते आपला स्पर्धेतील पहिला विजय मिळविण्यासाठी जोरदार प्रयत्न करतील. पहिल्या सामन्यात अटी-तटीच्या लढतीत आफ्रिकेला ऑस्ट्रेलियाकडून हार खावी लागली होती. तर वेस्ट इंडिजला माजी विजेता इंग्लंडकडून दारूण पराभवाला सामोरे जावे लागले होते. द. आफ्रिका-वेस्ट इंडिज या संघातील फलंदाजांना चांगली कामगिरी करावी लागेल तरच त्यांना विजयाची आशा बाळगता येईल. पहिल्या लढतीत दोन्ही संघाच्या फलंदाजांनी निराशा केली. त्यामुळेच ते पराभवाला सामोरे गेले.

इंग्लंडविरूद्धच्या सामन्यात ख्रिस गेलचा अपवाद वगळता त्यांच्या इतर कुठल्याच फलंदाजाला दोन आकडी धावसंख्या काढता आली नाही. त्यामुळे विंडिज संघ व्यवस्थापनासमोर मोठाच पेच निर्माण झाला असेल. कर्णधार पोलार्ड देखील झटपट बाद झाला होता. गत विजेत्यांना साजेशी कामगिरी विंडिजला पहिल्या सामन्यात तरी करता आली नाही. आता त्या सामन्यातून धडा घेत विंडिज संघ आपली कामगिरी सुधारेल अशी आशा त्यांचे चाहते करत असतील.

आफ्रिकेची गोलंदाजी आणि विंडिजच्या फलंदाजांमध्ये हा मुकाबला रंगण्याची शक्यता आहे. विंडिजच्या तुलनेत द. आफ्रिकेचा मारा अधिक चांगला वाटतो असेच त्यांचा फिरकी गोलंदाज सम्सी विंडिज फलंदाजांना अडचणीत आणू शकतो. त्याने ऑस्ट्रेलियाविरूद्ध पहिल्या सामन्यात चांगला मारा केला होता. अष्टपैलू फटकेबाज फलंदाज मिलर, यष्टिरक्षक डिकॉक, कर्णधार बाऊमा, दुसान यांच्यावर आफ्रिकेची फलंदाजीची मोठी मदार असेल. कागदावर तरी दोन्ही संघ समतोल असल्यामुळे कुठला संघ बाजी मारेल यांचा अंदाज बांधणे कठीण आहे.

**पाक दुसऱ्या विजयासाठी सज्ज**

'सुपर १२'मधील दुसऱ्या गटातील पाकिस्तान-न्युझीलंड यांच्यातील लढत शारजात रंगणार आहे. सलामीच्या लढतीत भारताला नमविल्यामुळे पाकिस्तान संघाचे मनोधैर्य निश्चितच उंचावले असेल. त्यामुळे दुसरा सामना जिंकण्यासाठी ते जोरदार प्रयत्न करतील. भारता विरूद्ध फलंदाजी आणि गोलंदाजी या खेळाच्या दोन्ही प्रमुख अंगात पाकिस्ताननी सरस कामगिरी केली. तसेच क्षेत्ररक्षणात देखील त्यांनी चमक दाखविली. त्या जोरावरच पाकिस्तानने पहिल्यांदाच विश्वचषक स्पर्धेत भारतावर विजय मिळविण्याचा पराक्रम केला. न्युझीलंड कर्णधार विल्यमसनला दुखापत झाल्यामुळे तो पहिल्या सामन्यात खेळणार की नाही याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विल्यमसन खेळला नाही तर न्युझीलंडची फलंदाजी काहीशी कमकुवत होईल. त्यामुळे इतर फलंदाजांवर मोठीच जबाबदारी पडेल.

दोन्ही संघात चांगले गोलंदाज असल्यामुळे फलंदाजांची कसोटी या सामन्यात बघायला मिळणार आहे. जो संघ फलंदाजीत चांगली कामगिरी करेल त्यालाच विजयाची जास्त शक्यता आहे. कागदावर तरी पाकिस्तानचे पारडे जड वाटत आहे. पाक चाहत्यांना आणखी एक विजय त्यांचा संघ मिळवून देणार का? याची उत्सुकता नक्कीच असेल.

# गोयंका ग्रुपने विकत घेतला आयपीएलचा लखनौ संघ

■ दुबई

**पुढील** वर्षी आयपीएलच्या १५व्या नव्या मोसमात आरपी संजीव गोयंका ग्रुपचा लखनौ आणि सी.व्ही.सी. कॅपिटल्सचा अहमदाबाद हे दोन नवे संघ खेळणार आहेत. बीसीसीआयने आज टेंडरची छाननी केल्यानंतर सर्वात जास्त बोली लावणाऱ्या या दोन संघांना पुढील वर्षी नवे संघ आयपीएलमध्ये समाविष्ट करून घेतले.

आरपी संजीव गोयंका ग्रुपने लखनौसाठी तब्बल ७ हजार १०० कोटींची बोली लावली होती. तर सीव्हीसी कॅपिटल्सने ५ हजार ६२४ कोटीची बोली लावली होती. एकूण २२ कंपन्यांनी टेंडर घेतली होती. परंतु अंतिम टप्प्यासाठी ४ कंपन्यांची निवड करण्यात आली. त्यात गोयंका ग्रुप आणि सीव्हीसीने बाजी मारली. या अगोदरदेखील गोयंका ग्रुपकडे पुणे रायझींग सुपर जायंट्स संघाचे दोन वर्षे आयपीएलमध्ये मालकी हक्क होता. आधारमूल्य २ हजार कोटी रुपये ठेवण्यात आले होते. ४ तास निविदांची छाननी केल्यानंतर लखनौ, अहमदाबाद या नव्या संघांची घोषणा करण्यात आली. अंतिम टप्प्यासाठी गोयंकाग्रुप, सीव्हीसी, ऑल कारगो लॉजिस्टीक, उदय कोटक या चार कंपन्या संघ घेण्यासाठी उत्सुक होत्या. रिती स्पोर्ट्स या कंपनीने देखील निविदा भरली होती. परंतु माजी भारतीय कर्णधार महेंद्रसिंग धोनी याचा कंपनीशी करार असल्यामुळे त्यांचा अर्ज अपात्र ठरविण्यात आला.

### सीव्हीसी कॅपिटल्सकडून अहमदाबाद संघ खरेदी

# निहाल सरिनची बाजी

**नवी दिल्ली :** चेस डॉटकॉमतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ज्युनियर स्पीड बुध्दिबळ स्पर्धेत निहाल सरिनने सलग दुसऱ्या वर्षी जेतेपद कायम राखले. अंतिम फेरीत निहालने रौनक साधवानीचा १६.५ -१०.५ गुणांनी आरामात पराभव केला. या निर्णायक लढतीत उभय खेळाडुत एकुण ५ मिनिटाचे ८, ३ मिनिटांचे ९ आणि १ मिनिटाचे १० डाव खेळविण्यात आले.

# आझम-रिझवानचा विक्रम

**दुबई :** पाकिस्तानची सलामीची जोडी कर्णधार बाबर आझम-रिझवानने भारताविरूद्धच्या लढतीत शतकी सलामी करून नवा विक्रम साजरा केला. यंदाच्या वर्षात या जोडीने सलग चौथ्यांदा शतकी सलामी पाकिस्तानला करून दिली. एकाच वर्षात चार वेळा शतकी सलामी करून देणारी आझम-रिझवान ही पहिली जोडी ठरली. ह्या अगोदर भारताच्या रोहित शर्मा, शिखर धवन आणि न्युझीलंडच्या केन विल्यमसन, गुपटिल जोडीने देखील सलामीत चार वेळा शतकी सलामी आपल्या संघाला करून दिली. परंतु एकाच वर्षात तशी कामगिरी या दोन्ही जोड्यांना करता आली नाही.

# सुमित, जमिल, मनोज ठरले सर्वोत्तम लिफ्टर

■ मुंबई

**कांदिवली** येथील गुरुकृपा हॉलमध्ये ऍम्युचर पॉवरलिफ्टिंग असोसिएशन सबर्बन मुंबई यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय सब ज्युनियर मुले-मुली, मास्टर पुरुष-महिला पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुमीत पाटील (डीईएन), जमिल खान (सावरकर जिम), मनोज मोरे (मुंबई पोलिस) यांनी सर्वोत्तम लिफ्टरचा मान मिळविला. तर मुलींमध्ये सब ज्युनियर गटात आकांक्षा बाने, ज्युनियर विभागात मानशी आहेर (दोघी एंपायर) आणि



मास्टर गटात अपर्णा सागरे (चैतन्य) यांनी बेस्ट लिफ्टरचा मान मिळविला.

नगरसेविका शुभदा गुडेकर, निखिल गुडेकर, शशांक चोकीदार, भालचंद्र मांजरेकर यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. विजेते खेळाडू - सब ज्युनियर मुले - अनिष वर्मा, सुमित पाटील, पार्थ बोरसे, राजन मिश्रा, आदेश दिवेकर, लिकित सालियन, वेदाग अंडागळे, ज्युनियर - विकास मांडवकर, जमिल खान, अभिजित कदम, अक्षय कारंडे, आयुष घाडगे, फ्रान्सिको फर्नांडिस, ध्रु नायर सब ज्युनियर मुली - ज्योती विश्वकर्मा, आकांक्षा बाने, प्रिया गुजर, प्राजक्ता गाडवे, प्रणाली उमाले ज्युनियर मुली - कांचन धूरी, मानशी आहेर, अस्मिता सकपाळ, अपर्णा जगताप, मनाली साळवी, निकिता नाईक, मारिया पटेल

# पारसी जिमखाना अजिंक्य

**मुंबई :** पारसी जिमखान्याने पय्याडे स्पोर्ट्स क्लबचा ८७ धावांनी आरामात पराभव करून 'तालिम ढाल टी-२०' स्पर्धा जिंकली. प्रथम फलंदाजी करणाऱ्या पारसी जिमखान्याने २० षटकात ६ बाद २०४ धावा केल्या. त्यांच्या सचिनने ५५, परागने ३९, आदित्यने ३३ धावा केल्या. तर गोलंदाजीत चमक दाखविताना मनिषने ३, तुषारने २, यशने २ बळी घेतले. पराभूत संघाच्या सिद्धेश लाडची अर्ध शतकी खेळी व्यर्थ ठरली.

# ॲंटवर्प स्पर्धेत जॅनिकची बाजी

■ ॲंटवर्प

**इटालिचा** युवा २० वर्षीय टेनिसपटू जॅनिक सिनरने बेल्जियममध्ये झालेल्या ॲंटवर्प एटीपी टेनिस स्पर्धेत विजेतेपद पटकावले. यंदाच्या वर्षातील चौथे जेतेपद पटकावून जॅनिकने विजयाचा चौकार मारला.

ह्या अगोदर त्याने वॉशिंग्टन, मेलबर्न, सोफिया स्पर्धेत जेतेपद मिळविले होते. त्याच्या कारकिर्दीतील हे ६वे विजेतेपद होते. सध्या जागतिक क्रमवारीत १३व्या क्रमांकावर असलेल्या जॅनिकला या जेतेपदाचा फायदा मिळेल. लवकरच तो या क्रमवारीत टॉप १० मध्ये दाखल होईल. ॲंटवर्प स्पर्धा जिंकताना प्रथम मानांकन देण्यात आलेल्या जॅनिकने अर्जेटिनाच्या दिएगोला सरळ २ सेटमध्ये नमविले. अवघ्या सव्वा तासात जॅनिकने ६-२, ६-२ अशी बाजी मारली. सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करून जॅनिकने दिएगोला विजयाची संधी दिली नाही. खास करून त्याने आपल्या वेगवान सर्व्हिसवर बरेच गुण वसूल केले. संपूर्ण स्पर्धेत जॅनिकने एकही सेट गमविला नाही. आता लवकरच होणाऱ्या जिनिव्हा स्पर्धेत तो सहभागी होणार आहे.

# रियाल माद्रिदचा विजय

■ बार्सिलोना

**स्पॅनिश** साखळी फुटबॉल स्पर्धेत झालेल्या रियाल माद्रिद-बार्सिलोना या दोन बलाढ्य संघातील लढतीत रियाल माद्रिदने २-१ अशी बाजी मारली. तब्बल ८० हजार फुटबॉल प्रेमी हा सामना बघायला उपस्थित होते. बार्सिलोनाच्या पराभवामुळे त्यांच्या चाहत्यांची निराशा झाली. मेसीच्या गैरहजेरीत प्रथमच बार्सिलोना संघ रियाल माद्रिदविरूद्ध खेळला. विजयी संघाच्या डेव्हिड अल्बाने पहिला गोल केला.

# हार्दिक दुखापतग्रस्त

**दुबई :** भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याला पाकिस्तान विरूद्धच्या सामन्यात हाताला दुखापत झाली. पाकिस्तानच्या एका गोलंदाजाचा चेंडू त्याच्या उजव्या हातावर जोराने आढळला त्यामुळे बाद झाल्यानंतर त्याला लगेचच स्कॅनसाठी पाठविण्यात आले. त्यामुळे पाकिस्तानच्या डावात तो क्षेत्ररक्षणासाठी मैदानात उतरला नाही. आता न्युझीलंड विरूद्ध होणाऱ्या दुसऱ्या सामन्यात तो खेळणार की नाही याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पाक विरूद्धच्या लढतीत त्याने ८ चेंडूत ११ धावा केल्या होत्या.

# मविआच्या नेत्यांना खोटे बोलल्याशिवाय अन्न जात नाही

■ नांदेड

**राज्य** सरकारमधील नेते अतिशय खोटारडे आहेत, दिवसभरात चार-पाचवेळा खोटं बोलल्याशिवाय त्यांना अन्नही जात नाही. त्यामुळे, दिवसभर खोटं बोलतात. काहीही झालं की केंद्र सरकारकडे बोट दाखवतात. मी म्हटलं, यांच्या बायकोनं जरी यांना मारलं तरी सांगतील केंद्र सरकारचा हात आहे. त्यांनी दाखवला म्हणून आम्हाला मारलं. राज्य सरकारने त्यांच्या हिस्स्याचा प्रिमीयमच भरला नाही, त्यामुळे कंपन्यांनी पीकविमा दिला नाही, अशी टीका विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची राज्य सरकारवर केली.

नांदेड जिल्ह्यातील देगुलर येथे विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी आयोजित सभेला संबोधित करताना

**विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीसांची जोरदार टीका**

फडणवीस यांनी राज्य सरकारवर घणाघाती टीका केली. हे सरकार गरिबी विरोधी आहे. फक्त स्वतःच्या परिवारासाठी हे सरकार चालतंय. तुमच्या हिस्स्याचा पैसा यांच्या घरात जातोय. या सरकारने मराठवाडा वैधानिक विकास मंडळ बंद करुन टाकलं, कवचकुंडल बंद करुन टाकली. अशोकराव तुम्ही मुख्यमंत्री होतात, ज्येष्ठ नेते आहात, मग वैधानिक विकास मंडळ बंद केल्यावर तुम्ही एक शब्द का काढला नाही, असा सवाल देवेंद्र फडणवीसांनी विचारला आहे.

फडणवीस म्हणाले की, राज्यात दोनवेळा अतिवृष्टी झाली, पण कुणी येऊन पाहायला तयार नाही. आम्ही शेतकऱ्यांच्या बांधावर गेलो. त्याच्या शेतात अन् डोळ्यातही पाणी होतं. पण, सरकार एक नवा पैसा द्यायला तयार नाही. विम्याचे पैसेही शेतकऱ्यांना मिळत नाहीत. आमचं सरकार होतं तेव्हा वर्षातून ४ वेळा पैसे मिळाल्याचे मेसेज शेतकऱ्यांना येत होते. आम्ही थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे दिल्याचे फडणवीस यांनी सांगितलं. या सरकारकडून केवळ घोषणांचा पाऊस पडतोय. १० हजार कोटींची घोषणा केली. पण, मागच्या वर्षीच्या घोषणेचेच पैसे अद्याप मिळाले नाहीत. गेल्या वर्षभरात राज्याला ७०० कोटी रुपये सरकारने दिले आहेत. मात्र, एकट्या नांदेड जिल्ह्याला आम्ही ५०० कोटी रुपये दिले होते, असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले. गुडघाभर चिखलात आम्ही शेतकऱ्यांच्या शेतात, बांधावर जाऊन त्यांच्या पिकांची पाहणी केली, शेतकऱ्यांना धीर दिला. अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे उभं पीक वाहून गेलं. वयात आलेलं १७-१८ वर्षाचा पोरगा निघून जावा, तशी अवस्था उभं पीक गेल्यानं राज्यातील शेतकऱ्यांची झाली आहे. मात्र, सरकारनं शेतकऱ्यांना मदत केली नाही, पीकविमाही नीट मिळेनासा झालाय, असे फडणवीस म्हणाले.

# भारत-पाक सामन्यानंतर काश्मिरी व युपी बिहारच्या विद्यार्थ्यांमध्ये हाणामारी

**संग्रुर** - भारत पाकिस्तान यांच्यातील सामना म्हणजे एक प्रकारचे युद्ध असते आणि त्यातील जय पराजयानंतर दोन्ही देशात त्याच्या तीव्र प्रतिक्रिया उमटतात टी/२० विश्वचषक स्पर्धेतील भारत पाक यांच्यातील पहिल्याच साखळी सामन्यात जो भारताचा दारुण पराभव झाला त्याचे पंजाब मधील संग्रुर येथील एका अभियांत्रिकी महाविद्यालयात तीव्र पडसाद उमटले आणि विद्यार्थ्यांच्या दोन गटात हाणामारी झाली. सांग्रुर येथे गुरुदास इन्स्टिट्युट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी शिक्षण संस्था आहे या ठिकाणी वेगवेगळ्या राज्यातील विद्यार्थी शिक्षण घेतात रविवारी भारत पाक टी/२० सामन्याच्या वेळी भारताचा पराभव होताच काहींनी पाकिस्तानच्या विजयाच्या घोषणा दिल्या त्यामुळे युपी बिहारचे विद्यार्थी चिडले आणि विद्यार्थ्यांच्या दोन गटात हाणामारी सुरू झाली याच दरम्यान सोशल मीडियावर एका काश्मिरी विद्यार्थ्याचा व्हिडिओ व्हायरल झाला त्यात त्याने म्हटले होते की आम्ही शांतपणे आमच्या रूम मध्ये सामना बघत असताना युपी बिहारचे काही विद्यार्थी आमच्या रूममध्ये घुसले आणि त्यांनी तोडफोड केली. या प्रकरणी दोन्ही गटांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून परस्परांवर आरोप केले आहेत त्यामुळे काहीसे तणावाचे वातावरण आहे.

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**संक्षिप्त ई-निविदा सुचना क्र.२७ सन २०२०-२१**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | ठाणे वागळे इस्टेट येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलाचे वस्तीगृहाचे नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | २,०५,५७,७९३/- |

**डाऊनलोड करण्याचा कालावधी दिनांक.** २६/१०/२०२१ **ते दिनांक** १८/११/२०२१ **वेळ** १०.३० ते १७.३०

**निविदा पुर्व बैठक दि. १०/११/२०२१ दुपारी २.१० वाजता.**

**ई-निविदा उघडण्याचा दिनांक.** २२/११/२०२१ **वेळ** १५.०१ ते १७.३० **(शक्य झाल्यास).**

सर्व पात्र/ ईच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या **https//mahatenders.gov.in** या पोर्टलवर portal वर enrolled करणे आवश्यक आहे.

सही/-

जा.क्र. ठावि/निविदा/८०९३
कार्यकारी अभियंता यांचेकार्यालय,
सा.बां. विभाग, क्र.१ ठाणे
दिनांक-१४.१०.२०२१
आरओसी-2021-2022/क्र-5/C-2448

**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विभाग, क्र. १ ठाणे**

जाहिरात क्र. ३/५९२ दि. २५/१०/२०२१

## PUNE MUNICIPAL CORPORATION

**TENDER No:PMC/DRAINAGE/2020/124 (Retender)**

**SUPERINTENDENT ENGINEER DRAINAGE DEPARTMENT INVITATION FOR THE BELOW WORK**

Offers by way of e-tendering (Item Rate B-2 Form) are invited by the Superintendent Engineer Drainage Department. Pune Municipal Corporation from contractors in e-tendering system for following works.

| Name of work | Estimated cost (Rs) | Estimated cost put to the Tender excluding GST, (Rs) | GST (Rs) | Earnest money (Rs) | Time limit in calendar months including Monsoon | Cost of Tender Document (Rs) |
|---|---|---|---|---|---|---|
| **Tender for hiring, of consulting agency for construction supervision for project of pollution Abatement of River Mula-Mutha at pune** | B-2 Type | B-2 Type | At actual | 1000000.00 | 48 Months | 29679.00 |

The details of above works, such as Security Deposit, Earnest Money Deposit, Terms & Conditions of the Tender and Schedule B of works, are available on PMC's web site **www.mahatenders.gov.in** Tenders for these works are to be submitted by e-tendering system.

Bidders can avail the e-tender document **from 26/10/2021 to 17/11/2021 up to 03.00 PM.**

Pre-bid meeting will be held on **09/11/2021at 10.30 AM** in the Ambedkar Hall,Room No.215, Pune Municipal Corporation Building, Shivaji nagar, Pune.

Bidders should submit their offer by way of e-tendering system only. The last date of-Submission by way of e-tendering will be **17/11/2021 up to 3.30 PM.** If any change occurs it will be communicated at the time of Pre-bid / Publication on web site / News paper.

Date : 26/10/2021.

**Sd/-**
**Superintendent Engineer**
**(Drainage Project )**
**Pune Municipal Corporation**

जावक क्र.: मावजसंका/९३३

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येतेकी, श्री. परशुराम बाळाराम वडके व श्री. सतीश बाळाराम वडके हे गाळा न. २३, तळ मजला, मकानी इंडस्ट्रीयल ईस्टेट बी को-ऑप सो. लि., सर्वे नं. १४०, हिस्सा नं. ३ पार्ट, गाव मौजे नवघर, भाईंदर (पुर्व) चे मालक आहे. श्री. परशुराम बाळाराम वडके व श्री. सतीश बाळाराम वडके हे दोन्ही मयत झाले असून त्यांची वरस हे श्रीमती. स्वप्ना सतीश वडके आहे. सदर मिळकतीचे पुर्ण कागदपत्र हे श्रीमती. स्वप्ना सतीश वडके यांचा कडुन वसई पश्चीम येथे प्रवासात गहाळ झाले आहेत. सदरची मिळकत हे श्रीमती. स्वप्ना सतीश वडके यांनी सोसायटी मध्ये आपले नावे करणे करीता अर्ज केला आहे. तरी सदर मिळकती/गाळा बाबत कोणत्याही इसमांचा किंवा संस्थेचा गहाण, दान, दावा, बक्षीस, करार, वापरवहीवाट, कब्जा, भाडेपट्टा आदी व अन्य प्रकारचा हक्क व हितसंबंध, असल्यास त्यांनी त्याची लेखी हरकत पुराव्या सहीत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासुन १५ दिवसांचे आत सदर पत्त्यावर कळवावे. अन्यता कोणाचीही हरकत नाही असे समजले जाईल व त्यानंतरची कोणाचीही कुठलीही हरकत स्विकारण्यत जाईल नाही, हयाची नोंद घ्यावी.

सही /-
ॲड. अनिश कलवट
ए/जी-२, दिवाण निकेतन, नागेश्वर मंदिर समोर, दिवाणमान, वसई (प), ता. वसई, जि. पालघर.
वसई ता. २६.१०.२०२१

# राज्यपाल भगतसिंह कोश्यारींच्या हस्ते राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**रत्नागिरी, प्रतिनिधी-** देशातील नागरिकांच्या वीज, पाणी, रस्ते, बँक खाते या गरजा घरोघरी मिळाव्यात, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. जात धर्म न पाहता मानवधर्म पाळत सरकारने सुविधा उपलब्ध केल्या आहेत. पण भारतातील काही विचारवंत मात्र पश्चिमेकडून येणाऱ्या समाजवादाचे कौतुक करत आहेत. भारतात घराघरापर्यंत विकास पोहोचत आहे, याचा त्यांना त्रास होत असल्याने त्यांच्याकडून सरकारवर हिंदुत्त्व थोपवण्याचा आरोप केला जात आहे, असे उद्गार राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी काढले.

भारतीय इतिहास संशोधन परिषदेच्या दोन दिवशीय राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'जातीभेद निर्मूलन : सावरकरांच्या हिंदुत्त्वाचे सार' या हा चर्चासत्राचा विषय आहे. यावेळी व्यासपीठावर छत्तीसगडच्या बिलासपूर येथील गुरू घासीदास विश्वविद्यालयाचे कुलपती प्रा. अशोक मोडक, इतिहास संशोधन परिषदेचे सदस्य सचिव प्रा. के. रत्नम, वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय केंद्रीय विद्यापीठाचे कुलगुरू रजनीशकुमार शुक्ला, दिल्लीचे केंद्रीय माहिती आयुक्त उदयसिंह माहुरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे रणजीत सावरकर तसेच जेएनयूचे प्रा. उमेश कदम उपस्थित होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेचच जात निर्मूलन कार्यक्रम हाती घ्यायला हवा होता. पण उशिराने का होईना चांगला उपक्रम हाती घेण्यात आला आहे. देशासाठी सावरकर यांनी जे काम केले आहे, त्यावर पुन्हा विचार करण्याची वेळ आली आहे. कितीही योजना घराघरापर्यंत पोहोचवल्या तरी जोपर्यंत अस्पृश्यता नष्ट होत नाही, जाती व्यवस्था संपत नाही, तोपर्यंत देश उभा राहणार नाही, असेही राज्यपालांनी आवर्जून सांगितले. यावेळी प्रा. उमेश कदम, रणजीत सावरकर, उदयसिंह माहुरकर, रजनीशकुमार शुक्ला, प्रा. अशोक मोडक तसेच प्रा. के. रत्नाम यांची भाषणे झाली.

**जाहीर सूचना**

**ज्याच्याशी संबंधित असेल त्याच्यासाठी**

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, केम्प कंपनी लिमिटेड, नोंदणीकृत कार्यालय - ५ वा मजला, डीजीपी हाऊस, ८८/सी जुना प्रभादेवी मार्ग, मुंबई ४०००२५ ची खालील भागधारकाच्या नावे नोंदणीकृत असलेले भाग प्रमाणपत्र त्यांच्याद्वारे हरवले आहे.

| भागधारकाचे नाव | फोलियो क्र. | प्रमाणपत्र क्र. | डिस्टिंक्टीव्ह क्रमांक | भाग |
|---|---|---|---|---|
| सुनालिनी पी खांडेपारकर | ०१९०००३३ | २२९८ व २२९९ | ११६९८१ - ११७००० | २० |

उपरोल्लेखित भाग प्रमाणपत्रे खरेदी करणे किंवा कोणत्याही मार्गे व्यवहार करणे याविरुद्ध जनतेस याद्वारे सावध करण्यात येत आहे. कोणा व्यक्तीचा सदर भाग प्रमाणपत्राच्या संदर्भात कोणताही दावा असल्यास, त्यांनी तो दावा कंपनी किंवा त्यांच्या निबंधक आणि हस्तांतरण एजन्ट लिंक इन टाईम इंडिया प्रा. लि., सी-१०१, २४७ पार्क, ला ब शा मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र, ४०० ०८३ यांच्याकडे सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत दाखल करावा. त्यानंतर कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही आणि कंपनी दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्याची प्रक्रिया सुरू करेल.

**ठिकाण: मुंबई** **भागधारकांचे नाव**
**दिनांक: २६.१०.२०२१** **मयूर पी. खांडेपारकर**

**जाहीर सूचना**

**ज्याच्याशी संबंधित असेल त्याच्यासाठी**

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, जीईई लिमिटेड, नोंदणीकृत कार्यालय - प्लॉट क्र. ई-१, रस्ता क्र. ७, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र, ४०० ६०४ ची खालील भागधारकांच्या नावे नोंदणीकृत असलेली भाग प्रमाणपत्रे त्यांच्याद्वारे हरवली आहेत.

| भागधारकाचे नाव | फोलियो क्र. | प्रमाणपत्र क्र. | डिस्टिंक्टीव्ह क्रमांक | भाग |
|---|---|---|---|---|
| सुनालिनी पी खांडेपारकर प्रभाकर खांडेपारकर | २५७७६० | ११३८३<br>११७४७ | १२६९४०१६ - १२६९४४१५<br>१७७९७०१० - १७७९७०८९ | ४००<br>८० |

उपरोल्लेखित भाग प्रमाणपत्रे खरेदी करणे किंवा कोणत्याही मार्गे व्यवहार करणे याविरुद्ध जनतेस याद्वारे सावध करण्यात येत आहे. कोणा व्यक्तीचा सदर भाग प्रमाणपत्रांच्या संदर्भात कोणताही दावा असल्यास, त्यांनी तो दावा कंपनी किंवा त्यांच्या निबंधक आणि हस्तांतरण एजन्ट लिंक इन टाईम इंडिया प्रा. लि., सी-१०१, २४७ पार्क, ला ब शा मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र, ४०० ०८३ यांच्याकडे सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत दाखल करावा. त्यानंतर कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही आणि कंपनी दुय्यम भाग प्रमाणपत्रे पारित करण्याची प्रक्रिया सुरू करेल.

**ठिकाण: मुंबई** **भागधारकांचे नाव**
**दिनांक: २६.१०.२०२१** **मयूर पी. खांडेपारकर**

**TENDER NOTICE**

Civil contractors invited for Repair, painting & allied works of

**"HARMONY APARTMENT C.H.S. LTD."**

C.T.S.NO.659,660 &660 (PART 1 TO 3)
NEXT TO TATA POWER HOUSE,
MAROL, ANDHERI (EAST),
MUMBAI-400072.
Application & tender fees Rs. 4000/- Cash/DD (Non-Refundable) shall be submitted at consultant's office between 11:00 am to 5:00 pm on dated 20/10/2021 to 30/10/2021.

**M/S SUYOG STRUCTURAL DESIGN CONSULTANT'S**

**Office Address**: 103, 1st Floor, Technocity Building, Plot No. X-5/3, Near Hotel Sarovar Portico, TTC Industrial Area, MIDC Mahape, Navi Mumbai. Mob. No. - 9136753966 Landline No.- 022 27780666
Blank tender documents will be issued to the applicants only at Consultants office between 11:00 am to 5:00 pm on dated 01/11/2021. Sealed tenders shall be submitted at Society office between 10:00 am to 05:00 pm on dated 07/11/2021.

# सातारा जिल्हा बँकेत जागा अडविणाऱ्या संचालकांना घरी बसवा- आ.शिवेंद्रसिंहराजे

**सातारा-** सातारा जिल्हा बँकेच्या संचालक निवडीसाठी आज सकाळी अर्ज दाखल करण्यात आले. यावेळी आ. शिवेंद्रसिंहराजे यांनी सभासदांना विनंती आहे, बँकेच्या वाटचालीत योगदान आहे अशा उमेदवारांना मतदान करावे. केवळ जागा अडविण्यासाठी किंवा सातारा जिल्हा बँक देशातील सहकारतील मोठी संस्था आहेम्हणून काहीजण येऊ इच्छितात. काही जण मागच्या निवडणुकीत जागा अडविण्यासाठी बँकेत आले आहेत अशांना आता घरी बसवावे, अशी टीका केली.

आ. शिवेंद्रसिंहराजे यांनी सांगितले की, भाऊसाहेब महाराज यांच्यानंतर संचालक, चेअरमन म्हणून मला काम करण्याची संधी मिळाली. गेली पाच वर्षे मला अध्यक्ष म्हणून सातारा जिल्हा बँकेत काम करण्याची संधी मिळाली. बँक राज्यात, देशात कायम एक नंबरला राहिलेली आहे. सध्या सर्व इच्छुकांना अर्ज भरण्यास सांगितले आहे. जागा वाटप झाल्यानंतर अर्ज माघारी घेण्यात येणार आहेत. त्यामुळे बंडखोरी होणार नाही. या निवडणुकीत मी आणि राष्ट्रवादी मिळून जे पॅनल होत आहे ते शंभर टक्के विजयी होणार आहे. कुणी काही म्हणाले, कितीही टीका केली तरी त्याचा फायदा होणार नाही उदयनराजेंना सोबत घेण्याचा निर्णय पक्षाचे प्रमुख शरद पवार, अजित पवार आणि रामराजे नाईक-निंबाळकर हे करतील, असेही शिवेंद्रसिंहराजे म्हणाले.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

पाणी पुरवठा विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिके तर्फे पाणी पुरवठा विभाग, कळवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र. २३ (अ) मनिषानगर येथील जलकुंभा जवळ १०० मीमी. व्यासाची डी.आय. जलवाहिनी टाकणे कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा सूचना, निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. २६/१०/२०२१ ते दि.९/११/२०२१ पर्यंत उपलब्ध आहे. सदर निविदा सूचनेमधील ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि. ९/११/२०२१ रोजी सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल. सदरची निविदा दि.११/११/२०२१ रोजी निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येईल.

**ठामपा/पिआरओ/पा.पु-कळवा/७९७/२१-२२** **सही/-**
दि:२५.१०.२०२१ **कार्यकारी अभियंता**
***plsvisitourofficialweb-site*** **ठाणे महानगरपालिका,ठाणे**
***www.thanecity.gov.in***

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that the following Share Certificates for 20 and 200 Equity Shares of Rs. 100/- (Rupees hundred only) and Rs.10/- (Rupees ten only) each respectively with Folio No. S0070565 of **Housing Development Finance Corporation Limited**, having its registered office at 5th Floor, Ramon House, H.T. Parekh Marg, 169, Backbay Reclamation, Churchgate,Mumbai,Maharashtra,400020 registered in the name of **Suneta M Advani** have been lost. **Pramilla Advani Kripalani** has applied to the company for issue duplicate certificate. Any person who has any claim in respect of the said shares certificate should lodge such claim with the company within in 15 days of the publication of this notice.

| Folio | Certificate No. | Distinctive No (From) | Distinctive No (To) | No. of Shares |
|---|---|---|---|---|
| S0070565 | 284594 | 3715931 | 3715940 | 10 |
| S0070565 | 719297 | 6061259 | 6061263 | 5 |
| S0070565 | 1029129 | 8423759 | 8423763 | 5 |
| S0070565 | 2393671 | 129301343 | 129301542 | 200 |

Place : Mumbai
Date : 26/10/2021

Sd/
**Pramilla Advani Kripalani**

# ई-कॉमर्सविरोधात देशातील बडे व्यापारी आक्रमक

**नवीदिल्ली-** भारत सरकारच्या ई-कॉमर्स धोरणाचा देशातील प्रमुख व्यावसायिक नेते उघडपणे निषेध करत आहेत. कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सच्या नेतृत्वाखाली आज देशातील सर्व राज्यातील ३३ प्रमुख व्यावसायिक नेत्यांनी एक संयुक्त निवेदन दिले आहे. या संयुक्त निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, कोणतेही सरकारी धोरण नसल्यामुळे आणि एफडीआय नियमांमध्ये स्पष्टता नसल्यामुळे नियमांकडे अत्यंत उदासीनतेने दुर्लक्ष केले जाते. सरकारी विभागांच्या हलगर्जीपणा आणि उदासीनतेमुळे परकीय गुंतवणूक असलेल्या ई कॉमर्स कंपन्यांना या क्षेत्रात पूर्ण मोकळीक मिळाली आहे. त्यामुळे देशातील व्यापाऱ्यांना याचा मोठा फटका बसत आहे. या सगळ्याला आळा घालण्यासाठी आजपर्यंत सरकारकडून कोणतेही अर्थपूर्ण पाऊल उचलले गेले नाही.

**जाहीर नोटीस**

या नोटीस व्दारे तमाम लोकांना कळवण्यात येते की, शिवसह्याद्री एस. आर. ए. को. ऑप हौ. सोसायटी लिमिटेड बिल्डिंग नं. 108. न्यू म्हाडा वसाहत मानखुर्द मुंबई 400043. या संस्थेचा नोंदणी क्रमांक एम.यु. एम. आर. एच. जी. (टी. सी.) 10767 असून सदर संस्थेत सदनिका क्र. 310 प्रमिला दशरथ खरात यांचे नावे आहे. प्रमिला दशरथ खरात यांचे 11/02/2019 रोजी निधन झाले असुन त्यांचा मुलगा बबन दशरथ खरात यांनी आपण त्यांच्या कायदेशीर वारस असण्याबाबत व सदर सदनिकेचे संस्थेने त्यांच्या नावे करण्याबाबत संस्थेकडे विनंती अर्ज केलेला आहे. प्रमिला दशरथ खरात यांच्या सदनिकेचे कोणीही कायदेशीर हक्कदार असल्यास किंवा सदर सदनिकावर कोणत्याही बँका वित्तसंस्था किंवा अन्य कुणा व्यक्तीचा कर्ज बोजा असल्यास किंवा कोणत्याही प्रकारे कुणीही वारस हक्काचा दावा करावयाचा असल्यास अशा व्यक्तींनी संस्थेच्या शिवसह्याद्री एस. आर. ए. को. ऑप हौ. सोसायटीचे अध्यक्ष किंवा सचिव यांना उपरोक्त पत्यावर प्रत्यक्ष किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत योग्य ते पुरावे व कागद पत्रासह नोटीस प्रसिद्धी पासुन 14 दिवसाच्या आत संपर्क साधावा विहित मुदतीत कोणाचे आक्षेप न आल्यास बबन दशरथ खरात हेच कायदेशीर वारस आहेत असे मानून सदर सदनिका व संस्थेतील भाग बबन दशरथ खरात यांचे नावे हस्तांतरीत करण्यात येईल. त्यानंतर कुणाचेही आक्षेप किंवा कायदेशीर हक्क विचारात घेतले जाणार नाहीत.

शिवसह्याद्री एस. आर. ए.
को. ऑप हौ. सोसायटी
सही/
अध्यक्ष / सचिव

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that the following Share Certificates for 1000 Equity Shares of Rs.10/- (Rupees ten only) each with Folio No. 00928108 of **Indusind Bank Limited**, having its registered office at 2401, General Thimmayya Road, Cantonment, Pune, Maharashtra, 411001 registered in the name of **Sunita M Advani** have been lost. **Pramilla Advani Kripalani** has applied to the company for issue duplicate certificate. Any person who has any claim in respect of the said shares certificate should lodge such claim with the company within in 15 days of the publication of this notice.

| Folio | Certificate No. | Distinctive No (From) | Distinctive No (To) | No. of Shares |
|---|---|---|---|---|
| 00928108 | 187047-187056 | 69695991 | 69696990 | 1000 |

Place : Mumbai
Date : 26/10/2021

Sd/
**Pramilla Advani Kripalani**

# जळगावातील १२ बाजार समित्यांच्या निवडणुका जाहीर! ५ फेब्रुवारीला मतदान

■ जळगाव, प्रतिनिधी

**जिल्ह्यातील** १२ कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुका घोषित झाल्या आहेत.प्रक्रियेनुसार ३ जानेवारी पासून नामनिर्देशन पत्र दाखल करणे सुरू होऊन ५ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. या निवडणुकांसाठी बाजार समित्यांची अंतिम मतदार यादी २४ डिसेंबरला जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार ५ फेब्रुवारी २०२२ रोजी जळगाव जिल्ह्यातील १२ बाजारसमित्यांच्या निवडणूका होणार आहेत. त्या अनुषंगाने मतदार याद्या तयार करून सहकारी निवडणूक प्राधिकरणाला देण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. येत्या २४ डिसेंबर रोजी बाजार समित्यांच्या अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध होणार आहेत. निवडणूक कार्यक्रमानुसार ३ जानेवारी २०२२ रोजी निवडणूक अधिकारी निवडणूक कार्यक्रम जाहीर करतील. त्यानुसार त्याच दिवसापासून उमेदवारी दाखल करणे सुरू होणार आहे. ३ ते ७ जानेवारीपर्यंत नामनिर्देशन पत्र दाखल करणे, १० जानेवारी रोजी छाननी व ११ रोजी वैध अर्ज जाहीर होतील. ११ ते १५ जानेवारी पर्यंत माघार घेता येईल व ५ फेब्रुवारी रोजी मतदान आणि ६ रोजी मतमोजणी होणार आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

जी/दक्षिण वॉर्ड, धन मिल नाका, ना.म.जोशी मार्ग, मुंबई ४०००२५.

**ई-निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महापालिका आयुक्त खाली नमूद केलेल्या कामांकरिता "ई-निविदा" मागवित आहेत.

| वर्णन | बोली क्र. | इसारा रक्कम अनामत रु. | कंत्राट कालावधी | बोली सुरुवात दिनांक आणि वेळ | ऑनलाईन बोली सादरीकरणाचा नियत दिनांक व वेळ पर्यंत. |
|---|---|---|---|---|---|
| जी/द वॉर्डमध्ये डिजिटल पद्धतीने रंगवलेले ११०० लि. एमएस बिन्सचे पुनःआमंत्रित प्राप्तण | ७२०००१५३०४ | २९,५००/- | ४५ दिवस | २६.१०.२०२१ ११.०० वा. | २८.१०.२०२१ १६.०० वा. |
| जी/द वॉर्डमधील बीट क्र. १९३मध्ये १० लि. क्षमतेच्या डस्टबीन्सचे प्राप्तण. | ७२०००१५३३९ | २०,०००/- | ३० दिवस | २६.१०.२०२१ ११.०० वा. | ०२.११.२०२१ १६.०० वा. |

पात्रता निकष आणि अधिक तपशिलाकरिताः
http://portal.mcgm.gov.in वरील "ई-निविदा" सेक्शनअंतर्गत लॉग ऑन व्हा किंवा
**सहा. आयुक्त**
जी /दक्षिण वॉर्ड, धनमिल नाका,
ना.म.जोशी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - १३
दूरध्वनीः ०२२-२४३०५०३१ विस्ताः १२४
ईमेल आयडीः ae01swm.gs@mcgm.gov.in
या कार्यालयास संपर्क साधावा.

सही/-
**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.)**
जी/दक्षिण वॉर्ड

पीआरओ/१३७४/जाही./२०२१-२२

**थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा.**

**सूचना**

दी बॉम्बे सालेसियन सोसायटीचे ट्रस्टी, पीटीआर नं. एफ- ९०३ (मुंबई) पत्ता- डॉन बॉस्को प्रोव्हिन्शिअल हाऊस, नाथालाल पारेख मार्ग, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९ यांच्याद्वारे गोविंदनगर, गाव बोळिंज, विरार (प.), ता. वसई, जि. ठाणे (नवीन जि. पालघर) येथील सर्व्हे क्र. ४१३, हिस्सा क्र. १ (पार्ट) व २ (पार्ट) आणि सर्व्हे क्र. ४१३ (पार्ट) या भूखंडावरील बंगला क्र. ए-२१ व २२ अंदाजे क्षेत्रफळ १०६५ चौ. फुट बिल्टअप एरिया (प्रत्येकी) या ट्रस्टच्या स्थावर मालमतेच्या जशी आहे जेथे आहे तत्त्वावरील विक्रीकरिता मोहोरबंद प्रस्ताव मागविण्यात येत आहेत, जी बाब धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मंजुरीच्या अधीन आहे.

ट्रस्टच्या ट्रस्टींद्वारे खालील निर्देशित पत्त्यावर सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मोहोरबंद प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. मोहोरबंद प्रस्ताव हे वरील निर्देशित पत्त्यावरील जागेकरिता असतील. मोहोरबंद प्रस्तावांसमवेत इसारा रक्कम म्हणून प्रस्ताव रकमेच्या १०% मूल्याचा ट्रस्टच्या नावे मुंबईत देय धनाकर्ष सादर करावा. ट्रस्टींनी कोणताही प्रस्ताव स्वीकारल्यास इसारा रक्कम ट्रस्टच्या नावे मुंबईत देय धनाकर्षाच्या स्वरूपात जमा करावी.

३० दिवसाच्या कालावधीच्या समाप्तीपश्चात प्राप्त प्रस्ताव व / वा इसारा रकमेशिवाय प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

ट्रस्टींनी कोणताही प्रस्ताव स्वीकारल्यास इसारा रक्कम व्यवहाराच्या संदर्भात जुळवून घेण्यात येईल. मोहोरबंद प्रस्ताव दि. २५.११.२०२१ रोजी स. ११.०० वाजता ट्रस्टच्या खालील निर्देशित कार्यालयाच्या पत्त्यावर उघडण्यात येतील ज्या वेळेस प्रस्तावित खरेदीदारांना त्यांच्या प्रस्तावांवर पुनर्विचार करण्याची व इच्छुक असल्यास त्यांचे प्रस्ताव वाढवण्याची संधी देण्यात येईल.

कोणतेही कारण न देता कोणताही प्रस्ताव स्वीकारणे व/वा रद्द करण्याचा अधिकार ट्रस्टींकडे राखून आहे. विक्री ही धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मंजुरीच्या अधीन असेल.

दिनांक : २६.१०.२०२१
ठिकाण: मुंबई

**सही/-**
**सचिव**
**दी बॉम्बे सालेसियन सोसायटी**
डॉन बॉस्को प्रोव्हिन्शिअल हाऊस, नाथालाल पारेख मार्ग, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.

**शुभ राशी**
**मंगळ. दि.२६/१०/२०२१**

| | | |
|---|---|---|
| १ | ६ | ३ |
| १२ | ६२ | ३२ |
| १७ | ६७ | ३७ |
| १४६ | १२३ | २३८ |
| ४७० | १५० | ५८० |

# चंदेरी च्वींगम



टेलिव्हिजन इंडस्ट्रीमध्ये आपल्या अभिनयाने लाखो मने जिंकणारी अभिनेत्री **अदिती सजवान** सध्या स्टार भारतवरील 'हाथी घोडा पालकी जय कन्हैया लाल की' या मालिकेत आई यशोदा ही भूमिका साकारतेय. याच पार्श्वभूमीवर तिच्याशी केलेली बातचीत...

## यशोदेची उर्जा, भावना माझ्यातही आहेत

**अदिती, या मालिकेबद्दल नेमके काय सांगशील?**

- 'हाथी घोडा पालकी जय कन्हैया लाल की' ही मालिका भगवान श्रीकृष्णाच्या बाल लीलांवर आधारलेली आहे. बाळकृष्ण आणि त्याची आई यशोदा यांच्यातील सुंदर भावबंधाभोवती ही मालिका फिरते. बाळकृष्णाच्या कथा लोकांना माहीत आहेतच, पण त्याच येथे आम्ही नव्या दृष्टीकोनातून आणि बारीकसारीक तपशीलांसह सादर करत आहोत.

**तुझ्या भूमिकेच्या वेगळेपणाबद्दल काय सांगशील?**

- माझी व्यक्तिरेखा ही या मालिकेचा मूळ आत्मा आणि शक्ती आहे याची कल्पना मला आहे. धार्मिक पुस्तकांनुसार, आई यशोदा हेच कारण आहे ज्यामुळे विष्णूने पृथ्वीवर कृष्णाच्या रूपात अवतार घेतला. यामुळेच तो आपले वचन पूर्ण करू शकला आणि जगाला आईचे निःस्वार्थ प्रेम दाखवू शकला. मी तर या व्यक्तिरेखेच्या प्रेमातच पडले आहे. मला असे वाटते की आई यशोदेची ऊर्जा, तिच्या भावना माझ्यामध्ये खूप आहेत. त्याच्याप्रमाणे, मी खूप भावनिक, तापट, खूप संरक्षणात्मक आणि माझ्या प्रियजनांविषयी संवेदनशील आहे. मला आशा आहे की बहुतेक महिलांना माज्या आई यशोदाचे पात्र पाहून स्वतःचा एक भाग तरी सापडेल.

**यशोदेची भूमिका तू दुसऱ्यांदा साकारत आहेस. पौराणिक कथांशी जवळीक असण्याचे काही विशेष कारण?**

- होय, यशोदेची ही माझी दुसरी भूमिका आहे. या मालिकेत पुन्हा हीच भूमिका मी स्वीकारली याचं कारण म्हणजे याआधी मी केलेली यशोदेची भूमिका प्रेक्षकांना खूप आवडली होती. मी ती मनापासून केली होती. त्यामुळे आता परत तेच काम करणं मला सोपं जाणार होतं. यशोदेची उर्जा, भावना माज्यात आहेत असंही मला वाटतं. शिवाय दुसऱ्यांदा ही भूमिका माझ्याकडे चालून आली होती. प्रॉडक्शन हाऊस आणि वाहिनीने काहीतरी विचार करूनच मला या भूमिकेसाठी निवडले असेल ना... प्रेक्षकांनाही पुन्हा मला या रूपात पाहून आनंद झाला. सोशल माध्यमांवरून मला ते कळलेय.

**एखाद्या बाळासोबत शूटिंग करणं आव्हानात्मक नक्कीच असेल ना?**

- हो ना... खूपच आव्हानात्मक आहे. कारण आपल्याला त्या मुलाच्या सोयीनुसार आणि समजुतीनुसार शूट करायचे असते. बेबी हेझल इतकी लहान आहे की तिला कसं वागावं हे माहीतही नाही. पण ती इतकी गोड आहे की, तीच या मालिकेचा यूएसपी आहे. यापूर्वी एवढ्या लहान मुलाला मालिकेचा इतका महत्त्वाचा भाग कधीच दिलेला मला आठवत नाही. पण मला खात्री आहे, आम्ही सर्व अडचणींवर मात करू आणि सर्व आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम होऊ, ही एक उत्कृष्ट मालिका आहे. सर्वांना आवडेलच.

**या मालिकेमधील तुझ्या लुकबद्दल सांग?**

- या मालिकेत माझा लुक खूपच छान आहे. डोळे दिपवणारा आणि अतिशय श्रीमंत वाटावा असा आहे. त्यात काहीसा घरगुतीपणाही आहे. आई यशोदा सुंदर रेशीम कपडे आणि दागिन्यांनी सजलेल्या भारतीय राजकुमारीसारखी दिसते. निर्मात्यांनी मला जो लुक दिला आहे तो मला खरोखर आवडला आहे. मग तो ड्रेस असो, मेकअप असो किंवा दागिने, प्रत्येक गोष्ट खूप आनंददायी आहे.

## दिपक राणेंच्या नव्या सिनेमात शिवानी सुर्वे



लोकप्रिय अभिनेत्री शिवानी सुर्वे ही लवकरच निर्माते दिपक राणे यांच्या नव्या सिनेमात झळकणार आहे. या सिनेमात शिवानीसोबत अजून कोणकोणते कलाकार असतील हे जाहीर करण्यात आलेले नाही. गेल्या दहा वर्षातल्या यशस्वी टिव्ही कारकिर्दीनंतर 'बिग बॉस मराठी' हा रिॲलिटी शो तिने केला. २०१६ला शिवानी 'घंटा' सिनेमात झळकली. त्यानंतर २०१९मध्ये अंकुश चौधरीसोबत 'ट्रिपल सीट' सिनेमात ती दिसली. २०२० मध्ये तिला चार मानाचे नामांकित पुरस्कार मिळाले. त्यात सिटी सिने अवॉडर्समध्ये शिवानीला 'ट्रिपल सीट' सिनेमासाठी 'सर्वोत्कृष्ट डेब्युटंट अभिनेत्री' पुरस्काराने गौरवण्यात आले. आपल्या नव्या प्रोजेक्टविषयी बोलताना शिवानी सांगते, 'मी या सिनेमासाठी फारच उत्सुक आहे. जेव्हा मी पहिल्यांदा ही कथा ऐकली. त्यानंतर मी क्षणाचाही विलंब न लावता त्वरीत होकार कळवला. खरंतर या सिनेमातील माझी भूमिका खूपच चॅलेंजींग आहे. आणि मी पहिल्यांदाच माज्या कम्फर्ट झोनच्या बाहेर जाऊन काहीतरी चॅलेंजिंग करणार आहे. सध्या मी सिनेमातील भूमिकेची तयारी करतेय. या सिनेमाचे शूटींग लवकरच सुरू होईल.'

## गीतांजली कुलकर्णी सोडवणार 'केस नंबर-२'




स्टोरीटेलवर दिग्गज साहित्यिकांसोबतच नव्या दमाच्या प्रतिभावंतांनाही विशेष स्थान दिले जात आहे. आपल्या मातृभाषेतील नवनवे साहित्य ऑडिओबुक्सद्वारे सातत्याने स्टोरीटेलवर निर्माण होत आहे. लेखिका सायली केदार यांच्या 'केस नंबर ००१'च्या पहिल्या सिझनला मिळालेल्या प्रचंड यशानंतर या मालिकेचा दुसरा सिझन प्रख्यात अभिनेत्री गीतांजली कुलकर्णी हिच्या आवाजात स्टोरीटेल मराठीवर प्रदर्शित होतोय. गीतांजली कुलकर्णी आपल्या या अनुभवाबद्दल म्हणाली, 'केस नंबर ००२' चा अनुभव यासाठी चांगला होता, की सई आणि सायली दोघीही खूप मन लावून काम करतात. आम्ही एकत्र मिळून खूप चर्चा केल्या, त्या खूप इनपुट्स देतात, त्यामुळे असं नाही वाटत की तिथे फक्त आपण आहोत तिथं. आपल्याला मदत करायला खूप लोकं असतात. हे पात्र तसंच साउंड नाही ना होत आहे, वेगळं वाटतंय ना? तर त्यामुळे काम करताना जे सुरुवातीला स्पेशिअली गरज असते. आणि नंतर अर्थातच तुम्हाला अंदाज येतो आणि मग तुम्ही फाईंडआऊट करता की कसं असेल हे पात्र आणि तुम्ही करत जाता. हे एक टीम वर्क आहे. यात थरार, भीती, प्रेम प्रसंग असे अनेक प्रसंग आहेत. त्यातील भाव रेकॉर्ड करताना मला फार मजा आली. ऑडिओबुक रेकॉर्डिंगची प्रोसेसच मला मेडिटेटिंग वाटते, असेही ती म्हणाली.

## सलमान खान आणि संजय लीला भन्साळी पुन्हा एकत्र !



'हम दिल दे चुके सनम' या चित्रपटानंतर अभिनेता सलमान खान आणि दिग्दर्शक संजय लीला भन्साळी ही जोडी अद्याप एकत्र झळकलेली नाही. तब्बल २१ वर्षानंतर आता ही जोडी पुन्हा एकत्र काम करणार असल्याची चर्चा आहे. 'इंशाअल्लाह' या चित्रपटासाठी तब्बल ते एकत्र येणार होते. काही कारणात्सव हा चित्रपट रद्द करावा लागला. मात्र आता एका माहितीपटात ते झळकणार आहेत. सलमान खानच्या 'बियॉन्ड द स्टार' या माहितीपटांच्या मालिकेचा एक भाग असणार आहेत. या मालिकेची निर्मिती सलमानच्या प्रॉडक्शन हाऊसद्वारे केली जाणार आहे. या माहितीपटांची मालिका ही सलमान खानच्या जीवनावर आधारित असेल. याबाबत काही दिग्दर्शक, निर्माते, अभिनेते यांच्याशी संपर्क साधण्यात येत आहे.

## स्तवन शिंदे साकारणार जिगरबाज मावळा शिवा काशिद



शिवा काशिद हे स्वराज्याच्या इतिहासातलं महत्त्वाचं पान. शिवरायांचा हा जिगरबाज मावळा हुबेहुब शिवरायांसारखा दिसायचा असं म्हण्टलं जातं. महाराजांची पन्हाळ गडावरुन सुटका करण्यासाठी शिवा काशिद यांनी छत्रपती शिवरायांचं सोंग घेऊन आपल्या राजाचा जीव वाचवला होता. याच जिगरबाज शिवा काशिद यांच्या शौर्याची गाथा साकारण्यासाठी अभिनेता स्तवन शिंदे सज्ज झाला आहे. जय भवानी जय शिवाजी मालिकेतल्या या भूमिकेविषयी सांगताना अभिनेता स्तवन म्हणाला, 'स्टार प्रवाहने दिलेल्या या संधीसाठी मी खूपच आभारी आहे. स्टार प्रवाहच्या तुमचं आमचं सेम असतं आणि 'अग्निहोत्र २' या मालिकेत प्रेक्षकांनी मला पाहिलंच आहे. आता 'जय भवानी जय शिवाजी मालिकेच्या निमित्ताने पुन्हा जोडला जातोय' याचा आनंद आहे. शिवा काशिद यांच्या शौर्याविषयी आपण ऐकलं आहे. जय भवानी जय शिवाजी मालिकेच्या निमित्ताने ते प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळणार आहे. मी या नव्या भूमिकेसाठी खूपच उत्सुक आहे. मी लहानपणी घोडेस्वारी शिकलो आहे. त्यामुळे ही भूमिका साकारताना त्याचा नक्कीच उपयोग होईल. यासोबतच काही ऐतिहासिक पुस्तकांचं वाचन करत आहे.'

## 'बाबू'मध्ये नेहा महाजनची एंट्री



अंकित मोहनची प्रमुख भूमिका असणाऱ्या 'बाबू' या चित्रपटाचे चित्रीकरण सध्या एकदम जोमात सुरु आहे. काही दिवसांपूर्वीच अंकितचे ॲक्शन सीन्स व्हायरल झाले होते. ॲक्शनचा धमाका असणाऱ्या या चित्रपटात आता नेहा महाजनची एंट्री झाली आहे. मराठी, हिंदी चित्रपटांमधून घराघरात पोहोचलेली नेहा महाजन या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. सध्या तिचा या चित्रपटातील लूक सोशल मीडियावर व्हायरल होत असून यात तिने लाल रंगाची साडी नेसलेली दिसत आहे. त्यामुळे नेहाचा हा एकंदर पेहराव बघून या चित्रपटाविषयीची प्रेक्षकांमधील उत्सुकता आता अधिकच वाढली आहे. आता नेहाची भूमिका काय आहे, हे प्रेक्षकांना लवकरच कळेल. या चित्रपटाचे दिग्दर्शक मयूर मधुकर शिंदे आहेत.

## 'विजेता' पुन्हा प्रदर्शनासाठी सज्ज




मुक्ता आर्ट्स ची निर्मिती असलेला चित्रपट ₹विजेता₹ येत्या १२ मार्च 2020 रोजी रिलीज झाला होता. पण कोरोनाचा उद्रेक वाढल्याने चित्रपटाचे प्रदर्शन एकादिवसात मागे घेण्याचा निर्णय सुभाष घाई यांनी घेतला . पण आता परिस्थिती पुन्हा हळूहळू पूर्वपदावर येत आहे आणि मुक्ता आर्टस ने विजेताचे पुन्हा प्रदर्शन करण्याचा निर्णय घेतला .या चित्रपटात नामांकित कलावंत काम करत आहेत. ज्यामध्ये सुबोध भावे,पुजा सावंत, प्रीतम कागणे ,सुशांत शेलार,माधव देवचक्के,मानसी कुलकर्णी ,तन्वी किशोर, देवेंद्र चौगुले, दिप्ती धोत्रे, क्रुतिका तुलसकर,आणि गौरीश शिपुरकर यांचा समावेश आहे. येत्या 3 डिसेंबर रोजी चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

## नव्या सिनेमासाठी विराट मडके मॅंगलोरला




नाट्यगृहे आणि सिनेमागृहे नुकतीच सुरू झाली आहेत. त्यामुळे नवनव्या सिनेमांच्या घोषणाही होत आहेत. अनेक कलाकार सिनेमांच्या चित्रीकरणासाठी विविध देशात जात आहेत. मराठमोळा रांगडा अभिनेता विराट मडके त्याच्या नव्या सिनेमासाठी मॅंगलोरला रवाना झाला आहे. ही माहिती त्यानेच सोशल मिडीयावर शेअर केलीये. विराट हा मूळचा कोल्हापूरचा आहे. त्याने 'केसरी' सिनेमातून मराठी सिनेसृष्टीत पदार्पण केले. तिथून त्याचा प्रवास सुरू झाला. इंजीनिअरिंगचे शिक्षण घेत असताना त्याने प्रायोगिक रंगभूमीवर पाऊल ठेवले. 'केसरी' सिनेमासाठी त्याने त्याच्या शरीरावर बरीच मेहनत घेतली होती. त्यामुळे त्याच्या भूमिकेची सिनेसृष्टीत चर्चा रंगली होती. आपल्या नव्या सिनेमाविषयी विराट मडके सांगतो, 'एक कलाकार म्हणून मला वेगळ्या धाटणीचा सिनेमा आणि भूमिका साकारायची इच्छा होती. अगदी तश्याच प्रकारची संधी मला निर्माते दिपक राणे यांनी त्यांच्या नव्या सिनेमामध्ये दिली. त्यामुळे मी या सिनेमाच्या चित्रीकरणासाठी फारच उत्सुक आहे.'

## शेमारू टीव्हीवर नवी मालिका 'जिजी मां'



धाकट्या बहिणीसाठी मोठी बहीण एक असा त्याग करायला तयार होते, ज्याची कधी कुणी कल्पनाही केली नसेल. या कथानकावर बेतलेली 'जिजी मां' ही नवी मालिका नुकतीच शेमारू टीव्हीवर सुरू झाली आहे. या मालिकेतून दोन बहिणींचे एकमेकींवरील प्रेम, समर्पित वृत्ती आणि त्यागाची तयारी पाहायला मिळणार आहे. आईवडिलांच्या अचानक मृत्यूनंतर लहानग्या नियतीला सांभाळण्याची जबाबदारी छोट्या जिजीवर येऊन पडते. नियतीसाठी जिजीला आपली स्वप्ने, आशा, आकांक्षांचा त्याग करावा लागतोच, पण मोठेपणी तिला आणखी एक भयंकर त्यागासाठी मन घट्ट करावे लागते. जिजी मांची भूमिका करणारी अभिनेत्री तन्वी डोगरा म्हणाली, ही मालिका शेमारू टीव्हीवर सुरू होतेय याचा आनंद होतोय. जिजी मां ही प्रेम, विश्वास आणि त्यागाची आगळीवेगळी मूर्ती आहे. प्रेक्षकांना ही मालिका नक्की आवडेल याची मला खात्री आहे, असेही तिने स्पष्ट केले. ही मालिका दररोज संध्याकाळी ७ वाजता दाखवली जाते.

# महाशब्दकोडे-२३७३



**आडवे शब्द -** १. विनयी, लीन २. पौर्णिमा (बोली भाषेत) ४. कुसुम ५. अन्य मार्ग, उपाय ९. कृष्ण १०. तह १२. तमाशा कलावंतांचा ग्रुप १३. मृत्यू १४. अचानक आलेला पाहुणा १५. रोजच्या वापरात नसलेली बाजूची वाट १७. भाक, कसम १८. सुरळीच्या वड्या, एक खाद्यपदार्थ २०. पार्वतीचे एक नाव २१. झोपडी २२. वात्सल्य २३. गोणपाट २४. कणीक मळताना वापरलेले थोडेसे तेल २६. शाळेतला, बालीश २८. लोभी २९. आवड ३०. परिमार्जन ३३. शस्त्रक्रिया करण्याआधी रुग्णाला ही द्यावी लागते ३४. नोकरदाराच्या डब्यातला पदार्थ ३८. मोठी वाटी ४०. जास्त किंमतीचे ४२. किल्ल्यांचा गुच्छ ४४. प्रयोजन, हेतू ४६. बाजारात केलेली खरेदी ४७. अविरोध ४८. देवाची इच्छा, आपोआप घडणे ४९. सुंदर स्त्री ५१. शैली, विशिष्ट प्रकारे हालचाल ५३. प्रणव ५४. धोबी ५६. माजलेला ५७. नुकतेच जन्मलेले ६०. दिवस ६३. संरक्षण ६४. आमंत्रण ६६. संकटातून वाचवणारा ६९. थोरवी ७०. युद्धात भूमी जिंकणे ७२. सुंठीचे पूर्वरूप ७३. लाडका शिष्य, तालमीतला पहिलवान ७६. अन्न रांधण्याची कला ७९. नमुना ८०. डझन ८१. शिखर ८३. कच्छप, कूर्म ८४. त्वचेवरील सूक्ष्म केस ८७. हिंदूंचे पवित्र रोप ८८. लादी, कुऱ्हाड ८९. नुकताच लिहिणे-वाचणे शिकलेला ९२. ऋषीचे घर ९४. शस्त्र ९६. सरशी ९७. प्रणाम ९८. हिंसाचार, रक्त सांडणे ९९. रांग १००. नऊपैकी सातवे नाथ १०१. नखरेल, दिखाऊ

**उभे शब्द -** १. आपादमस्तक, पायापासून शेंडीपर्यंत २. परत ३. होस्टेल ४. बारा इंच, दुही ५. तांब्या ६. कयास ७. हुलगे ८. खूप राग येतो तेव्हा 'ही' मस्तकात जाते ९. हरीण ११. छोट्या गोल पानांची लोकप्रिय पालेभाजी १२. भिंतीतले दूधदुभत्याचे कपाट १३. कावेबाज १५. भव्य १६. फूटपाथवरचे दुकान, पथारी १७. कौरवांचा मामा १९. व्याघ्रगर्जना २२. वस्तू, जिन्नस २४. आता वापरात नसलेली मराठीची जुनी लिपी २५. तोरा, ऐट २७. कान २८. शिवाजीमहाराजांचे घर २९. पाडी, कालवड ३१. पायाने केलेला प्रहार ३२. सुका चारा ३४. ख्रिस्ती धर्मगुरू ३५. टीकाकार, समीक्षक ३६. बेलगाम गर्दी ३७. हटके, निराळा ३९. बोभाटा ४१. कांचन, सुवर्ण ४२. जुने लुगडे ४३. गवई ४४. भीष्मांना हा वर मिळाल्यामुळे त्यांना कोणी ठार करू शकत नव्हते ४५. खटला ४७. सामना, स्पर्धा ५०. विचार, हेतू, बेत ५२. भगिनी ५५. गळ्यातले आडवे हाड, कॉलरबोन ५८. ओशाळगत ५९. ज्वर मोजण्याचे यंत्र ६०. अभिमानी, आपला बाणा जपणारा ६१. घाव ६३. चिडचीड ६४. बट्ट्याबोळ ६५. चरबी ६७. दर्दी चाहता ६८. साद ७१. शोध ७२. सहारा ७४. वतन, इनाम ७५. क्रीडा ७७. काव्य ७८. इच्छा ८०. लहान मुलांचा समूह ८१. भांडण, संघर्ष ८२. प्रवास ८३. काळा-तांबडा भोपळा, गंगाफळ ८५. छाती ८६. मिसळलेले, एकत्र ९०. वृष्टी ९१. गुरांचे निवांत भोजन ९२. चेहरा ९३. गंधतुलसी, मरुबक, सुगंधी वनस्पती, हिचा देवपूजेत वापर करतात. लांब केस असलेल्या स्त्रिया वेणीत गुंफतात ९५. फेकून द्यावे असे, त्याग करण्याजोगे •

**महाशब्दकोडे क्रमांक २३७२ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. कसलेला ४. तनुजा ६. मलपृष्ठ ८. साकव ११. शिथिल १२. गझल १३. दागिना १५. प्रेक्षणीय १६. ताल १७. चव १८. वाया १९. लाली २१. रस २३. डबीर २५. चावा २६. आवश्यकता ३०. नेभळट ३३. अट ३४. नगर ३५. सौर ३६. वसू ३७. पुरणपोळी ३९. पांडू ४०. सख्य ४२. सट ४३. हिरण्य ४४. भागी ४५. मोह ४७. बुद्धिजीवी ४८. मस्का ४९. सदाशिव ५२. मनीषा ५४. रमल ५६. तोहमत ५८. राठ ६०. गडप ६२. तगडा ६४. नाडी ६६. पखाल ६७. कोमल ६८. वाहवा ७१. लेण्याद्री ७२. ठेका ७३. काकडा ७५. बीज ७७. वडीलधारा ८१. डझन ८२. हार ८३. गोविंद ८५. कपाळकरंटा ८७. पेन ८८. कलदार ८९. निहार ९०. चंग ९१. अंबा ९२. गृह ९३. पेला ९४. राणी ९५. सोपा ९६. मुबलक ९८. राघू ९९. बूच १०२. कोंब १०३. गजर १०४. वासव १०६. खतरनाक १०७. यती १०८. तट्टू १०९. भांडण ११०. घण

**उभे शब्द :** १. कथिल २. सल ३. लागवड ४. तलवार ५. जादा ६. मनाली ७. पृच्छा ८. साक्षरता ९. कणीस १०. वय ११. शिताफीने १४. गिलावा २०. वैश्य २२. झळ २४. बीड २५. चाटण २६. आग २७. वरपांगी २८. कर्क २९. चूर ३१. भग्न ३२. टवटवी ३३. अरण्य ३४. नळी ३५. सौख्य ३७. पुरस्कार ३८. पोशिंदा ४०. सहमत ४१. चबुतरा ४२. सजीव ४३. हिम ४४. भाव ४६. विषाद ४९. सलग ५०. शिर ५१. द्रोह ५३. धोंड ५५. मतलबी ५६. तोडी ५७. मर्द ५९. ठपका ६०. गलका ६१. पकोडा ६३. डावा ६४. नावाडी ६५. गुण्यागोविंदाने ६९. हवन ७०. गांधार ७२. ठेचा ७४. कनकचंपा ७६. जडजंबाल ७८. लहान ७९. दुपार ८०. लोटा ८३. गोल ८४. दर ८५. कहाणी ८६. रंग ८७. पेहराव ८८. कलाबूत ८९. निरामय ९१. अंबर ९५. सोबत ९६. मुजरा ९७. कवाड १००. चरबी १०१. बेकरी १०५. सण १०६. खण

## सर्वसामान्यांना लुटायचं काम केंद्र सरकारने केलं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची टीका

■ बीड

**मोदी** सरकार १०० कोटी लसीचा उत्सव साजरा करत आहेत, कशासाठी हा उत्सव कोरोना काळात तरुण मुलं मेली, आमच्या बहिणीचे कुंकू पुसलं, शेतकरी, छोट्या उद्योगवाले बरबाद केले म्हणून उत्सव साजरा करणार? डिझेल, पेट्रोलचे दर वाढवायची गरज नसताना ही दरवाढ केंद्र सरकार करत आहे. सर्वसामान्यांना लुटायच काम केंद्र सरकार करत आहे, अशी टीका नाना पटोले यांनी केली.

बीडमध्ये काँग्रेस कार्यकर्ता मेळावा पार पडला. यावेळी बोलत असताना नाना पटोले यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. 'ज्या पद्धतीने थोतांड तुम्ही या देशात निर्माण केलं,गरिबाच्या घरचे दिवे विझून शनिवारवाड्याचे दिवे पेटवण्याचा प्रयत्न केला, याचा विरोध काँग्रेस करेल. जीएसटी आला, सर्व सामान्य लोकांकडून टॅक्स वसुली सुरू झाली. मोठ्यांकडे पैसा गेला पाहिजे, अशी व्यवस्था जीएसटीने केली. राज्याच्या तिजोरीत काहीच पैसा जात नाही, असे पटोले म्हणाले. कोरोना काळात शेतकरी, छोट्या उद्योगवाले यांना बरबाद केले म्हणून उत्सव साजरा करणार? असा परखड सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. आम्ही आमच्या स्वतःच्या पैशातून लस घेतोय त्यामुळं त्यावर नरेंद्र मोदींचा फोटो का असा सवाल करत अनेक जण हायकोर्टात गेले आहेत. आतापर्यंत लसीचं राजकारण करण्यात आलं नव्हतं. कोरोनामुळं मोठी जीवितहानी झाल्यानंतरही १०० कोटी लोकांना दिलेल्या एका डोसच्या लसीकरणाचं सेलिब्रेशन करणार असाल तर ती चांगली गोष्ट नाही, असं नाना पटोले म्हणाले.

## अखेर मान्सून देशातून परतला

**नवी दिल्ली -** गेले काही दिवस दक्षिण भारत आणि ईशान्य भारतात नैऋत्य मोसमी वारे अडकून पडल्यानंतर, अखेर संपूर्ण देशातून मान्सूनने निरोप घेतल्याची घोषणा भारतीय हवामान विभागाने केली आहे. आज संपूर्ण देशातून मान्सून परतला असल्याची अधिकृत माहिती हवामान खात्याचे वरिष्ठ शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी आपल्या ट्विटर अकाउंटवरून दिली आहे. गेल्या काही वर्षांत पहिल्यांदाच मान्सून इतके दिवस भारतात सक्रिय राहिला आहे. खरंतर, जून महिन्याच्या पहिल्याच आठवड्याच केरळात मान्सूनने दिमाखात आगमन केले होते.

## मोदींच्या हस्ते उत्तर प्रदेशातील ९ वैद्यकीय कॉलेजांचे उद्घाटन

■ सिद्धार्थनगर

**पुढील** वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अनेक उद्घाटन सोहळ्याचा धडाका लावला. सोमवारी पुन्हा नरेंद्र मोदी हे उत्तर प्रदेशमध्ये आले आणि त्यांनी सिद्धार्थनगरमध्ये नव्या मेडिकल कॉलेजसह अन्य ९ मेडिकल कॉलेजांचे उद्घाटन केले. यावेळीयोगी सरकारचे कौतुक करत मोदींनी म्हणाले की, योगी सरकार संवेदनशील असून ते निरोगी भारताचे स्वप्न पूर्ण करत आहे. संपूर्ण उत्तर प्रदेशसाठी आरोग्याच्या डबल डोसची भेट आणली आहे. पुढे नरेंद्र मोदी म्हणाले की, उत्तर प्रदेशातूनच देशासाठी मोठी आरोग्य योजना सुरू होत असून या मोठ्या कामासाठी तुमचा आशिर्वाद घेऊन काशीला जाणार आहे. केंद्र आणि उत्तर प्रदेश सरकारमधील कर्मयोगींच्या अनेक दशकांच्या तपश्चर्येचे हे फळ असून सिद्धार्थनगरने स्वर्गीय माधव प्रसाद त्रिपाठी यांच्या रूपाने एक समर्पित लोकप्रतिनिधी दिला, ज्यांच्या अथक परिश्रमाचा राष्ट्रासाठी उपयोग होत आहे. सिद्धार्थनगरच्या नवीन वैद्यकीय महाविद्यालयाचे नाव माधव प्रसाद त्रिपाठी नावावर ठेवणे ही त्यांच्या सेवेला खरी श्रद्धांजली आहे.

## एकनाथ खडसे यांना तात्पुरता जामीन मंजूर

**मुंबई-** राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांच्यावर पुण्यातील भोसरी जमीन घोटाळ्याचे आरोप आहेत. त्यांनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर मुंबई सत्र न्यायालयाच्या विशेष कोर्टाने एकनाथ खडसे यांना अंतरिम जामीन मंजूर केला आहे. एकनाथ खडसे महसूल मंत्री असताना त्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करत पुण्यातील भोसरी येथे ३.१ एकर जमीन खरेदी केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. ३१ कोटी रुपये किंमत असलेली जमीन फक्त ३.७ कोटी रुपयांना विकल्याचा दावा आरोपांत करण्यात आला आहे. त्यांची पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश चौधरी यांनी भोसरी येथील एमआयडीसी येथील सव्हे क्र. ५२/२ अ ही जमीन अब्बास रसुलभाई उकानी नामक मूळ जमीन मालकाकडून ३.७५ कोटी रुपयांना खरेदी केली. नोंदणी निबंधकांच्या कार्यालयात या व्यवहाराची रीतसर नोंद केली. अशा प्रकारे एमआयडीसीच्या ताब्यात असलेल्या आणि त्यांच्या मालकीच्या जमिनीचे खडसे कुटुंबीय सरकारी कागदोपत्री मालक झालेले आहेत, असेही आरोप त्यांच्यावर आहेत.

## लालू प्रसाद यादव यांचा पुत्र तेज प्रतापचा हंगामा

■ पाटणा

**माझ्या** विरोधकांनी मला वडिलांना भेटू दिले नाही, त्यांच्यासोबत वेळ घालवू दिला नाही असा हंगामा करत लालू प्रसाद यादव यांचा पुत्र तेज प्रताप यादव याने घरी धरणे आंदोलनाला सुरुवात केली होती. राजद प्रमुख लालू प्रसाद यादव काल तीन वर्षानंतर बिहारची राजधानी पाटणा येथे दाखल झाले. लालू प्रसाद यादव याच्या स्वागतासाठी तेजप्रताप यादव देखील विमानतळावर दाखल झाले होते. लालू प्रसाद यादव यांनी विमानतळावरून थेट आपल्या घरी पाच मिनिटांसाठी यावे त्यानंतर आई राबडी देवीच्या घरी जावे अशी इच्छा तेजप्रताप यादव यांची होती. मात्र राजदचे प्रदेश अध्यक्ष जगदानंद, तेजस्वी यादवचे राजकीय सल्लागार संजय यादव यांनी तेजप्रताप यांना लालुंशी भेटण्यास दिले नाही. त्यामुळे संतापलेल्या तेजप्रताप यादव यांनी थेट आपले निवासस्थान गाठत तिथेच आपल्या समर्थकांसह धरणे आंदोलनाला सुरवात केली होती.

### जाहीर सूचना

नोंद घ्यावी की, आम्ही याखालील**अनुसूची**मध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेल्या तळ मजला अधिक ३ वरील मजले समाविष्ट असलेली एक विंगचा समावेश असलेली **"शिला बिना"** इमारत आणि तळमजला अधिक ३ वरील मजले समाविष्ट असलेल्या ३ विंग समावेश असलेली दुसरी इमारत या तेथे उभ्या असलेल्या दोन इमारतींसह **(सदर इमारती)** मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील गाव बोरीवली, तालुका च्या सर्व्हे क्र. ५३, हिस्सा क्र. ८, सी. टी.एस. क्र. ३५९, ३५९ए, ३५९बी आणि ३५९सी धारण केलेल्या मोजमाप २,८१३.२५ चौरस यार्ड्स समतूल्य २,३५२ चौरस मीटर्स किंवा साधारण तेवढ्याच जमिनीच्या सर्व खंड आणि तुकडे असलेल्या **("सदर जमीन")** स्थावर मालमत्तेकरिता ("सदर जमीन" आणि "सदर इमारती" एकत्रितरित्या **"सदर मालमत्ता"** म्हणून उल्लेखित) **शिला बिना को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड,** महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटी कायदा, १९६०च्या तरतुदीअंतर्गत नोंदणीकरण क्र. बीओएम/डब्ल्यूआर/एचएसजी/टीसी/४२३१/८८-८९ दिनांक २०.०२.८९ अंतर्गत योग्यरित्या नोंदणीकृत को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, एक्सर रोड, लक्ष्मीनारायण मंदिराजवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९१ यांच्या शीर्षकाची तपासणी करीत आहोत.

वैयक्तिक, हिंदू अविभक्त कुटुंब, कंपनी, बँक/बँका, वित्तीय संस्था, नॉन-बँकिंग वित्तीय संस्था, कंपनी, व्यक्तींची संघटना किंवा स्थापित किंवा न स्थापन झालेले वैयक्तिक व्यक्तींचे मंडळ, सावकार आणि/किंवा धनको समाविष्ट असलेल्या सर्व व्यक्ती/संस्था यांचा सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये वारसा, विक्री, हस्तांतरण, हिस्सा, गहाणवट, तारण, प्रभार, भाडेपट्टी, धारणाधिकार, परवाना, नियुक्ती, भाडेकरू, भेट, अदलाबदल, बोजा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, वसीयत, परंपरा, देखभाल, वहिवाट, न्यास, ताबा, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करार, विकास अधिकार, भागिदारी, वहिवाटीचा कायदेशीर अधिकार, प्रलंबित कायदेशीर कारवाई, आरक्षण, मुखत्यारपत्र, पर्याय, एफएसआय वापर, प्रथम नकाराचा अधिकार, सर्वप्रथम खरेदीचा अधिकार किंवा कोणतेही दायित्व किंवा कोणतीही वचनबद्धता किंवा कोणत्याही स्वरुपातील अन्य मार्गे कोणताही लाभ, शीर्षक, दावा, आक्षेप, मागणी किंवा हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी निम्नस्वाक्षरीकारांना **डीएम लीगल असोसिएट्स, ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर**, पत्ता १० यशवंत चेंबर्स, ३ रा मजला, बी. भरूचा मार्ग, फॅब इंडियाच्या मागे, फोर्ट, काला घोडा, मुंबई ४०००२३ येथे व त्याची प्रत कार्यालय क्र. २०५, बी विंग, २ रा मजला, ३६ टर्नर रोड, फॅब इंडियाच्या वर, वांद्रे पश्चिम, मुंबई ४०००५० येथे सदर सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या आत अशा दाव्यांच्या, जर असल्यास, कागदोपत्री पुराव्यांसह, लेखी स्वरुपात सूचित करावे. असे न केल्यास, ते दावे सोडून दिले किंवा गुंडाळून ठेवले असे समजण्यात येईल आणि आम्ही सदर मालमत्तेच्या संदर्भातील शीर्षक स्पष्ट आणि विक्रीयोग्य आहे असे प्रमाणित करण्याची प्रक्रिया सुरू करू.

**वरील उल्लेखिलेली अनुसूची**
**("सदर मालमत्ता")**

बृमुंमपाच्या महापालिका आर/मध्य वॉर्डकडे खाते क्र. आरसी०३०७०१०११०००० आणि आरसी०३०७०१०४६०००० अंतर्गत योग्यरित्या मूल्यांकित एक्सर रोड, लक्ष्मीनारायण मंदिराजवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई-४०० ०९१ येथे स्थित असलेल्या आणि वसलेल्या, तळ मजला अधिक ३ वरील मजले समाविष्ट असलेली एक विंगचा समावेश असलेली **"शिला बिना"** इमारत आणि तळमजला अधिक ३ वरील मजले समाविष्ट असलेल्या ३ विंग समावेश असलेली दुसरी इमारत या तेथे उभ्या असलेल्या दोन इमारतींसह मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील गाव बोरीवली, तालुका च्या सर्व्हे क्र. ५३, हिस्सा क्र. ८, सी.टी.एस. क्र. ३५९, ३५९ए, ३५९बी आणि ३५९सी धारण केलेल्या मोजमाप २,८१३.२५ चौरस यार्ड्स समतूल्य २,३५२ चौरस मीटर्स किंवा साधारण तेवढ्याच जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे **("सदर जमीन")**, तिची चतुःसीमा खालील प्रमाणेः

**उत्तरेस किंवा त्या दिशेने** : सर्व्हे क्र. ५३, हिस्सा क्र. २ धारण केलेल्या जमिनीद्वारे
**पश्चिमेस किंवा त्या दिशेने** : एक्सर रोडद्वारे
**दक्षिणेस किंवा त्या दिशेने** : सर्व्हे क्र. ५३, हिस्सा क्र. ११, १२ (म्हणजेच लक्ष्मीनारायण मंदिर) आणि १३ धारण केलेल्या धारण केलेल्या जमिनीद्वारे भागशः आणि विद्यमान गोवान रोडद्वारे भागशः.
**पूर्वेस किंवा त्या दिशेने** : सर्व्हे क्र. ५३, हिस्सा क्र. ६ द्वारे
**दिनांक २६ ऑक्टोबर, २०२१**

**डीएम लीगल असोसिएट्स**
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर

### जाहीर सुचना

तमाम जनतेला याद्वारे सुचित करण्यात येते की, सदनिका कं बी/१३, शैलेश को. ऑप. हौ. सो. लि., आनंद नगर, वसई रोड पश्चिम, ता वसई, जि. पालघर या मिळकतीशी संबंधीत मे. श्री कंन्स्ट्रक्शन्स व रेमंड परेरा व ग्लॅडस परेरा यांच्यातील दिनांक १४ फेब्रुवारी १९८१ रोजीचा करारनाम्याचे दिनांक २०/०९/१९९४ रोजीचे नोंदणी दस्तऐवज कआर-२-बबम-७०८-१९९४ या नोंदणी कमांकाचे घोषणापत्र व त्याची नोंदणी पावती हरवली असून सदर दस्तऐवजांची मूळ प्रत कोणासही सापडल्यास आमच्या खालील पत्त्यावर ताबडतोब सुपूर्द करावे. जर कोणत्याही व्यक्तिला वा संस्थेला वर उल्लेखिलेल्या मालमत्तेसंबंधी वा त्याच्या हस्तांतराबाबत कोणताही हक्क, दावा, कर्ज आणि हितसंबंध असल्यास ते सुचना प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत पुष्टयर्थ कागदपत्रांसोबत आमच्या खाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात पाठवावे अन्यथा असे दावे त्यागित, अधित्यागित समजण्यात येईल

**पत्ता – श्री. पराग ज. पिंपळे,**
**वकील, मुंबई उच्च न्यायालय,**
एस/४, प्रविण पॅलेस, पंडित दिनदयाळ नगर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर
मो. ९८९००७९३५२ दिनांक: २६.१०.२०२१

### जाहीर सुचना

तमाम जनतेला याद्वारे सुचित करण्यात येते की, सदनिका कं सी/११२, पहिला मजला, सी विंग, रवि अपार्टमेंट को. ऑप. हौ. सो. लि., किश्ना टाउनशिप, दिवाणमान, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि पालघर या मिळकतीशी संबंधीत मे. गोलानी लॅन्ड डेव्हलपर्स व श्रीमती रेखा पंकज शाह यांच्यातील दिनांक २४ एप्रिल १९९१ रोजीचा दस्तऐवज क. छापील-२५५९-१९९१ या नोंदणी कमांकाचा करारनामा व त्याची नोंदणी पावती हरवली असून सदर दस्तऐवजांची मूळ प्रत कोणासही सापडल्यास आमच्या खालील पत्त्यावर ताबडतोब सुपूर्द करावे. जर कोणत्याही व्यक्तिला वा संस्थेला वर उल्लेखिलेल्या मालमत्तेसंबंधी वा त्याच्या हस्तांतराबाबत कोणताही हक्क, दावा, कर्ज आणि हितसंबंध असल्यास ते सुचना प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत पुष्टयर्थ कागदपत्रांसोबत आमच्या खाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात पाठवावे अन्यथा असे दावे त्यागित, अधित्यागित समजण्यात येईल

**पत्ता – श्री. पराग ज. पिंपळे,**
**वकील, मुंबई उच्च न्यायालय,**
एस/४, प्रविण पॅलेस, पंडित दिनदयाळ नगर, वसई रोड पश्चिम, ता. वसई, जि. पालघर
मो. ९८९००७९३५२ दिनांक : २६.१०.२०२१

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**INVITATION FOR BID (IFB)**
**(LOCAL COMPETITIVE BIDDING)**
**Extension III for 2nd call E-Tender**
**RFx No. - 7000019905**

MSETCL invites offers by e-tendering in TWO bid system (Technical and Commercial Bid) from the eligible bidders for the following scope of work as detailed below :

**Description of work :** Installation & Commissioning of 4 nos. of Internet Lease Lines (ILL) at Corporate Office Prakashganga building, MSETCL for period of 3 years.

Interested bidders may obtain further information available on website : https://srmetender.mahatransco.in
Contact Person - 1. Varsha Asolkar DGM (IT),MSETCL
Mobile No.- 9870134976
2. Atul Warjurkar SA(IT), MSETCL
Mobile No.- 8554989257
The online tender sale and submission due date is extended up to 28/10/2021 @ 10:00 Hrs.

**Sd/-**
**Shashank Jewalikar**
**Chief Engineer (ACI&P)**
**Corporate office, MSETCL,Mumbai**

## १४ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाला 'मुहूर्त' मिळाला तीन ते पाच डिसेंबरदरम्यान आयोजन

### भुजबळ नॉलेज सिटीमध्ये भरणार सारस्वतांचा मेळा!

■ नाशिक

**कोरोनामुळे** पुढे ढकलले गेलेले ९४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अखेर नाशिकमध्येच होणार आहे. संमेलनाची मैफील येत्या ३ ते ५ डिसेंबरमध्ये भुजबळ नॉलेज सिटीमध्ये होणार आहे, अशी माहिती पालकमंत्री छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.यावर्षी मार्च महिन्यात २६ ते २८ मार्चच्या दरम्यान हे साहित्य संमेलन होणार होते. त्यासाठी निमंत्रण पत्रिका छापण्यात आल्या. त्या संबंधितांपर्यंत पोहचल्या होत्या. मात्र, कोरोनाच्या वाढत्या प्रकोपामुळे हे संमेलन पुढे ढकलावे लागले. नोव्हेंबर महिन्यातील १९,२०, २१ या तीन तारखांचा विचार आयोजकांकडून सुरू होता. आता या तारखांत बदल करून हे संमेलन डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात घेण्याबाबत बैठकीत एकमत झाले आहे. ३ रोजी सकाळी दिंडी निघणार आहे. संध्याकाळी इतर कार्यक्रम होणार आहे. ४ रोजी कार्यक्रम होणार आहे. ५ रोजी समारोप होणार आहे. कोरोनाच्या नियमांचे पालन केले जाणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली. या वेळी जयप्रकाश जातेगावकर व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. तीन ते पाच डिसेंबर या तारखांसाठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी होकार दिला आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री व संमेलनाचे स्वागताध्यक्ष छगन भुजबळ यांनी यासंदर्भात अधिकृत घोषणा केली. हे संमेलन नाशिककरांचे व्हावे, याद्दष्टीने संयोजकांकडून प्रयत्न सुरू होते. त्यातच संमेलन भुजबळ नॉलेज सिटी मध्ये घेण्याबाबत संयोजकांनी महामंडळाला कळविले आहे. संमेलन भुजबळ नॉलेज सिटीमध्ये घेतल्यास खर्चात बचत होईल, असे संयोजकांचे म्हणणे आहे. त्यामुळे संमेलनाच्या तारखा व संमेलन कुठे होणार, याची उत्सुकता साहित्य रसिकांना लागून होती. नाशिकमध्ये होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या तारखांवरून निमंत्रक जयप्रकाश जातेगावकर आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष कौतिकराव ठाले-पाटील यांच्यात चांगलीच पत्रापत्री रंगली होती. विशेष म्हणजे संमेलन पुढे ढकलण्याला ठाले-पाटलांनी पत्र लिहून आक्षेप घेत नाराजी दर्शवली होती.

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा. बां. विभाग
निविदा सुचना

माजिवडा मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील ''मागासवर्गीय निधी'' या लेखाशिर्षांतर्गत प्रभाग क्र.०८(अ) शिवाजीनगर (बाळकूम), आंबेडकरनगर, देवरामनगर परिसरात निवारा शेड उभारणे आणि पदपथाचे नुतनीकरण करणे, गटार व पायवाटाचे नुतनीकरण करणे या तीन कामाच्या ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in वर दि. २६/१०/२०२१ ते दि. ०९/११/२०२१ पर्यंत उपलब्ध आहेत. सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळावर दि. ०९/११/२०२१ रोजी १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा शक्य झाल्यास दि. १०/११/२०२१ रोजी पर्यंत १६.०० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-माजि/७९६/२१-२२ **सही/-**
दि:२५.१०.२०२१ कार्यकारी अभियंता
*plsvisitourofficialweb-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given that the following Share Certificates for 400 Equity Shares of Rs.10/- (Rupees ten only) each with Folio No. **048215602** of **Reliance Industries Limited**, having its registered office at Maker Chambers IV, 3rd Floor, 222 Nariman Point, Mumbai, Maharashtra- 400021 registered in the name of **VIMLA JAYANTILAL AJMERA** and **KETAN JAYANTILAL AJMERA** has been lost. **VIMLA JAYANTILAL AJMERA** has applied to the company for issue duplicate certificate. Any person who has any claim in respect of the said shares certificate should lodge such claim with the company within in 15 days of the publication of this notice.

| Folio | No of Shares | Certificate Nos. | Distinctive Nos. From - To |
|---|---|---|---|
| 048215602 | 20 | 15570410 | 109765069 - 109765088 |
| 048215602 | 20 | 15570410 | 109765089 - 109765108 |
| 048215602 | 10 | 15570410 | 109765929 - 109765938 |
| 048215602 | 50 | 8608974 | 117117259 - 117117308 |
| 048215602 | 50 | 9076299 | 126365731 - 126365780 |
| 048215602 | 50 | 9076300 | 126365781 - 126365830 |
| 048215602 | 50 | 9076301 | 126365831 - 126365880 |
| 048215602 | 50 | 9076302 | 126365881 - 126365930 |
| 048215602 | 50 | 11671722 | 212003154 - 212003203 |
| 048215602 | 50 | 11904035 | 221137795 - 221137844 |

Place : Mumbai
Date : 26/10/2021

Sd/
**VIMLA JAYANTILAL AJMERA**

# नवा काळ

मुंबई ■ मंगळवार २६ ऑक्टोबर, २०२१ ■ पान- ८


## प्रसिद्ध तेलुगू अभिनेते राजा बाबू यांचे निधन



**हैदराबाद -** तेलुगू ज्येष्ठ अभिनेते राजा बाबू यांचे वयाच्या ६४ बर्षी निधन झाल्याने चित्रपटसुष्टीतील कलाकारांमध्ये आणि चाहत्यांमध्ये एकच हळहळ व्यक्त होत आहे.गेल्या काही वर्षांपासून ते आजारी होते.रविवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात पत्नी आणि तीन मुले आहेत. त्यांनी अनेक तेलुगू चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारल्या आहेत. उरिकी मोनागाडू' या चित्रपटातून त्यांनी अभिनयसृष्टीत पदार्पण केले होते. ६० हून अधिक चित्रपट आणि टीव्ही शोमध्ये त्यांनी काम केले. 'वसंत कोकिला', 'मनसू ममता', 'चि ला सौ श्रावंती', 'प्रियांका' यांसारख्या त्यांच्या मालिका खूप गाजल्या. समुद्रम, मुरारी, आडावरी मातलकू अर्धले वेरुले, सीतम्मा वाकिटलो सिरिमल्ले चेट्टू, मल्ली रावा, श्रीकारम, ब्रह्मोत्सवम आणि भारत अने नेनू या चित्रपटांमध्ये त्यांनी साकारलेल्या भूमिका लोकप्रिय ठरल्या.

## कळमना बाजार समितीवर केदारांचेच वर्चस्व भाजपचे पानिपत, सर्वच्या सर्व १८ जिंकल्या

■ नागपूर

**नागपूरच्या** कळमना कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत पशुसंवर्धन मंत्री सुनील केदार यांच्या सहकार पॅनल ने इतिहास घडवत सर्वच्या सर्व १८ ही जागेवर धडाक्यात विजय मिळवत भाजपा या विरोधकांचा धुव्वा उडविला आहे.भाजपचे माजी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पॅनेलचे या निवडणुकीत पानिपत झाले.

या निवडणुकीत सुनील केदार यांच्या सहकार पॅनल चे सेवा सहकारी संस्था मतदार संघातून विजय चौधरी, वसंतराव लांडगे, प्रकाश नागपुरे, अजय राऊत, बेनिराम राऊत, अहमदभाई शेख, बाबाराव शिंदे, रवीचंद्राबाई नांदूरकर, अंजली शिंदे, हमाल मतदारसंघातून किशोर पलांदूरकर यांनी घवघवीत विजय मिळविला आहे.सुनील



हरिभाऊ गाडबैल, अशोक सोनवाने तसेच ग्रामपंचायत मतदारसंघातील संजय कुंटे, दीपक राऊत, महेश चोखंद्रे, नारायण कापसे तसेच व्यापारी मतदारसंघातील प्रकाश वाधवाणी,अतुल सेनाड व केदार हे निवडणूक निकालानंतर म्हणाले की,या बाजार समिती आणि जिल्हा परिषद निवडणूक निकालाने भाजपचा खरा चेहरा उघड झाला आहे.पुढील काळातही भाजपला त्यांची जागा दाखवली जाईल.

## आग विझविण्यासाठी आता फायर बाईक

**मुंबई-** मुंबईतील दाटीवाटीच्या गल्लीबोळात पोहोचून आग विझविण्यासाठी प्रत्येक अग्निशमन केंद्रामध्ये एक फायर बाईक ठेवली जाणार आहे. या एका बाईकसाठी १३ लाख रुपये इतका खर्च केला जाणार असल्याची माहिती अग्निशमन दलातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. आगीची माहिती मिळताच तत्काळ ही फायर बाईक घटनास्थळी पोहोचेल. बाइकवर अग्निशमन यंत्रणा असेल. ४० लिटर पाणी, पोर्टेबल फायर सिस्टीम, कम्युनिकेशन सिस्टीम, ३० मीटर होजरील पाइप, फायर पंप, फायर एक्सटिंग्युशर अशी यंत्रणा असणार आहे.या बाईकमुळे वर्दी मिळाल्यानंतरचा रिस्पॉन्स टाइम कमी होणार आहे. परिणामी दुर्घटनेच्या तीव्रतेनुसार आवश्यक यंत्रणा वेगाने उपलब्ध करणे शक्य होणार आहे. गाडीवरच दोन पाण्याच्या टाक्या असल्याने पाठीवरून टाकीतून पाणी नेण्याची गरज राहणार नाही. महापालिका एका बाईकसाठी सुमारे १३ लाख रुपये खर्च करणार असल्याची माहिती अग्निशमन दलातील अधिकाऱ्यांनी दिली.

## उत्तराखंडच्या गिर्यारोहण मोहिमेवर गेलेल्या १२ जणांचा मृत्यू! तीनजण बेपत्ता, शोध सुरू

■ डेहराडून

**प्रतिकूल** हवामानामुळे उत्तराखंडच्या गिर्यारोहण मोहिमेवर गेलेल्या २१ जणांच्या दोन पथकातील १२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.भारताच्या वायुदलाने लमखागा पास येथे १७ हजार फुटांच्या उंचीवर शोधकार्य सुरू केले आहे. या परिसरात १८ ऑक्टोबर रोजी मोठ्या प्रमाणावर हिमवृष्टी झाली. हिमवृष्टीमुळे पर्यटक, पोर्टर (हमाल), गिर्यारोहक अशा १७ जणांशी असलेला संपर्क तुटला. या सर्वांना शोधण्यासाठी सुरू केलेल्या मोहिमेत आतापर्यंत १२ मृतदेह सापडले. तर तीनजण अद्याप बेपत्ता आहेत. लामखागा पास हा खिंडीचा भाग हा उत्तराखंडच्या हरसिल जिल्ह्याला हिमाचल प्रदेशच्या किन्नौर जिल्ह्याशी जोडतो. हिमवृष्टी झाल्यामुळे लामखागा पास परिसरात गेलेल्या १७ जणांशी संपर्क होत नसल्याची माहिती स्थानिक प्रशासनाने वायुदलाला दिली. तसेच प्रशासनाने वायुदलाकडे शोध कार्यासाठी मदत मागितली. वायुदलाने प्रशासनाकडून विनंती येताच २० ऑक्टोबर पासून शोधकार्य सुरू केले. शोधकार्य सुरू झाल्यापासून आतापर्यंत १२ जणांचे मृतदेह सापडले आहेत. वायुदलाची दोन हलक्या वजनाची हेलिकॉप्टर आणि एनडीआरएफचे तीन सदस्य संयुक्तपणे शोधकार्य करत आहेत. शोधकार्याची सुरुवात लमखागा पास परिसरात १९ हजार ५०० फुटांच्या उंचीवर झाली. या शोधमोहिमेत एसडीआरएफचे पथक



२१ ऑक्टोबर रोजी सहभागी झाले. वेगवेगळ्या उंचीवर एकाचवेळी शोधकार्य सुरू करण्याचा निर्णय झाला. डोगरा स्काउट्स, ४ आसाम रायफल्स आणि दोन आयटीबीपी पथके यांनीही शोधकार्य सुरू केले.

## अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दोन दिवसांत मदत

■ मुंबई

**नुकत्याच** झालेल्या अतिवृष्टी सर्वाधिक नुकसान मराठवाड्याचे झालेले आहे त्यामुळे मदत वाटपाची सुरुवात मराठवाड्यापासून केली जाईल असे मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. यंदाच्या अतिवृष्टी मध्ये ५५लाख हेक्टर शेतीचे नुकसान झालेले आहे त्यासाठी सरकारने १० हजार कोटींची मदत जाहीर केली होती त्यातील ३७०० कोटींच्या मदतीचा पहिला टप्पा वित्त आयोगाकडून आज निधी येताच शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केला जाईल सरकारने दिवाळी पूर्वी अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना मदत देण्याचे आश्वासन दिलेले आहे. त्यानुसार गेल्या १४ऑक्टोबरला झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जून ते ऑक्टोबर २०२० दरम्यान अतिवृष्टी व पुरात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १० हजार कोटींची मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला होता

### मंत्री वडेट्टीवार यांची माहिती

त्या नुसार जिरायती साठी प्रति हेक्टर १० हजार, बागायतीसाठी प्रती हेक्टर १५ हजार आणि बहुवार्षिक पिकांसाठी प्रति हेक्टर २५ हजार असे मदतीचे स्वरूप होते. यंदाच्या अतिवृष्टी सर्वाधिक ७० टक्के नुकसान मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे झालेले असल्याने मदतीची सुरुवात मराठवाड्यातून होणार आहे.

## कलानी कुटुंबाचा राष्ट्रवादी प्रवेश लांबणीवर? बंद दाराआड नेत्यांची बैठक झाल्याची चर्चा

■ उल्हासनगर

**एकेकाळचे** उल्हासनगरचे सर्वेसर्वा बनलेले पप्पू कलानी कुटुंब हे पुन्हा स्वगृही म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परतण्याची जोरदार चर्चा सध्या शहरभर सुरू आहे. आगामी पालिका निवडणुकीपूर्वीच त्यांची घरवापसी होईल असे बोलले जात होते.मात्र कलानी कुटुंबाचा राष्ट्रवादी प्रवेश लांबणीवर पडल्याचे समोर येत आहे.शहरातील एका कार्यक्रमानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी कलानी कुटुंबाशी बंद दाराआड चर्चा केली पण ही भेट केवळ दिवंगत माजी आमदार ज्योती कलानी यांच्या स्मरणार्थ असल्याचे ओमी कलानी यांनी म्हटले आहे.

राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षा सोनिया धामी आणि पालिका सभागृह नेते भारत गंगोत्री यांनी राष्ट्रवादी परिवार संवाद कार्यक्रमाचे



आयोजन केले होते. या कार्यक्रमास पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील ,जितेंद्र आव्हाड आणि महिला अध्यक्ष रुपाली चाकणकर उपस्थित होत्या. यावेळी जयंत पाटलांनी धामी आणि गंगोत्री यांचे तोंडभरून कौतुक केले.पण कार्यक्रमानंतर भोजनाच्या निमित्ताने कलानी महलमध्ये जाऊन कलानी कुटुंबाशी पप्पू कलानी यांच्या उपस्थितीत बंद दाराआड चर्चाही केल्याचे बोलले जात आहे. मात्र गटनेते भारत गंगोत्री यांनी कलानी कुटुंबाला आपला विरोध कायम असल्याचे सांगितले आहे. तर ओमी कलानी यांनीही ही भेट ज्योती कलानी यांच्या स्मरणार्थ असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच सध्या राष्ट्रवादीचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचे काम भारत गंगोत्री यांनीच केले आहे हे सर्वश्रुत आहे.त्यामुळे त्यांना विश्वासात घेतल्याशिवाय कलानी कुटुंबाला पुन्हा राष्ट्रवादीत आणणे कठीण असल्याचे बोलले जात आहे.

## बल्लारशाह-मुंबई सेवाग्राम ट्रेन कायमस्वरूपी बंद होण्याची चर्चा

■ चंद्रपूर

**कोरोनाच्या** पार्श्वभूमीवर बंद ठेवण्यात आलेली बल्लारशाह - मुंबई सेवाग्राम ही ट्रेन अद्याप सुरु करण्यात आलेली नाही. त्यातच आता एलएचबी प्रणालीमुळे ही गाडी कायमस्वरूपी बंद केली जाणार असल्याच्या चर्चेला जोर धरला आहे.चंद्रपूर,गडचिरोली आणि यवतमाळ येथील प्रवाशांना मुंबईला जाण्यासाठी ही हक्काची मानली जात होती.पण ही ट्रेन अद्याप सुरू झाली नसल्याने प्रवाशांची मोठी कुचंबना झाली आहे. नागपूर- सेवाग्राम एक्सप्रेसला बल्लारशाह- भुसावळ या पॅसेंजरचे सहा डबे जोडले जात होते. त्यामुळे चंद्रपूर आणि शेजारील जिल्ह्यातील नागरिकांना थेट मुंबईला जाणे सोपे होत होते. विद्यार्थी, नोकरदार आणि ज्येष्ठ नागरिकांना ही ट्रेन फारच सोयीची बनली होती. पण आता ही ट्रेन बंद असल्याने वर्धा ,नागपूर येथे जाऊन विशेष ट्रेन पकडून लोकांना मुंबईला जावे लागत आहे. विशेष म्हणजे चंद्रपूर ,गडचिरोली आणि यवतमाळ जिल्ह्यातील कॅन्सरग्रस्त नागरिकांना मुंबईतील टाटा हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी या बल्लारशाह - मुंबई सेवाग्राम एक्सप्रेसचा फायदा होत होता. तसेच इथल्या वर्धा,हिंगणघाट आणि वरोरा येथे नोकरी निमित्ताने जाणाऱ्यांचीही या ट्रेनमुळे चांगली सोय झाली होती. या गाडीमुळे छोट्या व्यावसायिकांना चांगला रोजगार मिळत होता. पण आता तोही बंद झाला आहे.त्यामुळे आता आठवडाभर नको पण निदान आठवड्यातून दोन दिवस तरी ही सोयीची बल्लारशाह- मुंबई सेवाग्राम ट्रेन सुरू करावी.

## भोपाळमध्ये प्रकाश झा यांच्या 'आश्रम ३'

**भोपाळ-** अभिनेता बॉबी देओलच्या 'आश्रम' या वेब सीरिजचे दोन्ही सीझननंतर आता प्रकाश झा यांनी या वेब सीरीजच्या तिसऱ्या सीझनची तयारी सुरू केली आहे. 'आश्रम ३'चे शूटिंग भोपाळमध्ये सुरु झाले आहे. मात्र बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी भोपाळमधील 'आश्रम ३' या वेब सीरिजच्या सेटची तोडफोड करत हल्ला केला. यावेळी बजरंग दल कार्यकर्त्यांनी प्रकाश झा यांच्या चेहऱ्यावरही शाई फेकली. हिंदूंची चुकीची प्रतिमा तयार

### वेब सीरिजच्या सेटवर बजरंग दलाचा हल्ला



करण्यात आल्याचा आरोप करत या सीरिज नाव बदलावे अन्यथा मध्य प्रदेशात मालिकेचे शूटिंग होऊ देणार नाही, असा इशारा यावेळी बजरंग दलाने दिला आहे. बजरंग दलाचे नेते सुशील यांनी म्हटले की, मध्य प्रदेशात चित्रपट उद्योगाला चालना मिळावी अशी आमची इच्छा आहे. लोकांना काम मिळाले पाहिजे, पण ही जमीन हिंदू समाजाचा अपमान करण्यासाठी वापरण्यात येऊ नये. या वेब सीरिजमध्ये आश्रमात महिलांचे शोषण होत असल्याचे दाखवण्यात आले होते. असे आहे का? हिंदूंना फसवणे बंद करा. जर त्यांना लोकप्रियता हवी असेल, तर ते इतर कोणत्याही धर्माचे नाव का घेत नाहीत आणि का पाहत नाहीत की किती आंदोलने आहेत..' बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी सेटवर 'प्रकाश झा मुर्दाबाद', 'बॉबी देओल मुर्दाबाद' आणि 'जय श्री राम'च्या घोषणा दिल्या. या वेब सीरिजमधील मुख्य पात्र असलेल्या बॉबी देओलच्या शोधात असल्याचेही त्यांनी सांगितले. बॉबीने त्याचा भाऊ सनी देओल कडून काहीतरी शिकले पाहिजे, असे देखील त्यांनी म्हटले.

## ड्रग एडिट असलेल्यांना सवलत? सामाजिक न्याय मंत्रालयाच्या शिफारशींना देशभरातून विरोध

■ नवी दिल्ली

**देशात** सरकार आणि सामाजिक संघटनांकडून व्यसन मुक्तीची चळवळ सुरू असतानाच जे ड्रग एडिट आहेत अशा व्यक्तींनी वैयक्तिक वापरासाठी ड्रग बाळगणे ही बाब गुन्हेगारी मुक्त असावी व अशा प्रकरणात संबंधित व्यक्तीला तुरुंगात पाठवले जाऊ नये अशी सामाजिक न्याय मंत्रालयाने जी सरकारला शिफारस केली आहे त्याविरुद्ध देशभरात संताप व्यक्त केला जात असून सरकारने अमली पदार्थांच्या व्यवसायास चालना देणाऱ्या अशा शिफारशी स्वीकारू नयेत अशी मागणी देशभरातून केली जात आहे. केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने एन डी पी एस कायद्यात सुधारणा करण्याची मागणी करताना ड्रग एडिट व्यक्ती बाबत मानवी दृष्टी कोण ठेवावा असे म्हटले होते गेल्या महिन्यात एन दी पी एस कायद्याचा नोडल प्रशासकीय प्राधिकरण असलेल्या महसूल विभागाने गृह मंत्रालय,आरोग्य मंत्रालय, सामाजिक न्याय आणि अधीकरिता मंत्रालय, एन सी बी, आणि सीबीआय सह अनेक मंत्रालये आणि विभागांना याबाबत कायद्यात बदल करण्याचे सुचवले होते त्यानंतर सामाजिक न्याय विभागाने महसूल विभागाकडे तशा सूचना पाठवल्या आहेत पण भारतात मादक पदार्थांचे सेवन करणे आणि बाळगणे हा कायद्याने फौजदारी स्वरूपाचा गुन्हा आहे आणि सध्या क्रुझ वरील रेव्ह पार्टी वर केलेल्या कारवाई वरून देशभर काहूर माजले आहे अशा



स्थितीत ड्रग एडिट लोकांबद्दल मानवतेचा दृष्टिकोन ठेऊन जरी त्यांना अल्प प्रमाणात ड्रग वापरण्याची मुभा दिली तर त्याचा ड्रग माफिया गैर फायदा घेतील आणि खुलेआम ड्रगची विक्री सुरू होईल त्यामुळे संपूर्ण तरुण पिढीच ड्रग एडिट होईल.

## आज किरीट सोमय्या नांदेड दौऱ्यावर सचिन सावंत म्हणाले, मी स्वागत करतो

■ मुंबई

**भाजपचे** नेते किरीट सोमय्या यांनी केलेल्या आरोपानंतर महाविकास आघाडीतील नेते आणि मंत्र्यांची ईडी, सीबीआयसह अन्य केंद्रीय तपास यंत्रणांकडून चौकशी केली जात आहे. अशातच किरीट सोमय्या हे उद्या मंगळवार २६ आणि बुधवार २७ तारखेला नांदेड दौऱ्यावर जाणार असल्याची माहिती खुद्द भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी दिली होती. त्याचबरोबर ईडीची पुढील कारवाई अशोक चव्हाण यांच्यावर होणार का? या प्रश्नावर पाटील यांनी माझ्या हसण्यावरुन समजून जा, असे म्हणत संकेत दिले होते. त्यानंतर आता काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी ते नांदेडमध्ये सोमय्या यांच्या स्वागतासाठी सज्ज असल्याचे ट्वीट करुन किरीट सोमय्यांना एकप्रकारे आव्हान दिले आहे.

किरीट सोमय्या यांनी २१ ऑक्टोबरला ट्वीट करुन आपण २६ आणि २७ ऑक्टोबरला नांदेड आणि लातूरला जाणार असल्याची माहिती दिली होती. 'सोमय्यांच्या या ट्वीटला उत्तर देताना काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी सोमय्याजी, आपण २६ ला नांदेडला येणार असं कळतंय. मी अगोदरच आलोय. नांदेडमध्ये तुमचं स्वागत आहे', असे ट्वीट त्यांनी केले आहे. दरम्यान, चंद्रकांत पाटील हे देगलूर- बिलोली निवडणूक



प्रचारासाठी नांदेडमध्ये आले होते.त्यावेळी त्यांनी पत्रकारांच्या एका प्रश्नावर म्हटले होते की,मी तपास यंत्रणांचा अधिकारी नाही.मला काही माहीत नाही.पण माझ्या हसण्यावरून तुम्ही योग्य अर्थ लावू शकता.

## अनिल देशमुखांना क्लीन चिट देणाऱ्या सीबीआय अधिकाऱ्याचा जामीन फेटाळला

■ नवी दिल्ली

**मनीलाँड्रीग** आणि १०० कोटी रुपयांच्या वसुलीप्रकरणी राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना क्लिनचिट दिल्याचा बनावट अहवाल तयार केल्याप्रकरणी अटकेत असलेले सीबीआयचे पोलीस निरीक्षक अभिषेक तिवारी आणि अनिल देशमुख यांचे वकील आनंद डागा या दोघांचा जामीन अर्ज दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळून लावला आहे.

सध्या या प्रकरणाचा तपास प्राथमिक टप्प्यात असल्याने आरोपींना जर जामीन दिला तर ते पुराव्यांमध्ये हस्तक्षेप करण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे त्यांना जामीन देता येणार नाही असे स्पष्ट मत दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश योगेश खन्ना यांनी यावेळी मांडले. तिवारी आणि डागा हे दोघे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. तसेच त्यांनी आधी चार दिवस सीबीआय कोठडीत काढले आहेत.विशेष म्हणजे सीबीआयने त्यांची आणखी चौकशी करण्यासाठी कुठलाही अर्ज केलेला नाही याचा




अर्थ त्यांना त्यांच्या चौकशी गरज भासत नसल्याने त्यांना जामीन देण्यात यावा अशी मागणी आपल्या याचिकेत त्यांच्या वकिलांनी केली होती.त्यानंतर सीबीआयच्या वकिलांनी हा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याचे सांगत त्यांना आताच जर जामीन दिला गेला तर ते मिळालेल्या पुराव्यात छेडछाड करू शकतील असा युक्तिवाद केला.

## सोलापूर-पुणे महामार्गावर कंटेनरची एसटीला धडक

**सोलापूर -** कंटेनरने अचानक ब्रेक दाबल्याने भरधाव जाणारी एसटीला मागून जोरदार धडक दिल्याने आठ जण जखमी झाल्याची घटना सोलापूर - पुणे राष्ट्रीय महामार्गावरील चिखली शिवारात सोमवारी पहाटे सुमारास घडली. सर्व जखमींवर मोहोळच्या ग्रामीण रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी त्यांना सोलापूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. एसटी बस ही पुण्याहून उमरगाकडे निघाली होती. एसटी चिखली शिवारात येताच कंटेनरने अचानक ब्रेक दाबल्याने एसटीने कंटेनरला पाठीमागून जोराची धडक दिली. अपघात होताच कंटेनर न थांबता पुढे निघून गेला. मात्र एसटी बसचे मोठे नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच मोहोळ येथील वाहतूक नियंत्रक विलास देसाईंनी घटनास्थळी जाऊन जखमींना मदत केली. या घटनेची नोंद मोहोळ पोलिसात झाली आहे. या अपघातात नामदेव येवले ( ४०), नामदेव कांबळे (३१), प्रभाकर बिराजदार (२१), प्रवीण ननवरे ( ३०), सारिका ननवरे (२८), समाधान वाघमारे (३५), काशिनाथ आरबाळे ( ६५), योगेश दुधाळे १८) अशी जखमींची नावे आहेत.

## ६७ राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान मणिकर्णिकासाठी कंगना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री

■ नवी दिल्ली





### रजनीकांतला दादासाहेब फाळके पुरस्कार

**६७ व्या** राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे वितरण आज दिल्लीत करण्यात आले. उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांच्या हस्ते विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. मणिकर्णिका: द क्वीन ऑफ झांसी आणि पंगा या चित्रपटातील अभिनयासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार कंगना राणावतला मिळाला आहे. कंगना राणौतला चौथ्यांदा राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.त्याचबरोबर मनोज बाजपेयी यांना 'भोंसले' आणि धनुषला 'असुरन'साठी संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला आहे.या सोहळ्यात रजनीकांत यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

हा पुरस्कार मिळाल्याने कंगना खूप उत्साहात सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहेत. त्यात कंगनाने लिहिले आहे की, 'आज मला मणिकर्णिका: द क्वीन ऑफ झांसी आणि पंगा साठी संयुक्त राष्ट्रीय पुरस्कार मिळणार आहे. मी मणिकर्णिका: द क्वीन ऑफ झांसीचे सह-दिग्दर्शनही केले. या चित्रपटांच्या टीम्सबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. हा माझा चौथा राष्ट्रीय पुरस्कार आहे. कंगनाला २००८ मध्ये फॅशन चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. २०१४ मध्ये तिला क्वीनसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा तिला दुसरा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. तर कंगनाने २०१५ मध्ये तनु वेड्स मनूसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कारही जिंकला.